सोलापूर तरुण भारत
आसमंत

**सोलापूर शहराचेच नाही तर संपूर्ण जिल्ह्याचे आदर्श दैवत म्हणजे श्री सिद्धरामेश्वर होय. सोलापूर त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. बाराव्या शतकामध्ये एका सिद्ध भक्ताच्या घरी त्यांचा जन्म झाला. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की त्यांचे बालपण आत्मचिंतनात गेले. ते बोलत नव्हते. त्यामुळे सर्वांना वाटायचे की ते मुके आहेत परंतु न बोलता आपल्या मनाशी त्यांचे चिंतन चालू असायचे. नंतर ते श्रीशैल्य मल्लिकार्जुन येथे गेले तेथे त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. श्री मल्लिकार्जुनच्या प्रत्यक्ष भेटीचा त्यांना अनुभव आला. सोलापूरहून ते मल्लय्यांना शोधण्यासाठी श्रीशैल्यला गेले. हा त्यांचा प्रवास त्यांची आत्म शक्ती व आर्तभक्ती दाखवतो. खरोखरच परमेश्वर काही इतका सहज साध्य नाही. त्यासाठी तुम्हाला रात्रंदिवस प्रार्थना करावी लागते. श्री सिद्धरामेश्वरांनी सतत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाची भक्ती केली. कपिलसिद्ध मल्लिकार्जुन हीच त्यांची वचन मुद्रा आहे. त्यांनी ६८ हजार वचने लिहिली असे म्हटले आहे. परंतु त्यातील १९९२ वचने आज उपलब्ध आहेत. या वचनातून श्री सिद्धरामेश्वर यांची भक्ती, मानवतावादी दृष्टिकोन, वैराग्य, समाजाप्रती असलेली तळमळ, माणसाने आयुष्यात येऊन नेमके काय केले पाहिजे याविषयी केलेले प्रबोधन दिसून येते..**



# श्री सिध्देश्वरांची भक्ती परायणता

निमित्त
प्रा डॉ श्रुती वडगबाळकर
भ्र. ९३२५०४६४१५

सिद्धरामेश्वर यांच्या वाचनातून त्यांची आर्तभक्ती, कपिल सिद्ध मल्लिकार्जुनाच्या भेटीची तळमळ, खरा भक्त कसा असावा, भक्तिमार्ग कसा आचरणात आणावा याविषयी खूप चांगल्या प्रकारे, उदाहरणासहित समाजाला मार्गदर्शन दिसून येते. ते एका वचनात म्हणतात, खऱ्या भक्ताने भक्तिमार्ग कसा आचरणात आणायचा, तर त्याने ज्ञान आणि क्रिया या दोन्हीचाही सूक्ष्मपणे विचार केला पाहिजे. ज्ञानाची लक्षणे समजावून घेऊन त्यानुसार आचरण करावे. ख भक्ताने त्रिविधतापांच्या आहारी न जाता कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाशी एकरूप झाले पाहिजे. माणसाला त्रिविध ताप असतात.. हे त्रिविध ताप म्हणजे आधिभौतिक ताप, आध्यात्मिक ताप व आधिदैविक ताप होय. माणसाला गर्भावस्थेत असल्यापासूनच व जन्माला आल्यानंतर अनेक प्रकारची दुःखे भोगावी लागतात. या यातनांचे वर्गीकरण करण्यासाठी त्रिविधतापांची कल्पना केलेली आहे. ज्यावेळेस जगातील अनेक बाह्य वस्तूंचा आपल्या इंद्रियाशी संबंध येतो आणि त्यामुळे जी दुःखे भोगावी लागतात. त्याला आधिभौतिक ताप असे म्हणतात. कोरोनासारखे रोग बाह्य वस्तूंच्या स्पर्शामुळे किंवा संबंधामुळेच निर्माण झाले होते. त्यामुळेच अनेकांना त्याचा त्रास झाला. हा त्रास म्हणजे आधिभौतिक ताप होय. पण बाह्य वस्तूंच्या संपर्काशिवाय काही वेळा देह, इंद्रिय आणि प्राण यांच्या संयोगाने माणूस सुखदुःख भोगत असतो. शरीरामध्ये अनेक रोग निर्माण होणे आणि त्यामुळे जो त्रास सहन करावा लागतो त्याला आध्यात्मिक ताप असे म्हणतात. यामध्ये मानसिक चिंता, काळजी, नैराश्य या गोष्टी पण येतात..


बऱ्याच वेळा आपण वांझोट्या चिंता करत बसतो. ज्या चिंतेतून काहीच निष्पन्न होत नाही. तरी आपण काळजी करत बसतो आणि त्यामुळे जे दुःख होतं ते आध्यात्मिक तापात येते. प्रत्येक माणसाला आपल्या चांगल्या-वाईट कर्माची फळे भोगावीच लागतात. अगदी या जन्मात नाही तर पुढच्या जन्मी तरी भोगावी लागतात, असे आपला कर्म सिद्धांत सांगतो. आपल्या चांगल्या- वाईट कर्माच्या फळामुळे जो त्रास होतो त्याला आधिदैविक ताप म्हणतात. हा तीन प्रकारचा ताप आहे. परंतु हा ताप जर कमी करायचा असेल तर परमेश्वराला शरण गेलं पाहिजे. ईश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. या त्रिविधतापांच्या आहारी न जाता तो ताप सहन करत भोगला पाहिजे. त्याचा दोष कोणाला देता कामा नये आणि आपली भक्तीही सोडता कामा नये. श्री सिद्धरामेश्वर म्हणतात, खऱ्या भक्ताने गुरु, लिंग, रुद्राक्ष माळा, मंत्र, भस्म या पाच मुद्रांनी अलंकृत व्हावे आणि या पाच मुद्रांनी अलंकृत झाल्यानंतर शिवमुद्रा आणि शिवभाव हे मनावर बिंबवले पाहिजे..ते म्हणतात, हे केदारय्या, कपिलसिद्ध मल्लिकार्जुनांनी 'वातुलागमा'त म्हटले आहे की,

**गुरौ लिंगेऽ क्षमालायां मंत्रे भस्मनि पंचसु !**
**एतासु शिवमुद्रासु शिवसद् भक्तिमाचरेत् !!**

शिवाची भक्ती ही सर्वात श्रेष्ठ आहे. ही भक्ती करतानाच खऱ्या भक्ताने आणखी काही गोष्टीचं पालन केलं पाहिजे. मुख्य म्हणजे त्याने कोणताही भेदभाव न मानता सर्वांशी आत्मीयतेने संभाषण करावे. खऱ्या भक्ताने भेदभाव न मानता सर्वांना शिवचरणासारखे पवित्र सम जावे. ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. महात्मा बसवेश्वरांनीही हा भेदभाव कधीच मानला नाही. ज्याप्रमाणे प्रत्येक प्राण्यात एक भाव असतो. सर्वांचा आत्मा सारखाच असतो. त्याप्रमाणेच आपणही सर्वांशी बंधू भावानेच वागावे. खऱ्या भक्ताने ज्ञानसाधनेत वटवृक्षाच्या बीजाप्रमाणे असावे. वटवृक्षाचे बीज अगदी लहान असते पण त्याच्यामध्ये वटवृक्ष होण्याचे सामर्थ्य असते. आपली ज्ञानसाधनाही अशीच वाढवत नेली पाहिजे. ते ज्ञान अग्नीप्रमाणे प्रखर आणि तेजस्वी असावे. बर्याच वेळा अनेक माणसे दुसऱ्याची भक्ती बघतात,त्याचे ज्ञान घेतात. आणि त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करून आपण खरे भक्त आहोत असे सर्वांना सांगतात. पण श्री सिद्धरामेश्वर म्हणतात, दुसर्याने पिकवलेले धान्य शिजवून ते बेट्टबिल्लय देवासमोर नैवेद्य म्हणून ठेवून आपण खरे भक्त आहोत असे प्रदर्शन करणे व्यर्थ असते. म्हणून ते कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाला प्रार्थना करतात की, की मी केवळ आपल्या भक्तीची अपेक्षा करतो. माझ्या मनात सदैव तुमचे स्मरण राहावे. तुमच्या पवित्र चरणांचा मला कधीच वियोग घडू नये. अशी कृपा माझ्यावर करा. हे देवा तुमच्याशिवाय मी दुसर्यांचे कधीही स्मरण करत नाही. तुमच्या सेवेशिवाय माझे मन दुसरीकडे आकृष्ट होऊ नये, अशी कृपा माझ्यावर करा. ज्याप्रमाणे गायीकडे वासरासारख्या प्रेमभावनेने आपण जर गेलो तर ती आपल्याला दूध देते. त्याचप्रमाणे सेवाभावनेने आपण जर ईश्वराची उपासना केल्यास तो आपल्याला मोक्ष देतो. सर्व प्राणिमात्रांच्या दृष्टीने नम्र भाव हाच हितकर आहे.

असे श्री सिद्धरामेश्वर म्हणतात. सिद्धरामेश्वरांच्या वचनातून आपल्याला हा नम्र भाव, हे वैराग्य, ही भक्ती परायणता प्रकर्षाने दिसून येते. त्यांचा हा आदर्श आपण घेतला पाहिजे. परमेश्वराची भक्ती करत असताना आपले सर्वस्व, तन- मन- धन त्याच्या चरणी अर्पण केले पाहिजे. तोच खरा भक्त असतो, जो सर्वार्थाने ईश्वराला शरण गेलेला असतो. आणि त्याचे नामस्मरण करत असतो. अकराव्या शतकातील सिद्धरामेश्वरांच्या या वचनातील विचारांचा प्रभाव नंतर आपल्याला अनेक संतांच्या विचारावर झालेला दिसून येतो. वारकरी संप्रदायातील अनेक संतांचे विचार हे अकराव्या शतकातील महात्मा बसवेश्वर, श्री सिद्धयोगी रामेश्वर यांच्या प्रभावाखाली निर्माण झालेले दिसतात. सर्व संतांनी ईश्वराची भक्ती हीच आयुष्य तारण्यासाठी, जीवन सुकर होण्यासाठी उपयुक्त आहे हेच स्पष्ट केले आहे. श्री सिद्धरामेश्वर यांची ही भक्ती परायणता आपल्या सर्वांसाठीच आदर्श आहे.







# तिळगूळ घ्या आणि....!

निमित्त
मानसी चिटणीस

भारतीय उपखंडातील अनेक भागांत तेथील पर्यावरणाला अनुसरून त्या त्या भागात विशिष्ट सण साजरे केले जातात. मकरसंक्रांत' हा सण पर्यावरणावर अवलंबून नाही, तर पर्यावरण ज्याच्यावर अवलंबून आहे, अशा सूर्याशी जोडलेला आहे. सूर्य मकर वृत्तावर दिसू लागला की येणारा पहिला सण म्हणजे संक्रांत. सूर्य उत्तरेकडे सरकणार म्हणजे ऊन वाढणार, ऊर्जा वाढणार, वनस्पतींना अन्न तयार करायला अधिक वाव मिळणार, प्राण्यांना ते खायला मिळणार. जीवाला बरे वाटणार...


आनंदाचे दिवस असले की, उत्साह वाढतो, उत्सव, सण करावासा वाटतो. पूर्वी कदाचित हाच दिवस 'मकरसंक्रांत' म्हणून मानत असावेत. कालांतराने पृथ्वीच्या परांचन गतीमुळे दक्षिणायनाचा दिवस आणि सूर्याचा मकर राशीत प्रवेश करण्याचा दिवस यात अंतर पडले. भारतात खरेतर भारतीय उपखंडातच मकरसंक्रांत हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. एकाच दिवशी साजरा होत असूनही त्या सणाची नावे मात्र खूपच वेगळी आहेत. महाराष्ट्रात 'मकरसंक्रांत' किंवा 'संक्रांत' म्हणतात. 'तीळगूळ घ्या, गोड बोला' असे म्हणत तीळ आणि गूळ यांच्यापासून बनवलेल्या वड्या किंवा लाडू यांची देवाणघेवाण करतात. महाराष्ट्राच्या शेजारच्या कर्नाटकमध्येसुद्धा जवळजवळ महाराष्ट्रासारखाच हा सण साजरा होतो. उसाची सुगी झालेली असते. 'एल्लु' म्हणजे सफेद तीळ, भाजलेले शेंगदाणे, खोबऱ्याचे काप आणि बेळ म्हणजे गुळाचे खडे यांचे वाण सुपातून नेतात. त्यात कधी 'सक्कर अच्चू' म्हणजे बत्तासे, उसाचे करवे असेही पदार्थ ठेवतात. ते एकमेकांना देता- घेताना 'एल्लू बेळ तिंडु झोल्ले मातंडी' म्हणजे 'तीळगूळ खा चांगलेच बोला' असं म्हणतात.

महाराष्ट्राच्या वायव्येला असलेल्या गुजरात आणि राजस्थानमध्ये हाच सण 'उतराण' किंवा 'उत्तरायण' म्हणून साजरा होतो. तीळगुळाची चिक्की करतात. या मोसमात आलेल्या जवळजवळ सर्व प्रकारच्या फळभाज्या, शेंगभाज्या, कंदमुळे घालून मिश्रभाजी किंवा 'उंधीयू' करतात. पतंग उडविण्याचा मोठा जल्लोष असतो. जणू काही पतंगाच्या मार्गाने शर्यतच लागलेली असते सूर्यापर्यंत पोहोचायची... गोवा, आंध्रप्रदेश, झारखंड, मध्यप्रदेश, ओडिशा, प. बंगाल, बिहार, उत्तरांचल, उत्तरप्रदेश, मणिपूर सगळ्या प्रांतांमध्ये 'मकरसंक्रांत' साजरी केली जाते. आंध्रप्रदेशात हा सण चार दिवस असतो - १. भोगी, २. पेद्दा पांडुगा ३. कणुमा आणि ४. मुक्कनुमा हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाबमध्ये तिला 'माघी' म्हणतात. काश्मीरमध्ये 'शिशुर सैंक्रांत' म्हणतात. आसाममध्ये 'माघी बिहु' किंवा 'भोगाली बिहु' असे म्हणतात.

उत्तर प्रदेशमध्ये 'खिचडी' म्हणतात. दक्षिणेकडील प्रांतांमधूनही हा सण साजरा होतो. तामिळनाडूत त्याला 'पोंगल' म्हणतात. केरळ प्रांतात 'मकर विलु' म्हणतात. भारताबाहेर भारताजवळच्या देशांमध्येही हा सण साजरा होतो. नेपाळमध्ये 'तरुलोक-माघी', थायलंडमध्ये 'सोंगक्रान', लाओसमध्ये 'पि-मा-लाओ', म्यानमारमध्ये 'थिंग्यान' तर कंबोडियामध्ये 'मोहा संक्रांत' म्हणून हा सण साजरा होतो. या सणाशी अनेक पौराणिक कथाही जोडलेल्या आहेत.

मकर राशीचा स्वामी 'शनी' म्हटला जातो. ('शनी' या शब्दाचा अर्थ हळूहळू सरकणारा) तो सूर्यापासून निर्माण झाला आणि खूप लांब गेला. वर्षातून एकदा एक महिनाभर सूर्य शनीला भेटतो, तो हा सण. दुसऱ्या एका कथेत असे सांगितले आहे की, संक्रांतीपासून देवतांचा दिवस सुरू होतो. (देव लोकवर- उत्तरेकडे राहतात असे मानतात. उत्तरीय ध्रुव प्रदेशात या क्षणानंतर सूर्य दिसायला सुरुवात होते.) आणखी मजेदार दंतकथा अशीही आहे की, याच दिवशी भगीरथाने गंगा स्वर्गातून खाली आणली. काहीही असले तरी संक्रांत हा गोडव्याचा उत्सव आहे हेही तितकेच खरे. मला अजूनही आठवतेय, भोगीपासून संक्रांतीला सुरुवात व्हायची. पारोशानेच सवाष्णिला तीळ, वांगी, शिकेकाई, गूळ, कापूस, ओंब्या, लोणी- साखर इ. वाण दिल्यानंतरच घरातल्या इतर गोष्टींना सुरुवात व्हायची. सगळ्या भाज्या (गाजर, बोरं, शेंगदाणे, वांगी) एकत्र करून त्याची खास भोगीची भाजी बनवली जायची. सोबत तीळ लावलेली बाजरीची भाकरी आणि खिचडी असायची. अंघोळीच्या पाण्यातही तीळ घातलेले असायचे. दुसरा मुख्य दिवस संक्रांतीचा. या दिवशी आई, काकू सुगडांची पुजा करायच्या. घरात तिळाची वडी, लाडू, शेंगपोळी आणि गुळाची पोळी बनवली जायची. काळ्या रंगाचे कपडे घातले की, हमखास रागवणारी आजी मुद्दाम नवा काळा फ्रॉक घालायला सांगायची. नवीन लग्न झालेल्या कुणा ताईचा हलव्याच्या दागिन्यांनी सजवून फोटो काढला जायचा.

(पान ६ वर)



**थंडी ऐन बहरात येऊन गुलाबी होते. धुक्यांच्या लाटा सकाळ कुशीतून उमलायला लागतात. सांज अधिक गहिरी कातर होऊ लागते. पानगळीचे गालिचे रस्त्यांवर पहुडू लागतात अन् हिवाळा भरात येतो. शेकोटी, हुरडा, वांग्याचा लुसलुशीत कोवळेपणा, माघाची थंडी आणि जोडीला संक्रांतीचे तीळवण. एका सृजनोत्सवाची पेशकारी. तीळगूळ घ्या, गोड गोड बोला...**






**अमेरिकेने पुन्हा एकदा रशियन तेलखरेदीवरून भारतावर शुल्क लादण्याचा इशारा दिला. त्याचवेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही कौतुक केले. एकूणच काय तर जागतिक राजकारणात ऊर्जा किती महत्त्वाची भूमिका बजावते, हे ताज्या घडामोडींवरून स्पष्ट व्हावे. व्हेनेझुएलावरील कारवाईनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या रशियन तेलखरेदीवर ठेवलेले बोट, हे तेल नेमके जागतिक घडामोडींच्या केंद्रस्थानी का आहे, हेच अधोरेखित करणारे. भारताने रशियन तेलखरेदी थांबवली नाही, तर टॅरिफसारख्या आर्थिक शस्त्रांचा वापर केला जाऊ शकतो, असे सूचित करताना ट्रम्प यांनी एकाच वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुकही केले. ही दुटप्पी भाषा अमेरिकी राजकारणात नवी नाही. तथापि, भारतासाठी हा मुद्दा भावनिक किंवा वैचारिक नसून, पूर्णपणे व्यवहार्य असाच. म्हणूनच, हा इशारा समजून घेताना त्यामागची ऊर्जा-राजकारणाची गणिते उलगडणे आवश्यक ठरते.**

# ट्रम्प आणि भारताची ऊर्जा स्वायत्तता

लक्ष्यवेध

**संजीव ओक**

भारताची ऊर्जा-सुरक्षा ही त्याच्या आर्थिकवाढीचा कणा आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती मध्यमवर्गीय मागणी यामुळे भारताचे तेलावरचे अवलंबित्व आजही प्रचंड आहे. देशाला दररोज कोट्यवधी बॅरल कच्च्या तेलाची गरज लागते आणि त्यातील मोठा हिस्सा आयातीवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत परवडणार्या दरात सातत्याने तेल मिळणे ही आर्थिक नव्हे, तर सामाजिक स्थैर्याचीही अट. युक्रेन युद्धानंतर रशियन तेलावर पाश्चिमात्य देशांनी निर्बंध लादले. पण, भारताने आपल्या हितसंबंधांचा विचार करून रशियन तेलखरेदी सुरू ठेवली. हे तेल सवलतीच्या दरात मिळाल्यामुळे भारताला आर्थिक दिलासा मिळाला, चालू खात्याची तूट नियंत्रणात राहिली आणि महागाईचा फटका तुलनेने कमी बसला. रशियन तेलखरेदीचा निर्णय हा युद्धाला पाठिंबा देण्याचा नाही, तर भारतीय अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचा आहे. ट्रम्प यांच्या विधानामागे अमेरिकेतील अंतर्गत राजकारणाचाही मोठा संदर्भ आहे.

निवडणुकीच्या वातावरणात कठोर भूमिका, टॅरिफचा इशारा, व्यापारसंबंधांतील दबाव हे त्यांच्या राजकीयशैलीचे अविभाज्य भाग. 'अमेरिका फर्स्ट' या घोषणेखाली ते जागतिक व्यापाराला द्विपक्षीय दबावाच्या चौकटीत पाहतात. भारतावर टॅरिफ लावण्याचा इशारा देणे, हे त्याच शैलीचे प्रतिबिंब. पण, प्रत्यक्षात भारत-अमेरिका संबंध आज इतके व्यापक झाले आहेत की, एका मुद्द्यावरून त्यांना धक्का देणे अमेरिकेलाही परवडणारे नाही.भारत आणि अमेरिका आज व्यापारी भागीदार आहेतच, त्याशिवाय इंडो-पॅसिफिकमधील सामरिक संतुलन, चीनचा वाढता प्रभाव, तंत्रज्ञान, संरक्षण सहकार्य, सेमीकंडटर उद्योग, डिजिटल अर्थव्यवस्था अशा अनेक पातळ्यांवर हे दोन्ही देश एकमेकांवर अवलंबून आहेत. अशा वेळी रशियन तेलाच्या मुद्द्यावरून भारताला खिंडीत पकडणे, ही भूमिका अमेरिकेच्या दीर्घकालीन धोरणाशी विसंगत ठरेल. त्यामुळे ट्रम्प यांचे विधान हा दबावाचाच भाग असून, ते अमेरिकेचे धोरण नाही हे लक्षात घेतले पाहिजे. याच पार्श्वभूमीवर व्हेनेझुएलाचा संदर्भ समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

व्हेनेझुएलाकडे जगातील सर्वाधिक तेलसाठे आहेत. तरीही, गेली अनेक वर्षे ते तेल जागतिक बाजारात मोठ्या प्रमाणावर येऊ शकलेले नाही. याला तेथील राजकीय अस्थिरता, आर्थिक अराजक आणि अमेरिकेचे निर्बंध कारणीभूत आहेत. अमेरिका लोकशाही आणि मानवी हक्कांच्या मुद्द्यावर व्हेनेझुएलावर कठोर निर्बंध लादत आली आहे. मात्र, रशियन तेलावर निर्बंध लादल्यानंतर जागतिक बाजारात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी आता त्याच व्हेनेझुएलाकडे अमेरिकेची नजर वळताना दिसून येते. रशियावर निर्बंध म्हणजे नैतिकता; पण व्हेनेझुएलाच्या बाबतीत गरज भासली की, निर्बंध शिथिल करण्याची तयारी अशी अमेरिकेची स्वार्थी भूमिका. यावरून ऊर्जा-राजकारणात मूल्यांपेक्षा पुरवठा आणि नियंत्रण हेच निर्णायक घटक असतात, हे पुन्हा अधोरेखित होते. अमेरिकेला व्हेनेझुएलाचे तेल हवे आहे. कारण, त्यामुळे रशियन तेलावरील अवलंबित्व कमी करता येईल आणि जागतिक बाजारात तिला प्रभाव वाढवता येईल. मात्र, प्रत्यक्षात हे कितपत शय होणार आहे? हाही प्रश्न कायम आहे.

अमेरिकेला व्हेनेझुएलाचे तेल क्षेत्र पुन्हा उभे करणे घोषणाबाजीपेक्षा कितीतरी पटींनी कठीण आहे. तेथील राजकीय स्थैर्याचा अभाव अमेरिकेला यश देईल का? हा प्रश्न आहे. त्याशिवाय, तेथील सरकारी तेल कंपनी आतून पोखरलेली असून, कुशल मनुष्यबळ, देखभाल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांचा अभाव आहे. हे सगळे एका रात्रीत उभे करता येणार नाही. तसेच अमेरिकी तेल कंपन्यांचा अनुभव फारसा चांगला नाही. उत्पादन वाढवण्यासाठी पायाभूत सुविधा, उपकरणे आणि कुशल कर्मचारी लागतात. उद्योगतज्ज्ञांच्या मते, किमान दोन ते तीन वर्षे तरी याचे ठोस परिणाम दिसणार नाहीत. म्हणजेच, ट्रम्प किंवा कोणताही अमेरिकी नेता अब्जावधी डॉलरची भाषा करत असला, तरी व्हेनेझुएलाचा तेल उद्योग पुनरुज्जीवित करणे हे अमेरिकेसाठी सोपे नाही.

भारतासाठी व्हेनेझुएला हा पर्याय कितपत व्यवहार्य आहे, हा वेगळाच प्रश्न. भौगोलिक अंतर, पायाभूत सुविधांची मर्यादा, राजकीय अनिश्चितता आणि अमेरिकेचे निर्बंध या सगळ्या बाबी भारताच्या दृष्टीने अडथळे ठरतात. शिवाय, रशियन तेलासारखी सवलत आणि सातत्य व्हेनेझुएलाकडून तत्काळ मिळेल, याची खात्री नाही. त्यामुळे भारतासाठी रशियन तेल हा सध्या सर्वाधिक व्यवहार्य पर्याय ठरतो. मात्र, याचा अर्थ असा नाही की, भारत दीर्घकाळ रशियन तेलावरच अवलंबून राहणार आहे. भारताची ऊर्जा रणनीती तीन स्तरांवर उभी आहे.

अल्पकालीन स्तरावर परवडणारे तेल आणि महागाई नियंत्रण. मध्यमकालीन स्तरावर पुरवठ्याचे विविधीकरण यात मध्य-पूर्व, आफ्रिका, लॅटिन अमेरिका येथील पर्याय यांचा समावेश होतो आणि दीर्घकालीन स्तरावर नवीकरणीय ऊर्जा, इलेट्रिक वाहने, ग्रीन हायड्रोजन आणि स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल. रशियन तेल ही भारताने स्वतःची केलेली तात्पुरती सोय आहे.

अमेरिकी दबावाला भारताने आत्मविश्वासाने उत्तर देणे गरजेचे आहे. कोणत्याही देशाच्या इशार्‍यावर काम करणारा नव्हे, तर स्वतःच्या आर्थिक वास्तवावर आधारित निर्णय घेणारा देश, हीच भारताच्या परराष्ट्र धोरणाची ओळख कायम राहिली पाहिजे. रशियन तेलाचा मुद्दा हा व्यवहार्यतेचा आहे. अमेरिका स्वतः आपल्या हितासाठी नियम वाकवते, तेव्हा भारतानेही आपल्या गरजांना प्राधान्य देणे स्वाभाविक. पुढील काळात ऊर्जा-राजकारण अधिक गुंतागुंतीचे होणार आहे. रशिया, अमेरिका, मध्य-पूर्व, व्हेनेझुएला आणि आशियातील मोठे ग्राहक देश यांच्यातील संघर्ष वाढतच जाणार आहे. या संघर्षात भारताला संतुलन राखत पुढे जावे लागेल. ही केवळ भारताच्या तेलपुरवठ्याची कसोटी नाही, तर भारताच्या स्वायत्त जागतिक भूमिकेची आहे आणि ती पार करण्याची क्षमता भारताकडे आहे, असे नक्कीच म्हणता येते.

---

# मध्यमवर्गीय ब्रँड

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

दिल्लीच्या कनॉट प्लेसमधील एका चकचकीत दुकानात त्या एका सॉक्सच्या जोडीची किंमत १५०० रुपये बघून मी दचकलो. असे वाटले की, माझ्या वाचण्यात चूक झालीय किंवा त्या टॅगवर प्रिंटिंग मिस्टेक झालीय. माझ्या बाजूला उभ्या असलेल्या, अत्यंत मृदू आवाजात बोलणार्‍या, दुकानाच्या ड्रेसकोडनुसार विशेष युनिफॉर्म परिधान केलेल्या एका मुलाला मी परत एकदा त्या सॉक्सच्या जोडीची किंमत विचारली. त्याने इंग्रजी भाषेतच मला तीच किंमत सांगितली.

माझ्या चेहर्‍यावर आलेले ते मध्यमवर्गीय आश्चर्य बघून त्याने त्या किमतीचे विश्लेषण सुरू केले. मी उभ्या आयुष्यात सॉक्स नावाचा प्रकार वापरलेला नसून मला त्याच्या वापरापासून सारे काही सांगायचे आहे, या टोनमध्ये त्याने त्याची कथा सुरू केली. त्या आधी एक गोष्ट स्पष्ट करतो. सॉक्सची जोडी म्हणजे एका पायाचा एक व दुसर्‍या पायाचा दुसरा, हे स्पष्ट केले. कारण जोडी म्हणजे माझ्यासारख्या समस्त मध्यमवर्गीय बिचार्‍या मंडळींच्या मनात एक अधिक एक म्हणजे दोन जोड असे येऊनच जाते. त्याने सांगितलेल्या कथेचा सार असा होता की, ही सॉक्सची जोडी एका नामांकित ब्रॅन्डेड कंपनीची आहे आणि या/चाच अर्थ असा की, त्या कंपनीने हे सॉक्स नेमके कसे बनविले, त्यात मटेरियल काय वापरले, त्याची किंमत इतकी जास्त का आहे, या कंपनीला हे बनवायला किती खर्च आला असेल, त्याची मूळ किंमत किती असेल, शोरूममध्येइतक्या महाग किमतीत का विकतात; कदाचित हे सारे मेंटेन करण्याची किंमत आपल्याकडून वसूल करतात, म्हणूनच आजकाल मोठाल्या शोरूम चालत नाहीत. शेवटी काहीही असले तरी सॉक्स पायातच घालायचे आहेत असले मध्यमवर्गीय प्रश्न किंवा त्यांची आपण देत असलेली उत्तरे मनात न आणता, ते सॉक्स घ्यायचे व क्रेडिट कार्डने काहीही न बोलता त्याचे पेमेंट करायचे एवढाच होतो. येथे डिस्काऊंट जर लिहिला असेल तरच मिळेल. 'बरोबर किंमत लगाना' हे मराठी व हिंदी मिश्रित वाक्य या दुकानात उच्चारणे या दुकानात असभ्यपणाचे लक्षण मानले जाते. असो. मूळ मुद्दा हा की, ते सॉक्स जेथून उचलले तेथे ठेवून दे. ते तुझ्या कामाचे नाही, हे वाक्य न बोलताही त्या पोराच्या चेहर्‍यावर मला दिसले होते. परंतु माझा वैदर्भीय बाणा जागृत झाला व मग मी त्या दुकानातल्या जवळपास सर्वच महत्त्वाच्या वस्तूंचे भाव बघणे सुरू केले. जसे जसे मी ते बघायला लागलो, तसे तसे माझ्या मनात वेगवेगळे विचार येऊ लागले. घ्यायचे म्हटल्यास मी त्यापैकी काही वस्तू तर निश्चित घेऊ शकत होतोच. माझ्या जवळच्या क्रेडिट कार्डमध्येतेवढे क्रेडिट निश्चितच होते. परंतु त्या वस्तूसाठी मी एवढी भली मोठी किंमत का द्यावी, हा प्रश्न माझ्या मनात सारखा येत होता.

उदाहरणार्थ लेदर बेल्ट ५५०० रुपयांना, हातरुमाल जोडी ९०० रुपयांना, परफ्यूम ५४०० रुपयांना, लेदर बॅग २३००० रुपयांना, कीचेन ३२०० रुपयांना, वॉलेट ७५०० रुपयांना, टाय पीन २६०० रुपयांना, बुट कमीत कमी किंमत ९४०० रुपये व पुढे १७,३०० वगैरे होती. या सार्‍या किमती बघितल्यानंतर एक लेदर बेल्ट ५५०० रुपयाला किंवा सॉक्सची एक जोडी १५०० रुपयाला घेण्याची माझी कुवत होती, परंतु माझे मन त्यासाठी तयार नव्हते. कदाचित मध्यमवर्गीय कुटुंबात जीवनाचे दृष्टिकोन तयार झाले असावेत म्हणून माझे मन धजावत नसेल किंवा तशी मला सवय नाही म्हणूनही असेल. पैसे जवळ असतानाही हा खर्च मला अनाठायी वाटत होता. ब्रँडेड या गोष्टींची सवय किंवा क्रेझ असलेल्या (क्रेझ हा शब्द 'कोल्ह्याला द्राक्षे आंबट' या अर्थाने नाही तर 'मानसिकता' या अर्थाने वापरलाय!) मंडळींना ते कदाचित सहज शक्य असेल, परंतु मला माझा मध्यमवर्गीय विचार हा खर्च करायला परवानगी देत नव्हता.




अशा पद्धतीच्या पाच ते सहा वेगवेगळ्या ब्रँडच्या दुकानांमध्ये अशाच किमती बघून व काहीही न घेता मी कनॉट सर्कलच्या बाहेर पडलो. बाहेर पडल्यावर दुसर्‍या एका व्यवस्थेत जाण्याचा निर्णय घेतला. दिल्ली पालिका बाजार. अनेक दुकानांच्या त्या जमिनीखालील मार्केटमध्ये प्रवेश केल्याबरोबर कनॉट प्लेसचा संपूर्णपणे वेगळा अनुभव अगदी दरवाज्यावरच आला.

सॉक्स विकणारा एक पोरगा माझ्या जवळ आला व मला त्याने चार सॉक्स जोड्यांची (येथे जोडी म्हणजे दोन पायाचे दोन मिळून एक जोडी अशा चार जोड्या) एकूण किंमत २०० रुपये सांगितली. मी त्याची क्वालिटी बघितली व नंतर घेऊ असा विचार करून त्याला नाही म्हणून निघालो. त्यानंतर सुरू झाला खास पालिका बाजार स्टाईल व्यवहार. तो पोरगा माझ्या मागेच लागला. त्याने मला मी किती पैसे देऊ शकतो, हे विचारणे सुरू केले. काय बोलावे ते सुचेना. त्याने भाव कमी करणे सुरू केले व तो मला सॉक्स घेण्याची विनंती करू लागला. भाव कमी करता करता २०० रुपयाचे त्याने ८० रुपये सांगितले. आता मला त्या सॉक्सच्या क्वालिटीबद्दल शंका वाटू लागली. त्यामुळे मी ते न घेता तेथून पुढे निघालो. तेथील प्रत्येकच दुकानात ब्रँडेडच्या नावाखाली वेगवेगळ्या वस्तू विकल्या जात होत्या. त्या वस्तूंच्या किमती मात्र प्रत्यक्ष सांगायच्या व द्यायच्या वेगवेगळ्या होत्या. या दोन्हीमधील तफावत दूर करणे हे दुकानदाराचे कसब बघण्यासारखे असते. वस्तूची किंमत इतक्या मोठ्या प्रमाणात कमी केली जाते व त्यासाठी इतका संघर्ष करावा लागतो की, प्रत्येक वेळी अजूनही किंमत कमी केली असती, असाच भाव प्रत्येकाच्या मनात येतो व त्यामुळे येथे वस्तूच्या क्वालिटीपेक्षा किती कमी भावात मिळाली हे केंद्रिभूत ठरते. कारण एकदा दुकान सोडले की, ती वस्तू आपली झाली असते व त्यानंतर त्यामध्ये काहीही डिफेक्ट असल्यास तो दुकानदार आपल्याला ओळखतही नाही. माझी येथेही पंचाईत होत होती. वस्तूच्या क्वालिटीबद्दलच शंका मनात येत असल्याने काही घेता येत नव्हते. एका दुकानात मिळणारे ५०० रुपयांचे जॅकेट दुसर्‍या दुकानात केवळ १५० रुपयाला विकले जाते. त्यामुळे कोणतीही वस्तू विकत घेण्याचे समाधान लाभत नाही. कनॉट प्लेसमध्ये माझी समस्या वेगळी होती. येथे त्या समस्येचे दुसरे रूप मला अनुभवायला मिळाले.

मी ज्या सामाजिक व्यवस्थेचा सदस्य आहे त्याला मध्यमवर्गीय का म्हणतात याचा प्रत्यक्ष अनुभव मी या दिल्लीच्या दोन अत्यंत लोकप्रिय मार्केटमध्ये घेतला. कसलीही खरेदी न करता बाहेर पडलो व जवळच असलेल्या बागेमध्ये जाऊन बसलो. दिल्लीला जाऊन काहीच खरेदी केली नाही, या प्रश्नाचे काय उत्तर द्यायचे याची जुळवाजुळव करायला लागलो. हे असे अनुभव मला का आले आणि या दोन्ही व्यवस्थांमध्ये मी का खुश नाही, याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला. मुळात झाले असे आहे की, मी या वस्तूंमध्ये अडकलोय. या वस्तूंच्या किमती, वस्तूंची वैविध्यपूर्ण उपलब्धता, त्याच्या चमकदार जाहिराती, वस्तूच्या उपयोगीतेपेक्षा तिचा ब्रँड किंवा तिची कमीत कमी किंमत याच गोष्टी मला जास्त आकर्षित करू लागल्यात.

वस्तू ही मुळात वापरून संपणारी बाब आहे, हेच मला कळेनासे झालेय. त्यामुळे त्याच्या किमती आणि त्याच्या माझ्याजवळ असण्याचा वृथा अभिमान हेच माझे विश्व बनलेय. ॲपल कंपनीचा फोन माझ्या किती वापराचा आहे यापेक्षा तो माझ्या हातात ठेवून मी किती लोकांना दाखवू शकतो, हे माझे ध्येय आहे. असा मी मध्यमवर्गीय माझी मूळ ओळख विसरलोय. माझी मूळ ओळख वस्तूंच्या बाळगण्यात नाही तर ती एकमेकांसोबत वाटून घेण्यात आहे. फोन असण्यापेक्षा प्रत्यक्ष संवेदनशील संवाद माझे बलस्थान आहे.

स्वतंत्रपणे माझ्या चौकटीचा विचार करण्यापेक्षा सर्वांना सोबत घेऊन आनंद साजरा करणे ही माझी ओळख आहे. वस्तूंचे वेगवेगळे ब्रँड माझे जीवन समृद्ध करीत नाहीत तर माझ्या जीवनाच्या साध्या साध्या क्षणांना म होत्सवांमध्ये परावर्तित करून आनंद लहरी निर्माण करणे, हा माझा खराखुरा ब्रँड आहे. भौतिकतेच्या या असंख्य ब्रँड्समध्ये तो आपल्याला जपता यायला हवा.

---

# सीमन्तोन्नयन

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

गर्भधारण केल्यापासून गर्भिणी स्त्रीच्या शरीरात प्रतिदिन बदल होत असतात. गर्भाशयातला गर्भ दिसामासी वाढत असतो. त्या सगळ्या बदलांशी जुळवून घेणं खरं तर होणार्‍या आईसाठी एकेका आव्हानाला तोंड देण्यासारखंच असतं. पहिलटकरीण असली तर गर्भारपण हा एक वेगळाच अनुभव असतो आणि त्यानंतरच्या प्रत्येक बाळंतपणात वेगवेगळे नवनवीन अनुभव येतच असतात.

मग एकाहून जास्त वेळा बाळंत झालेल्या आया प्रत्येक बाळंतपणात आलेले स्वत:चे अनुभव अगदी खुलवून सांगतात. मुलीचं किंवा मुलाचं नाव आणि पुढे'.... च्या वेळीनं विचित्रच वाटत होतं....' अशी त्यांच्या अनुभवकथनाला सुरुवात होते.त्यात पोटात वाढणार्‍या बाळासाठी आपण काय काय आणि कसं कसं सोसलं, सहन केलं, तोंड दिलं याचं सविस्तर वर्णन करण्यात येतं. हा त्या आईचा प्रत्येक बाळंतपणात आलेला स्वतंत्र स्वानुभव असतो. तो इतर कोणीही घेऊ शकत नाही असा. इंग्रजीत ज्याला एक्सक्ल्यूझिव्ह म्हणतात तसं असतो.




अर्थात स्त्रीचं शरीर, मन आणि बुद्धी हे एकत्रित रसायन या अनुभवांना यशस्वीपणे सामोरं जाण्यासाठीच घडलेलं असतं. त्यामुळे या सगळ्या अनुभवांतून जाताना त्याच्या मुळाशी असते ती याचा शेवट म्हणजे एक तिच्याच सारखा दुसरा जीन जन्माला येणार आहे ही तिला असलेली आस. म्हणूनच ते नवजात पाहिल्यानंतर तिला कृतार्थ झाल्यासारखं वाटतं आणि आनंदाश्रू झरू लागतात.

हा सगळा कालखंड गर्भिणी आणि गर्भ या दोघांचे बंध सुदृढ करणारे असतात. त्यात इतरांची भूमिका सहयोगाची असते. त्यातल्या त्यात होणार्‍या बाळाचा पिता हे सारं बघत असतो. यात आपलाही काही हातभार लागावा अशी इच्छा असूनही पूर्वीच्या काळातील एकत्र कुटुंबात हे शक्य होत नसे.

त्यामुळे गर्भारपणाच्या प्रक्रियेनं काहीशी त्रासलेल्या आणि खूपशी थकलेल्या आपल्या बायकोला मानसिक आधार देणारा पुरुष सीमंतोन्नयन हा विधी करत असतो. गर्भारपणाच्या सहावा महिना सुरू झाल्यानंतर आणि आठवा महिना पूर्ण होण्यापूर्वी हा संस्कार करण्यात येतो. सातव्या महिन्यात किंवा आठव्या महिन्यात गर्भ पडू नये हे मुख्य कारण त्यामागे आहे.

शिवाय तू एकटी नाहीस मी तुझ्यासोबत आहे हे पती आपल्या गर्भिणी पत्नीला कृतीतून दाखवून देतो. इतर सर्वच संस्कारांप्रमाणे यातही अग्निपूजन आणि इतर विधी केले जातात. त्यानंतर पती गर्भभारानं क्लांत झालेल्या पत्नीचे केस विंचरून भांग पाडून देतो. त्यावेळी त्याला एक मंत्र म्हणायचा आहे तो असा -

**'येनादितेः सीमानं नयाति प्रजापतिर्महते सौभगाय ।**
**तेनाहमस्यौ सीमानं नयामि प्रजामस्यै जरदष्टिं कृणोमि ।।'**

(ज्याप्रकारे प्रजापतीनं देवमाता अदितीचे सीमंतोन्नयन करून तिचे सौभाग्य वाढवले होते त्याचप्रमाणे मीदेखील माझ्या गर्भवती पत्नीचे सीमंतोन्नयन करत आहे. ज्यायोगे हिच्या संतती दीर्घायू तसेच वृद्धापकाळ पर्यंत स्वस्थ आणि सुखी राहावी.) या संस्कारामुळे गर्भवतीचं मानसिक बळ वाढून त्यात सकारात्मक विचार असावेत आणि गर्भानं पूर्ण वाढ होईपर्यंत गर्भाशयातच राहावं, जन्मानंतरही त्याची वाढ योग्यप्रकारे व्हावी इत्यादी सर्व शुभेच्छा त्यात सामावलेल्या असतात. हा त्या विधी मागचा हेतू सांगितला जातो. तो योग्यही आहे.

कारण गर्भपात होणं, आईच्या पोटात असतानाच बाळ मृत होणं, जन्मल्यानंतर ते अल्पायुषी ठरणं, बालवयात होणार्‍या देवी, कांजिण्या, हगवण, पोलिओ यासारख्या एखाद्या रोगानं त्याचा अपमृत्यू होणं किंवा एखादा अवयव गमावणं, यासारख्या दुर्दैवी घटना घडू नयेत म्हणूनपिता या नात्यानं हा संस्कार करण्याची पद्धत गेल्या अनेक सहस्रकांपासून या भूमीत रुळलेली आहे.

यामागची आणखी दोन तर्कसंगत कारणं आहेत, त्याविषयी फारशी चर्चा होताना दिसत नाही. यातला पहिलं कारण म्हणजे वानर प्रजातीतली सापुच्छ माकडांच्या जाती आणि विपुच्छ वनमाणसाच्या जाती केसांतून हात फिरवणं, केसांतून उवा आणि तत्सम जीव शोधणं या सारख्या कृती करत असतात.

प्राणी शास्त्रज्ञांनी याकृतीला नाव दिलं आहे 'ग्रूमिंग.' ही कृती समूहातील सगळ्या सदस्यांच्या समोर केल्या जाते. अर्थात या प्राण्यांत एकांत म्हणजे प्रायव्हसी ही संकल्पना नाही. त्यामुळे मनुष्य प्राणी ज्या कृती एकांतात करतो त्या सगळ्या कृती इतर प्राणी सर्वासमक्ष करत असतात. त्यामुळे ग्रूमिंग ही कृतीही त्याला अपवाद नाही. या कृतीतून ज्याचं ग्रूमिंग केलं जातं तो किंवा ती त्या समूहचा/ची अधिकृत सदस्य असल्याची पावती असते.

एकमेकांसोबत गुणवत्तापूर्ण वेळ (क्वालिटी टाईम) घालवण्याची त्यांची पद्धत आहे. यातून ते परस्परांविषयी वाटणारं प्रेम, काळजी, आस्था व्यक्त करत असतात. शिवाय त्या दोघांत एक स्नेह बंध निर्माण होऊन तो सुदृढदेखील होतो. माणूसही त्याला अपवाद नाही. त्यामुळेच गरोदर पत्नीविषयी वाटणार्‍या भावना पती सर्वांच्या साक्षीनं तिचे केस विंचरून तिचा भांग पाडून देत व्यक्त करतो. या सगळ्या विधीला एक भावनिक पैलू तर आहेच;

शिवाय आपल्या आदिम स्मृतीचा एक भागदेखील जपण्यात आला आहे हे विशेष. त्याचप्रमाणे जन्माला येऊ घातलेल्या अर्भकाचा पिता म्हणून तो जबाबदारी स्वीकारतो. गर्भशयात वाढणारा गर्भ हा वैध संबंधांतून निर्माण झाला आहे याची शाश्वती देतो. त्याचं लालन-पालन, संगोपन, विद्या इत्यादी करून तिला किंवा त्याला सुजाण नागरिक करण्याचं दायित्व पिता म्हणून माझं आहे, ही मान्यता या संस्काराच्या माध्यमातून तो देत असतो.

यातलं मर्म असं आहे की, प्राचीन भारतात तारुण्यात वैधव्य आले किंवा पती गर्भाधान करण्यास सक्षम नाही, अशा स्त्रीचा माता होण्याचा अधिकार नाकारला जात नसे. कुटुंबीयांच्या संमतीनं दुसर्‍या एका सुयोग्य पुरुषाची नियुक्ती त्या स्त्रीचा बीजांड फलनासाठी करण्यात येत असे. त्याला नियोग पद्धतीनं गर्भधारणा म्हणत.

**संदर्भ :**
महाभारत. त्यामुळे होणार्‍या बाळाचे जैविक पिता कोणीही असो त्याच्या पालकत्वाचा स्वीकार सीमन्तोन्नयन या संस्काराद्वारे पिता करत असे.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

**अरवलीची उंच शिखरे पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. ती धूळ थांबवतात, पाणी जमिनीत मुरायला मदत करतात, जैंवविविधतेचे संरक्षण करतात आणि वन्यजीवांना आश्रय देतात. उत्तर-पश्चिम भारतातील ही पर्वतरांग भारतातील सर्वात जुनी पर्वतरांग म्हणून ओळखली जाते. जनआंदोलनाच्या रेट्यामुळे आता खाणमाफियांपासून अरवली पर्वताचे संरक्षण करण्याबाबतचा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. यानिमित्ताने...**



# अरवलीची लढाई जिंकली, पण...!

देशात अनेक प्रश्न आहेत. मात्र त्यातही पर्यावरणीयदृष्ट्या बघायचे तर डोंगर, डोंगरउतारावर होणारी घातक विकास कामे आणि अयोग्य पद्धतीने होणारे खाणकाम अत्यंत गांभीर्याने घेणे गरजेचे असते. भविष्याचा, पर्यावरणाचा, पुढील पिढ्यांच्या आरोग्याचा प्रश्न असल्यामुळे त्याला वेगळे महत्त्व प्राप्त होते. या पृष्ठभूमीवर अरवली पर्वतरांगांशी संबंधित घटनेचा अर्थ जाणून घ्यायला हवा.

अलिकडेच न्यायालयाने अरवली पर्वतात खाण उद्योगाला परवानगी न देण्याचा निर्णय दिला. अर्थातच जनमताच्या रेट्याने घेतल्या गेलेल्या या निर्णयाचे स्वागत झाले. खेरीज अरवलीची व्याख्या सुस्पष्ट झाल्याने काम सोपे झाले. आता त्याची अंमलबजावणी कशी होते हे बघावे लागेल. कारण या संपूर्ण प्रदेशात बेकायदेशीर खाणकामाचे तब्बल २७०३ गुन्हे दाखल झाले होते. त्यातील १४७८ गुन्हे तर गेल्या अवघ्या दोन वर्षातील आहेत. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, आजही राजस्थानच्या या प्रदेशात पोलिस, वन विभाग आणि खाण अधिकाऱ्यांच्या संगनमताने तीन ते चार हजार ठिकाणी अवैध खाणकाम सुरू आहे. राजस्थानमधील माजी खाण संचालक दीपक तंवर म्हणतात की, येथील सरकारे नेहमीच बेकायदेशीर खाणकामाला पाठीशी घालत आली आहेत. २००२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातल्यानंतरही अरवलीमध्ये अवैध खाणकामाची २१,७७८ प्रकरणे नोंदविली गेली आहेत. अरवलीमधील कायदेशीर खाणींची संख्या बघायची तर २० जिल्ह्यांमध्ये ११ हजारांहून अधिक खाणींचे वाटप करण्यात आले आहे. यापैकी अंदाजे १० हजार खाणी १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या भागात आहेत. १०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या एकूण १००८ खाणी नोंदणीकृत आहेत. १०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या खाणींपैकी ७४७ खाणी सध्या कार्यरत आहेत. या श्रेणीतील २६१ खाणी नूतनीकरणाच्या प्रक्रियेत आहेत. १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या भागात अंदाजे ९,५०० खाणी कार्यरत आहेत.

थोडक्यात सांगायचे, तर अंदाजे ९०० चौरस किलोमीटर क्षेत्रात सुमारे १० हजार खाणी कार्यरत आहेत. अरवली पर्वतरांगेमध्ये लुनी, साबरमती, साहिबी, बेडच (अयाड), खारी, सुकडी, कोठारी, सोम, जख्मी आणि कमला यांसारख्या नद्या उगम पावतात. त्याचबरोबर नक्की, पुष्कर, जैसमंद, मातृकुंडिया आणि बेनेश्वरसारखी अनेक सरोवरेही इथे आहेत. म्हणूनच अरवली पर्वतरांग भारताचा कणा आहे. ही पर्वतरांग चार राज्यांमधून जात असून उत्तरपश्चिम भारतात सुमारे ६७० किलोमीटर लांब पसरलेली आहे. ही पर्वतरांग दिल्लीजवळ सुरू होते, दक्षिण हरयाणा आणि राजस्थानच्या आतल्या भागापर्यंत पसरते आणि पुढे गुजरातमध्ये अहमदाबादजवळच्या मैदानी भागापर्यंत विस्तारते. 'गुरू' हे अरवलीचे सर्वात उंच शिखर असून त्याची उंची सुमारे एक हजार ७२२ मीटर इतकी आहे. ते राजस्थानच्या माऊंट आबू येथे आहे. अरवली सुमारे ६७ कोटी वर्षे जुनी पर्वतरांग आहे. ही पर्वतरांग नसती तर उत्तर भारतातील अनेक नद्या अस्तित्वातच नसत्या. खेरीज अनेक जंगले, वनस्पती, मौल्यवान खनिजे आणि मोठे पर्यावरणीय वैभवही बघायला मिळाले नसते.

'अरवली' हा शब्द संस्कृतमधील 'अर्बुदावली'पासून तयार झाला आहे. राजस्थानच्या इतिहासात या पर्वतरांगेचा उल्लेख 'आडावळ' या नावाने आढळतो. थोडक्यात, ही पर्वतरांग एक प्रकारची संरक्षणरेषा असून वाळवंट, प्रचंड धूळ आणि पाण्याची टंचाई यांच्यासारख्या अनेक अडथळ्यामध्येही शांतपणे उभी आहे. त्यामुळेच ही उत्तर भारताची सगळ्यात जुनी 'टाईम कॅप्सूल' असून सर्वात नाजूक वर्तमानही आहे, असे आपण म्हणू शकतो. भारतीय प्लेट आणि प्राचीन खंडांमध्ये टक्कर झाली, जमिनीत खचदरी तयार झाली (रिफ्टिंग) आणि अवसादन आणि अशा अनेक बदलांमुळे अरवली पर्वतरांग तयार झाली, असे तज्ज्ञ सांगतात. भूगर्भशास्त्रीय भाषेत प्रोटेरोझोईक नावाने ही प्रक्रिया ओळखली जात जाते. 'अरवली-दिल्ली ऑर्गेनिक बेल्ट' म्हणून हा सगळा भाग अधोरेखित केला जातो.

थोडक्यात सांगायचे, तर हा सगळा भूखंड महाद्वीपीय तुकड्यांची टक्कर आणि हळूहळू होणाऱ्या पर्वतनिर्माणामुळे तयार झाला आहे. भू-तंत्राचा विशेष भाग म्हणजे अरवलीचे दगड आणि त्यातील भेगा तयार होण्यासाठी प्रचंड काळ जावा लागला असला, तरी ते तुटणे मात्र अतिशय सोपे आहे. येथील दगळ फोडण्यासाठी कोणत्याही स्फोटाची गरज लागत नाही. त्यामुळेच येथे खाणकाम, कापकाम, रस्ते बांधणे वा आणि कॉंक्रिटीकरण सोपे होते.

अरवलीला उत्तर भारताची 'हिरवी भत' म्हणजेच 'ग्रीन वॉल'ही म्हटले जाते. ही पर्वतरांग पूर्वेकडे थार वाळवंटाचा विस्तार रोखणारी नैसर्गिक भिंतच आहे. ती वनस्पती, माती, उतार आणि पाणी साठवण्याची क्षमता या सगळ्या अंगाने महत्त्वपूर्ण आहे. काही तांत्रिक अहवालांनुसार अरवलीमध्ये अनेक 'गॅप्स- ब्रीच' (अंतर-भंग) दिसतात. म्हणजे काही ठिकाणी टेकड्यांची अखंड रांग तुटते आणि मार्ग मोकळा झालेला दिसतो. त्यामुळेच धुळीची वादळे फक्त हंगामी घटना नसून बदलत्या भूशास्त्रीय घटकांचे सूचक लक्षण असल्याचे तज्ज्ञ सांगतात. या पर्वतरांगेत छिद्र म्हणजेच पोकळी वाढत आहे.

अर्थातच यासाठी कोणतेही एक कारण सांगता येणार नाही. कुठे बेकायदेशीर खाणकाम सुरू आहे, कुठे खाण वाढवली जात आहे, कुठे नियोजनाशिवाय शहरे वाढत आहेत तर कुठे रस्ते आणि रेल्वे यासारख्या प्रकल्पांनी भूरचना बदलत आहे. सध्या लोक अनेक भागांकडे उद्यान म्हणून पाहतात. तसाच त्याचा अतिवापरही करतात. पण मुळात तो भाग भौगोलिक संरक्षण रचनेसाठी महत्त्वपूर्ण असतो. धूळ थांबण्यासाठी, सूक्ष्म जलवायू निर्माण करण्यासाठी, जैवविविधता टिकविण्यासाठी अत्यावश्यक असणारी ती एक संरक्षणात्मक यंत्रणा असते.

अरवली पर्वतरांगा दुरून ओसाड दिसतात. पण हेच वन्य प्राण्यांचे घर असल्याचे विसरून चालणार नाही. कारण इथे बिबट्या, लांडगा, कोल्हा, नीलगाय, साळिंदर यासारखे प्राणी राहतात. म्हणूनच हा परिसर अखंड ठेवण्याची गरज आपण ओळखायला हवी. पर्वतांमध्ये रस्ते आणि 'कट-लाईन' तयार होतात तेव्हा भूभाग लहान लहान बेटांमध्ये विभागला जातो. अशा लहान बेटांमध्ये मोठे शिकारी प्राणी टिकू शकत नाहीत. परिणामस्वरूप मनुष्य आणि प्राणी यांच्यात संघर्ष वाढतो.

सरतेशेवटी ठरावीक ठिकाणी वन्य जीव राहिलेच नाहीत... हे कारण पुढे करून विकासाच्या नावाखाली त्या भागाचा विनाश होतो. या अर्थाने बघता अरवलीच्या दक्षिण भागातील उदयपूर-मेवाड क्षेत्रात वन्य जिवांचा इतिहास हा केवळ नैसर्गिक इतिहास नाही तर राजकीय आणि सामाजिक दुरवस्थेचा इतिहासही आहे, हे समजून घ्यायला हवे.

जगातील सर्वात सुंदर शहरांपैकी एक असणारे उदयपूर अरवलीशिवाय वसू शकले नसते. पूर्वीच्या काळात 'रिंग फेन्स शहर' या नावाने ओळखला जाणारा हा भाग प्रत्येक प्रकारच्या हल्ल्यापासून जनांचे संरक्षण करत असे. बिजौलियाचे शेतकरी आंदोलन असो कवा भिल्ल आंदोलन; ते अरवली पर्वतरांगांच्या संरक्षणाशी जोडलेले होते. कारण त्या काळात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जंगलांमध्ये प्राण्यांची शिकार वाढविली होती. या परिसरातील केवड्याचे बन असो की चंदनच्या झाडांची रांग वा इतर वनस्पती, हे जपण्यासाठी नागरिकांनी कायमच लढा दिला आहे.

पूर्वी इथे मोठ्या प्रमाणात चंदन आणि सागवानाची झाडे होती. काळानुरूप त्यांची संख्या कमी झाली. १९४९-१९५४ या काळात मेवाडने अरवलीतून १४० वाघ गमावले. (पान ६ वर)



## होई लीन माथा । चरणाशी ।।

नम्र भाव जेथे । नांदे तेथे हरि ।।
काय अहंकारी । सुखी होतो?।।१।।

गुणदोष अंगी । नांदतात खरे ।।
परी त्याग सारे । दोष जींवा ।।२।।

क्षीर-जल दोन्ही । एकरूप झाले ।
क्षीर ते प्राशिले । राजहंस ।।३।।

तैसे माझ्या मना । स्थिर होय वृत्ती ।।
संतसंग चित्ती । रूजू द्यावा ।।४।।

तुझ्या कृपे हरि । सुखावलो आता ।।
होई लीन माथा । चरणाशी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## सहवास

सहवास मात्यापित्यांचा वटवृक्षाची सुखद छाया
वर्षाव निरंतर प्रेमाचा कधी न आटते ही माया.
सहवास ज्ञानी गुरुजनांचा विद्येचे विशालतम भांडार
संस्काराची पुंजी थोर करी उज्ज्वल भविष्य साकार.
सहवास अनुरक्त प्रियकराचा चिंब भिजवी प्रे वर्षावात
संगे प्रत्येक मास मधुमास नित्य सुखावितो अंतरात.
सहवास श्रद्धेय परमात्म्याचा पार करतो हा भवसागर
नामजप हे संरक्षण कवच लक्ष पुण्याची, मिळे घागर.
सहवास श्रेष्ठ साहित्याचा मनास देतो जगण्या उभारी
वंदू संताच्या साहित्याला चराचराते जे उद्धारी.

स्वप्ना जगदळे

## गझल


पाय थकताना जमेशी चाल झाली
गाव येता ने की उलघाल झाली.
काल ना बागेत गेलो हिंडण्याला
भेटघेण्या पाखरे भवताल झाली.
वेधशाळेचा पुन्हा अंदाज चुकला
बातमी ही पावसा दरसाल झाली.
भेटली हिस्स्यात आई झोपडीच्या
मग गरिबी छान मालामाल झाली!
जन्म हा जोजावते ती माय बनुनी
याद ऐसी काळजावर शाल झाली.

रवींद्र जवादे

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# देव राक्षसांच्या गावा...



देव, राक्षस, असुर यांच्या गोष्टी ऐकतच आपण लहानाचे मोठे झालो. आजीच्या कुशीत पेंगुळवाणे पडायचे आणि गोष्टीतल्या राक्षसाचा संहार झाला की जोरजोरात टाळ्या पिटायच्या. रामाची कथा असो किंवा कृष्णाची, शेवटी राक्षसाचाच मृत्यू व्हायचा. मोठे झाल्यावर उमजले की, देव- दानवांचे युद्ध म्हणजे सत्प्रवृत्ती आणि असत्प्रवृत्तीचा लढा. आदिकाळापासून सुरू असलेल्या द्वंद्वाचे पुराणांनाही कोण कौतुक! पुराणांची असंख्य पाने युद्धकथांनी ओतप्रोत भरलेली आहेत. म्हणूनच देवांप्रमाणेच असुर आणि राक्षसांबद्दलही कुतूहल वाटणे स्वाभाविक आहे.

बहुतांशी ग्रंथांमध्ये असुर आणि राक्षस हे दोन्ही शब्द समानार्थी वापरले जातात. पण हे दोन शब्द सारखे निश्चितच नाहीत. असुर पातळलोकी हिरण्यपुरी राहतात. राक्षस जंगलात भूलोकी राहतात. कश्यप ऋषी देव आणि असुर दोन्हींचे जनक. पिता मरीचि हे ब्रह्माचे मानसपुत्र; याअर्थी असुरांचा थेट संबंध ब्रह्माशी आहे. त्यांची माता दिती आणि दानु. त्यामुळे त्यांना दैत्य किंवा दानव असेही म्हणत. राक्षसकुळ वैश्रव आणि पुलस्त्य ऋषींपासून सुरू होते. राक्षस यक्ष आणि ऋषींशी वैर धरतात. यक्ष उत्तरेकडून तर राक्षस दक्षिणेकडून येऊन वार करतात. रावण आणि कुबेराचे युद्ध प्रसिद्धच आहे. कुबेराने बांधलेली लंका रावणाने जिंकली. तेव्हा कुबेराने उत्तरेकडे येत तेथे अलकानगरी वसविली. असुरांचे युद्ध देवदेवतांशी होते. परंतु देवत्वापर्यंत पोहोचलेल्या काही असुरांचीही पूजा केली जाते. असुर आणि राक्षस संज्ञेमध्ये अनेक फरक असले, तरी आपण असुरांना राक्षस या संज्ञेनेच संबोधू या. कारण प्राचीन ग्रंथपुराणांमध्ये असुर राक्षसांप्रमाणेच वागतात. रामायणामध्ये राक्षसांना 'पुरुषाद' म्हणजे पुरुष भक्षण करणारे, असे म्हटले आहे. ताटका नावाची राक्षसीण अगस्ती ऋषींना गट्ट करण्यासाठी धावली होती. अगस्ती ऋषींनी तिला 'पुरुषादी महायक्षी विकृता विकृतानना' असा शाप दिला. विंध्य पर्वताच्या दक्षिणेला दंडकारण्यामध्ये आणि लंकेपर्यंत दूर नरभक्षक राक्षसांचा सुळसुळाट झाला होता. म्हणूनच विश्वामित्राने रामाला दशरथाजवळून मागून नेले. राक्षस नरभक्षक होते याचे उल्लेख अनेक ठिकाणी आढळतात. रावण सीतेला म्हणतो, 'दोन मासांनंतर तू जर मला आपला भर्ता म्हणून इच्छिणार नाही तर माझ्या प्रातराशाकरिता माझे स्वयंपाकी तुझे कापून तुकडे तुकडे करतील.' कुंभकर्णाविषयी असे म्हटले आहे की, 'हा कुंभकर्ण जन्माला आला आणि त्याने सहस्र लोकांना गट्ट केलं.' नंतर इंद्र ब्रह्मदेवाला सांगतो आहे, 'याप्रमाणे जर हा प्रजाभक्षण करीत राहील तर थोड्याच काळात पृथ्वीतलावरील मानव नाहीसा होईल.' महाभारतातदेखील नरभक्षणाचे उल्लेख आढळतात.

लाक्षागृह दाहानंतर एकचक्रा नगरीत भीमाने बकासुराचा वध केला. त्यानंतर पांडव रानोमाळ भटकत होते. एक हिडिंब राक्षस शालवृक्षावर बसला होता. त्याला माणसांचा गंध आला. त्याने ताबडतोब आपल्या हिडिंबा नावाच्या बहिणीला आजूबाजूला कोण माणसे फिरत आहेत, हे शोधायला सांगितले. पूर्वी राक्षसांची आणि देवांची युद्धे नेहमी व्हायची आणि इंद्राला राक्षसांना मारण्यासाठी ऐरावतावर आरूढ होऊन डोंगरकपारी पार करून यावे लागायचे. ऋग्वेदात द्यावापृथिवीचा उल्लेख आहे. तो असा की, आकाश व पृथ्वी हे दोघेही एका दानवाच्या दडपणाखाली होते. त्याला इंद्राने मारून आकाश व पृथ्वीला वेगळे केले. दिती ही दैत्यांची माता तर आदिती ही देवांची माता आहे. देवांची सात्त्विक प्रवृत्ती आहे तर राक्षसांची तामस वृत्ती आहे. देव यज्ञयागाचे पुरस्कर्ते तर राक्षस यज्ञाचा विध्वंस करणारे आहेत. अनेक पुराणांमध्ये देव आणि राक्षसांची शारीर वर्णनेही केली आहेत. देव सुडौल सुंदर शरीराचे आहेत. ते अतिशय आकर्षक अलंकार आणि वस्त्र परिधान करतात. त्यांचे दिव्य रूप पाहतच राहावेसे वाटते.

राक्षस मात्र विकृत आणि अक्राळविक्राळ आहेत. देवांचे दात सरळ आणि सपाट आहेत. जबडा रुंद आहे, कपाळ उंच आणि भुवई बारीक आहे. राक्षसांचा जबडा लांबुळका, कपाळ अरुंद, नाक चपटे, भुवया जाड आणि सुळे तीक्ष्ण आहेत. सर्वसाधारण सर्व देवतांचा गौरवर्ण आहे; अपवाद फक्त सावळ्या कृष्णाचा. राक्षसांचा वर्ण कायम काळा असतो. ओबडधोबड शरीरप्रकृतीचे राक्षस पुराणांमध्ये नेहमी डोकावतात. विविध पशूंची शिंगे ते आपल्या डोक्यावर लावतात. अंगाला चट्टेरी-पट्टेरी रंगवितात. त्यांचे गणचिन्ह एखादा पशू किंवा वृक्ष असतो. देवांना गणचिन्ह नसते. देवांची भाषा संस्कृत पण राक्षसांच्या भाषा मात्र विविध असतात. याचे कारण राक्षस वन्यजातीचे असावेत. रामायणात अरण्यकांडात म्हटलेले आहे, 'राक्षसा विविधा वाचो व्याहरंति महावनें।' अजूनही हिमालयाच्या कुशीतल्या अनेक जमाती वेगवेगळ्या भाषा बोलतात. त्यांच्या चालीरीती वेगळ्या आहेत. या वन्यजातींनाच प्राचीन काळात दानव म्हणत असावेत. हिमालयाच्या कड्याकोपऱ्यात राहणाऱ्या टोळ्यांना राक्षस म्हणत असावेत.

भगवान शंकराचे ते निस्सिम भक्त होते. देव आणि राक्षसांमधला हा फरक ढोबळमानाने काढता येतो. बरेच राक्षस यज्ञयाग करीतही असत. काही दानवांनी घोर तपश्चर्यादेखील केलेली आहे. पण मुख्य फरक सकाम उपासना आणि निर्गुण निष्काम उपासनेमधील आहे. सकाम उपासनेमुळे राक्षसांना फळ मिळाले नसेल, असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. अमरकोषातही बहुतेक राक्षस हिंसक आणि नरभक्षक असल्याची वर्णने आहेत. राक्षस संज्ञेत बरेच समानार्थी शब्द येतात. 'कौणप' म्हणजे शवभक्षक, 'अस्रप'चा अर्थ नररक्तपिपासु राक्षस होतो. 'आशर' म्हणजे हिंसा करणारा राक्षस, 'क्रव्याद' म्हणजे कच्चे मांस खाणारा राक्षस, 'कर्बुर' म्हणजे विचित्र चट्टेरी-पट्टेरी पोशाख घातलेला राक्षस अशी अनेक वर्णने अमरकोषात आढळतात. 'पूर्वदेव' हा आणखी एक महत्त्वाचा शब्द अमरकोषात आलेला आहे. याचा अर्थ राक्षस पूर्वी देव होते. पण आता देवाचे कोणतेही गुणधर्म त्यांच्यात राहिलेले नाहीत. राक्षसांबाबत पुराणांमधून सातत्याने एक शब्द वापरला जातो. अमुक एक राक्षस 'कामरूपी' होता, अशी अनेक वर्णने आपल्याला वाचायला मिळतात. स'कामरूपी' या शब्दाचा अर्थ आपल्या इच्छेप्रमाणे रूप बदलणे असा होतो. याचाच अर्थ राक्षसांना निश्चितच मायाजाल निर्माण करण्याचे तंत्र माहीत होते आणि ते या तंत्राचा वापर करीत होते. महाभारतात भगदत्त राजाचे वाहन सुप्रतीक हत्ती होता. महापराक्रमी सुप्रतीकाला युद्धाच्या चौथ्या दिवशीही भीम आवरू शकला नाही. भीम बेशुद्ध पडला. आता मात्र पुत्र घटोत्कचाला त्याचे राक्षसी रूप दाखवणे भाग पडले. होता तो हिडिंबेचाच पुत्र. त्याने युद्धभूमीवर माया निर्माण केली. आणि इंद्राच्या ऐरावताला निमंत्रित केले. ऐरातावर आरूढ होऊन त्याने सुप्रतीकावर आक्रमण केले. ऐरावत म्हणजे हत्तींचा राजाच. त्याच्यामागे हजारो हत्तींची फौज सुप्रतीकाला चिरडण्यासाठी निघाली. अखेरीस तीक्ष्ण सुळ्यांच्या हल्ल्यामुळे सुप्रतीक घायाळ झाला. वायुपुराणात राक्षसांची विस्तृत वर्णने आली आहेत. यातील वैशिष्ट्य म्हणजे राक्षसपुत्रांची नावे त्यांच्या आईच्या नावावरून दिलेली आहेत. उदाहरणार्थ, खशा राक्षसिणीला सात मुली होत्या. त्यांची नावे आलंबा, उत्कचा, कृष्णा, निर्ऋजा, कपिला, शिवा आणि केशिनी अशी होती. आलंबेला पुत्र झाला आणि त्याचे नाव आलंबेय आहे. त्याचा स्वभाव क्रूर राक्षसगणात मोडतो. याच प्रकारे उत्कच्याचा पुत्र उत्कचेय, कृष्णाचा पुत्र कार्ष्णेय, शिवाचा पुत्र शैवेय अशी नावे आहेत. यावरून निष्कर्ष निघू शकतो. की, राक्षसगणात मातृसत्ताक पद्धती असावी. काही असुरांच्या नकारात्मक सामर्थ्यामुळे त्यांना पुजले जाते. अमृतमंथनाची गोष्ट आहे. समुद्र घुसळून अमृत वर आले आणि दानवांनी ते पळवून नेले. विष्णूने लावण्यवती मोहिनीचा अवतार घेतला आणि दानवांच्या हातून अमृतकुंभ घेतला. मोहिनी जेव्हा देवांना अमृत वाटत होती तेव्हा एका असुराने देवाचे मायावी रूप घेऊन अमृत चाखायचा प्रयत्न केला. सूर्यचंद्राने त्याला ओळखले आणि हा प्रकार मोहिनी रूपातील विष्णूला सांगितला. त्याने तत्काळ सुदर्शनचक्र फेकून असुराचे दोन तुकडे केले. डोक्याचा भाग राहू आणि शरीराचा भाग केतू झाला. तेव्हापासून राहूबकेतू दोघेही सूर्यचंद्राच्या आड येऊन त्यांना ग्रहण लावीत असतात. ज्यांना अमृताचा एकही कण मिळाला नाही ते 'असुर' असेही म्हटले जाते. सरतेशेवटी आपले कर्म ठरवते आपण असूर होणार की देव होणार. गर्भगृहाच्या बाहेर आपण हातात दंड घेतलेले द्वारपाल बघतो. जय-विजय विष्णूचे द्वारपाल होते. कोणाला भेटू द्यायचे हे सर्वस्वी त्यांच्या हातात असल्यामुळे ते उद्धट झाले होते. एकदा चार सनतकुमार विष्णूला भेटायला आले असता जय-विजयने भेट नाकारली. त्यांनी शाप दिला की, तुम्हाला तीन जन्म मर्त्यलोकांत घ्यावे लागतील. पण जयबविजयने विष्णूची आळवणी केली की, 'या तीनही जन्मी तुम्ही आम्हाला मरण द्या.'त्याप्रमाणे ते पहिल्या जन्मात हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू असुर म्हणून जन्माला आल्यावर भगवान विष्णूंनी नरसिंहाचा अवतार घेतला.


दुसऱ्या जन्मात रावण आणि कुंभकर्णचा जन्म घेतल्यावर भगवान विष्णूंनी रामाचा अवतार घेतला आणि तिसऱ्या जन्मात त्यांनी शिशुपाल व दंतवक्राचा जन्म घेतल्यावर श्रीकृष्ण पृथ्वीतलावर अवतीर्ण झाले. जय-विजय जेव्हा द्वारपाल होते तेव्हा देवच होते. त्यांच्या कर्माने ते पुढील जन्मांमध्ये असुर झाले आणि भगवंतावरच्या निस्सीम श्रद्धेमुळे त्यांना अखेरीस देवत्व प्राप्त झाले. शेवटी आपल्या आयुष्यातील कर्म ठरवते की, आपण देव व्हायचे की असुर. देवत्वाकडून असुरत्वापर्यंतचा प्रवास फार निसरडा आहे. पाय निसटला की आपल्यातला हिरण्यकश्यपू जागा होतो. रावण युद्धाची ललकारी देतो. शिशुपाल शंभर गुन्हे करायला धजावतो. नंतर केलेल्या कर्माचा पश्चात्ताप झाला तर पुन्हा देवत्वाकडे प्रवास सुरू होतो. कोठून कसा प्रवास करायचा हे शेवटी आपल्यालाच ठरवावे लागते.

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

कविता हा प्रकार खरं म्हणजे माणसाच्या अगदी बालपणापासून सोबत करत असतो. पाळण्यात अंगाई गीत ऐकत झोपण्यापासून सुरू झालेला हा प्रवास जीवन भर आपल्या कळत न कळत सुरू असतो, कधी कविता कधी गाणी... भाषेचे बंधन नाही... काव्याचा तीळमात्र संबंध नसलेले लोक गावातील भजन ओव्या अभंग ह्यात रममाण होत असतात किंवा बारी गायन ह्यात बेहोष होत गात असतात किंवा दादा कोंडकेच्या गाण्यापासून ते ग्रेसच्या ती गेली तेंव्हा पाऊस निनादत होता किंवा या जन्मावर ह्या जगण्यावर ऐकणारे लोक काव्य प्रेमीच असतात हे समजून घेतले पाहिजे.





# कवितेची जन्मकथा: विठ्ठल वाघ ह्यांची 'तिफन'

माझा काव्याचा नेमका संदर्भ कधी आला ते सांगणे कठीण कारण पहिलीत जाण्याच्या आधीही माझ्या कानावर बिनाका गीत माला किंवा जळगाव आकाशवाणी वरील आपली आवड मधील गाणी पडत असत. एखाद्या रविवारी गावाबाहेर वाहणाऱ्या स्वच्छ ओढ्याच्या काठाने कपडे धुण्यासाठी घेऊन बादली, व्हील साबण थोडासा निरमा वॉशिंग पावडर घेऊन दोन तीन लेकरांना घेऊन फिरणाऱ्या कष्टकरी आणि स्वावलंबी लोकांचा तो काळ होता आता ह्या स्वावलंबनाचे कारण कामवाली बाई न येणे हे असले तरी तरी हे स्वावलंबन वॉशिंग मशीनला स्वतःचे कपडे लावणे इतके मर्यादित झाले आहे. आमचे वडीलही कधीबधी आमची अशी दिंडी घेऊन निघत त्यावेळी आमच्या तीन भावाच्या पैकी कुणा एकाच्या हातात रेडिओ असे त्यावर बऱ्याच वेळा ऐकलेलं काळ्या मातीत मातीत हे गाणं मनात असच रुतून राहील. इयत्ता नववीमध्ये आल्यावर पद्य विभागात ते गाणं कविता म्हणून भेटल आणि विठ्ठल वाघ ह्या माणसाचं नाव माहीत झालं. मराठीला पिंपरकर म्हणून शिक्षक होते ते विठ्ठल वाघ ह्यांच्याबद्दल खूप सांगत. त्याच्या अकोल्याच्या घरावर एका बाजूला विठ्ठल आणि दुसऱ्या बाजूला वाघाचे चित्र आहे असे त्याकाळी आम्ही नवलाने ऐकत असू, मात्र पुढे वयाचे बंधन विसरून काव्य क्षेत्रातील ही दिग्गज हस्ती माझ्यासाठी काव्य प्रांतातील दिशादर्शक मित्र झाली. त्यानंतर त्यांच्या घरी बराच वेळा गेलो. बांगड्याच्या काचेच्या तुकड्यांपासून तयार झालेला मोर दिसला पण विठ्ठल आणि वाघाचे चित्र काही दिसले नाही.

सरांच्या योद्धा ह्या महत्वाकांक्षी खंडकाव्याची निर्मिती मी थोडीफार जवळून अनुभवली. मात्र, मला खरी उत्सुकता होती ती काळ्या मातीत मातीत ह्या गाण्याच्या म्हणजेच तिफन ह्या कवितेच्या निर्मितीची जन्मकथा समजून घेण्याची, आणि मग एकदा सरांना फोन लावला आणि विचारले, सर तुमच्या एखाद्या कवितेची जन्मकथा सांगा ना मला.

अगदी काहीही आढेवेढे न घेता सर बोलले, तरंग कवितेची गोष्ट आहे. अकोला खामगाव रोडवर एका निवांत दुपारी एका तळ्यात एक वाळलेल झाडाचं पान पडलं आणि त्यात तरंग उठले आणि माझ्या मनात ओळ निर्माण झाली सार कसं साम सूम...अस म्हणत, त्यांनी मला तरंग ह्या कवितेची जन्मकथा सांगितली! मी सरांना पुन्हा बोललो, सर तिफनबद्दल सांगा ना काही त्यावर विठ्ठल वाघांनी जी तिफण ह्या कवितेची जन्मकथा सांगितली ती आवर्जून ऐकण्यासारखी आहे हे निश्चित. विठ्ठल वाघ हे पेशाने प्राध्यापक आणि शेतीमातीचा गंध जाणणारे आणि जपणारे कवी, त्यांचे मेव्हणे मुंबई येथे बँकेत एका मोठ्या पदावर कार्यरत असताना एकदा अकोला जिल्ह्यातील वाशीम भागातील रिसोड ह्या गावी तपासणीसाठी आले. तेंव्हा त्यांनी विठ्ठल वाघांना त्यांनी सोबत चालता का असे विचारले. इतर विशेष काम नाही आणि बँक अधिकाऱ्यांच्या सोबत एक वेगळा अनुभव येईल म्हणून कवी विठ्ठल वाघ त्यांच्या सोबत गेले. तेथील एका शेतात प्रत्यक्ष फिल्डवर इन्स्पेक्शनसाठी गेल्यावर शाखाधिकारी आणि अधिकारी ह्यांच्या कार्यालयीन गप्पा सुरु असताना विठ्ठल वाघ काळ्या मातीचे आणि त्या मातीत राबणाऱ्या कष्टकऱ्यांचे निरीक्षण करत होते.

मूळ पिंड शेतीमातीचा आणि हिरव्या रानाबद्दल अत्याधिक जिव्हाळा जोपासणारी व्यक्ती शेती मातीत रमणार नाही तर नवलच नाही का? अशातच मंद वारा आला, जवळच कोठेतरी पाऊस पडला होता. त्यामुळे भिजलेल्या मातीचा सुगंध सर समोरच्या रानात कोसळू लागली. मातीची नांगरून ठेवलेली ढेकळ मातीत विरघळू लागली. ज्या ढेकळातून थोड्या वेळा पूर्वी चालतांना ठेच लागली तर रक्त निघावे अशी स्थिती होती तीच ढेकळ भिजल्यामुळे लोण्याप्रमाणे मऊशार झाली आहेत, असे कवीमनास वाटू लागले. ही अशी जाणीव होत असतानाच डोळ्यापुढे आपल्या गाव खेड्यात नांगरणी वखरणी करणारा शेतकरी बाप उभा राहिला.

बापासोबत लहानपणी शेतात फिरतांना घेतलेला शेतकामाचा अनुभव सजीव होऊ लागला. खरे म्हणजे कोणत्याही कवितेच्या निर्मितीची बीजांकुरे त्या कवीच्या काळजात खूप आधी पेरलेली असतात असे मला नेहमीच वाटत आले आहे. तर धुऱ्या जवळ उभ्या असलेल्या बोरी किंवा बाभळीची झाड त्यांचे शेताच्या कुपाकुपाजवळ पडलेले धारदार तीक्ष्ण काटे, ह्या कुपातून चालणारा नांगर तेव्हा गावात एकदा ट्रॅक्टर आला तर सारा गाव ट्रॅक्टरने होणारी ९९ टक्के नांगरणी ही बैल जोडीच्या मदतीने होत असे, पायात वेदना देत घुसणारे काटे, थकलेले शरीर आणि थकूनही चालत राहणारी बैलजोडी हे सर्व कवीला आठवत गेले असले पाहिजे. आणि हे सर्व कष्ट कशासाठी तर उद्या फुलून येणाऱ्या हिरव्या शेतासाठी, त्या हिरव्या समृद्धीच्या ओढीनं भारतातील शेतकरी पायात टोचणारे काटे, त्या पायांना होणाऱ्या जखमा, त्यातून वाहणारे लाल रक्त ह्या कशाचीही पर्वा न करता कष्ट आणि कष्ट करत राहतो. बरं हे कष्ट तरी किती करायचे? तर मन आणि भावना मारून फक्त राबत राहायचे. पेरणीच्या दिवशी घरात एखाद्याच मरण झालं तर पेरणी होईस्तोवर प्रेत झाकून पेरणी करण्याचे अनेक उदाहरण आपण वाचतो आणि ऐकतो इतकं भावनाशून्य झाल्याशिवाय हे हिरवे स्वप्न फुलत नाही हेच खरे. अशीच एक भावना म्हणजे मातृत्वाची भावना होय. शेतात आपल्या भिकेला लागलेल्या शंकराला त्याच्यासोबत राबत कष्टत शेतजमीन कसण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या पार्वतीला सर्वात जास्त लळा असतो तो आपल्या लेकराचा...मात्र ह्या मातीत राबताना स्वतःच मन मारून ती आपल्या लेकराला बाजूला ठेवते. त्याच्यासाठी एक झोका बांधून मन लेकराकडे, शरीर नवऱ्याच्या मागे झुरत असते.

झिंजत असते ह्या संकल्पनेला आणखी वेदनेचा गडद रंग देताना कवींनी ही झोळी काटीला म्हणजे बाभळीच्या झाडाला बांधल्याचा उल्लेख केला आहे. बाभूळ म्हणजे काटेरी झुडूप, ज्याचे काटे वेदनादायी असतात आणि महत्वाचे म्हणजे ह्या झाडाची सावलीही पडत नाही. म्हणजे शेवटी ते लेकरू मायपासून दूर उन्हातच असते. फक्त त्या माऊलीला समाधान असते ते त्या पोकळ सावलीचे, ही गडद वेदना शेतीमातीचा रंग आणि गंध ह्या शिवाय कृषक संस्कृतीमधील दैन्य, अपार कष्ट, निसर्ग ह्या सगळ्याचा परिपाकातून तिफन कवितेची रुजवण विठ्ठल वाघ ह्यांच्या मनात झाली. वऱ्हाड बोली भाषेतील गोडवा शब्दात उतरला आणि एक अस्सल वऱ्हाडी बाज घेऊन भारतीय शेतकर्याच्या दैन्य आणि श्रमिक जीवनाच चित्रण करणारी कविता मूळ वऱ्हाडी भाषेतून पुढील रुपात जन्मास आली.

**काया मातीत मातीत**
**तिफन चालते तिफन चालते,**
**ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते,**
**तिफन चालते,**
**नंदी बैलाच्या जोळीले**
**सदाशीव हकालते,**
**वटी बांधून पोटाले पाराबती उनारते,**
**वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते,**
**झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते,**
**त्यात तानुल लळते ढग बरसते,**
**तिफन चालते....**

लोकगीताची चाल आणि वऱ्हाडी बोलीची गोडी, विठ्ठल वाघाच्या पहाडी आवाजातील मार्दव आणि सादरीकरणाची अलौकिक किमया ह्या जोरावर ही कविता लवकरच महाराष्ट्रात सर्वत्र लोकप्रिय झाली. आगळी शब्दकळा, प्रतिभेचा लयबद्ध आविष्कार, जिवंत अनुभव विश्व ह्यामुळे ही कविता ओळखली जाऊ लागली. लोकगीताचा साज आणि लोकलयीचा बाज ह्यामुळे ही कविता शेतकऱ्यांना आणि रसिकांना आपली वाटू लागली.

काटीला टांगलेल्या झोयीत रडणार लेकरु, पायात रक्त काढणारा काटा, उन्हा तान्हात शेतात राबणारे शंकर पार्वती सकळ शेतकरी जीवन कासावीस करणारे होते. तर त्याच वेळी काकरात बिजवाई जस हासर चांदण ह्या ओळी शिशिरातील चांदण्याची उधळण करणाऱ्या ठरल्या.

कष्टमय जीवनात एकमेकांत गुंतलेले राघू मैनाची जोडी वाघांनी अजरामर केली. विदर्भातील वातावरण विदर्भातील प्रतीक, प्रतिमा अश्यामुळे विदर्भातील शेतकरी दाम्पत्य समोर उभे राहत असले तरी ह्या कवितेतील दुःख हे संपूर्ण भारतीय शेतकर्यांचे होते. मुंशी प्रेमचंद ह्यांच्या गोदान मधील होरी ह्या शेतकऱ्यांपासून साहेबराव करपे ह्या १९ मार्च १९८६ रोजी शेतकऱ्यांची आत्महत्या म्हणून नोंद झालेल्या विदर्भातील शेतकऱ्यांचे जीवघेणे दुःख ह्या कवितेतून विठ्ठल वाघ ह्यांनी मांडले. असं काहून होत अशीन साहेबराव ह्या कवितेतून शेतकरी आत्महत्येवर बोलत उघडपणे समाज, शासन ह्या व्यवस्थेवर निर्भीडपणे कोरडा ओढण्याचे कामही पुढे विठ्ठल वाघांनी केले.

१९८१ मध्ये प्रकाशित अरे संसार संसार ह्या चित्रपटात अशोक सराफ, रंजना, कुलदीप पवार, मोहन गोखले, रिमा लागू अशी तगडी अभिनय जुगलबंदी मराठी सिनेरसिकांनी अनुभवली संगीतकार अनिल अरुण ह्यांनी संगीतबद्ध केलेले राजा ललकारी अशी घे किंवा विठू माऊली तू माऊली जगाच्या अश्या अविस्मरणीय आणि अप्रतिम गण्यासह लोकांना सर्वात जास्त आवडले ते गाणे म्हणजे काळ्या मातीत मातीत तिफन चालते हे होय. अकोल्यातून देवकीनंदन गोपाला हा श्रीराम लागू अभिनीत गाडगेबाबा ह्यांच्या जीवनावरील चित्रपट ही निर्मिती डॅडी देशमुख ह्यांची, त्यांच्या सोबत अर्थात विठ्ठल वाघ होतेच, राजदत्त ह्यांनी दिग्दर्शित केलेल्या ह्या चित्रपटाचे काही हिशेब नेऊन देण्यासाठी विठ्ठल वाघ मुंबईला राजदत्त ह्यांच्याकडे गेले. त्यावेळी ते पुणे येथे गेल्याचे समजले तेंव्हा राजदत्त ह्यांना भेटायला म्हणून ते पुण्याला गेले.

विठ्ठल वाघ गेले तेंव्हा राजदत्त आणि प्रसिद्ध ग्रामीण कथाकार शंकर पाटील ह्यांची चर्चा सुरू होती. अरे संसार संसार चित्रपटाचे लिखाण सुरू होते. त्यांच्यासाठी हा एक महत्वाकांक्षी चित्रपट होता. विठ्ठल वाघांना दत्ताजी (राजदत्त) ह्यांनी, वाघ सर, तुमची काळ्या मातीत ऐकवा एकदा पाटलांना कुठ झाली तर पाहू. असे म्हणून कविता गायला लावली.

महाराष्ट्राला भुरळ पाडणारी ती कविता शंकर पाटलांनी शांतपणे ऐकली आणि ते उद्गारले, 'अरे बाबा, हे गाणं तर ह्या चित्रपटाचं थीम साँग होईल, अगदी ह्या चित्रपटाचा आत्मा होईल हा, पण एक अडचण अशी आहे की ही कविता आहे वऱ्हाडी आणि आपल्या चित्रपटाची पार्श्वभूमी आहे कोल्हापुरी...त्यावर राजदत्त ह्यांना विठ्ठल वाघ ह्यांची, त्यांच्या प्रतिभेची आणि बोलीभाषेच्या अभ्यासाची जाणीव असल्यामुळे ते अगदी सहज बोलले, मग, त्यात काय अवघड वाघ सर तुम्हाला ह्यांचे कोल्हापुरी भाषेत रूपांतर करून देतील. त्यानंतर संपूर्ण कोल्हापुरी बाजाचे काळ्या मातीत मातीत असे रूपांतर विठ्ठल वाघ ह्यांनी तयार केले.

आज बहुतांश ठिकाणी मी वर दिलेली मूळ कविता अनेकांना माहितीही नसल्याने पुढील काव्यच लोकांना मूळ काव्य आहे असे वाटते.

(पान ६ वर)

---

पुस्तक परिक्षण

श्रीधर खेडगीकर
भ्र. ९४२३५३६०८४

# दशकातले लेखक..

दशकातले लेखक या नावाचे अतिशय उत्तम पुस्तक वाचण्यात आले. लेखिका आहेत स्नेहा अवसरीकर. २०१० ते २०२० या काळातील अकरा लेखकांचा साहित्यिक पट त्यांनी पुस्तकात आपल्यासमोर मांडला आहे. बरेच जण आवडता लेखक म्हटलं पु.ल. किंवा वि.स. खांडेकर किंवा व.पु. काळे असे सांगतात. यापुढे मराठी वाचक काही वाचतच नाही का असे वाटते. पण लेखिकेने घेतलेल्या अकरा लेखकांचा धांडोळा पाहिला की वाटते हे लेखक सुद्धा सकस लेखन लिहीत आहेत.

दशकातले लेखक या पुस्तकाच्या लेखीका स्नेहा अवसरीकर याची दखल मराठी जगताने घेतली आहे, सामान्य वाचकांनी सुद्धा आवर्जून या लेखकांची पुस्तके वाचावीत. गेल्या काही वर्षांपासून चिकित्सा हा प्रकार बाद झाला असून त्याची जागा पुरस्कारांनी घेतली आहे.

स्नेहा अवसरीकर यांनी ललित मासिकामध्ये ही अकरा लेखकांची मुलाखत मालिका घेतली होती. साहित्य व्यवहाराविषयी प्रणव सखदेव मुलाखतीत म्हणतात..पोपट मेला आहे पण कोणीही ते सांगायला तयार नाही.

**प्रकाशन संदर्भातील बदल...**

प्रकाशनाबाबत आणखी एक गोष्ट घडली ती म्हणजे मुद्रणांमध्ये झालेले लक्षणीय बदल. प्रिंट ऑन डिमांड (पी ओ डी) मध्ये हजार ऐवजी दोनशे प्रतींची छपाई शक्य होऊ लागली. त्यामुळे नवीन प्रकाशक या व्यवसायात उतरले. कोणत्याही कला व्यवहारांमध्ये निर्मितीची चिकित्सा करणे किंवा मूल्यमापन करणे अत्यंत गरजेचे असते. सतीश तांबे यांनी सविस्तर प्रस्तावना या पुस्तकला लिहिली आहे.ती वाचनीय आहे.

**स्नेहा अवसरीकर यांचे मनोगतही पुस्तकात सविस्तरपणे आहे.**

**१. प्रणव सुखदेव**


प्रणव सखदेव मुलाखतीत म्हणतात..

क्राफ्टिंग शब्द मला आवडला. एखादा सुतार खुर्ची तासून काढतो. तसेच मी लिहितो. सुताराला लाकडाच्या ओंडक्यामध्ये खुर्ची दिसते. लेखकाला जगण्यात कथा,कादंबरी दिसते. ते दिसलेलं बाहेर काढायला क्राफ्टिंग कौशल्य लागते. जगणं आणि लिहिणं एकाच वेळी वेगळ्या परंतु त्याचवेळी एकमेकांच्या पायात पाय घालून गुंतून पडलेल्या बाबी आहेत. माझ्या लेखनाचा हेतू मला जे सत्य समजलं आहे त्या शब्दांद्वारे सांगणं हा.

**२. गणेश मतकरी**

साहित्यकृती पूर्ण होते ते पानांवर नाही तर वाचकांच्या मनात असे गणेश मतकरी म्हणतात. ग्राफिक नॉवेल हा चित्र आणि साहित्याला एकत्र आणणारा प्रकार म्हणजे कॉमिक बुक्सचे मोठं भावंड.

पाश्चात्य साहित्यात मोठ्या प्रमाणात हा प्रकार हाताळला जातोय, मराठीत हे सगळं कधी येणार?




**३. ऋषिकेश गुप्ते**

कोणतीही कलाकृती कागदावर उतरवताना त्या कलाकृतीच्या अनुषंगिक घटनांचा, कल्पनांचा, भूगोलाचा अनुभव असणे आवश्यक असते. असा अनुभव नसेल तर सेकंड हॅन्ड अनुभव घेऊ शकतो. कोणत्याही प्रकारे अनुभव उपलब्ध नसेल तर कल्पनेच्या भूमीवर अनुभवांची शेते भरभरून यायला हवीत.

गुप्ते म्हणतात गाव मग कोणत्याही प्रांतातील असो ते कायमच मिश्किल आणि टारगट असते.

**४. शिल्पा कांबळे**

शिल्पा कांबळे म्हणतात, कादंबरीत जीवनदर्शन असतं. काळाचा एक व्यापक पट कादंबरी मांडते. आंबेडकरी लिखाण वास्तवदर्शी असते पण लिखाण रंजक नसेल तर वाचक पुस्तक खाली ठेवतात हे मला माहीत होते.

**५. किरण येले**

किरण येले म्हणतात.. हा काळ लेखकाआधी माणूस म्हणून जगण्याचा काळ आहे. नाटक लिहिताना पहिली अट असते की त्यात नाटककार दिसू नये. नाटक म्हणजे make them believe. little reading is all the therapy a person needs sometime. किरण येले म्हणतात.. माझ्यासाठी लिहिणं ही थेरपी आहे. मी लिहितो कारण तोच पर्याय आहे माझ्याकडे स्वतःला बरं कारण्याचा. मनाचा निचरा करण्यासाठी लेखक लिहीत असतात.

**६. किरण गुरव**

महागाई ही सामान्य लोकांच्या बाजार वाचनाची लिपी असते असे किरण गुरव म्हणतात.

**७. कृष्णात खोत.**

कृष्णात खोत म्हणतात..

प्रत्येक लेखक आपल्या लेखनासाठी स्वतःच स्वतःची अशी एक वाट तयार करत असतो.

**८. सोनाली नावांगुळ..**

स्पर्शज्ञान या पाक्षिकाचे संपादन सोनाली नावांगुळ अनेक वर्षांपासून करत आहेत.

स्पर्शज्ञान नावही किती सार्थ. बोटांच्या स्पर्शातून मेंदूला अर्थाचं होणारं ज्ञान. मध्यरात्रीनंतरचे तास या सोनाली यांच्या पुस्तकाला साहित्य अकदामी पुरस्कार मिळाला आहे. जॉयस्टिक नावाचं पुस्तक त्यांनी लहान मुलांसाठी लिहिले आहे.

**९. मनस्विनी लता रविंद्र.**

अमर फोटो स्टुडिओ हे नाटक मनस्विनी यांनी लिहिले आहे.

सिगारेट्स या त्यांच्या नाटकाचे खुद्द विजय तेंडुलकर यांनी कौतुक केले.

**१० शर्मिला फडके**

शर्मिला फडके म्हणतात, लिहिणे ही माझी आतली हाक आहे. ये शहर बडा पुराना है हे त्यांचं पुस्तक सध्या खुप लोकप्रिय आहे.

**११. आसाराम लोमटे.**

आसाराम लोमटे म्हणतात हे म्हणतात..

श्रेष्ठ साहित्य हे मर्यादांची चौकट मोडून पुढे येतं. या अकरा लेखकांची अनेक पुस्तके वाचायची प्रेरणा हे पुस्तक देतं.

चांगला लेखक बनवण्याची प्रक्रिया हे पुस्तक विशद करतं. उत्तम वाचक बनण्यासाठी हे पुस्तक आवर्जून वाचावं.

---



# बुटामधील खडे

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

परवा फिरायला निघालो. सकाळची वेळ. जरा जलद चालण्याचे ठर पण चालताना एका बुटात काही खडे गेले. पण त्याकडे दुर्लक्ष करून तसेच चालत राहिलो. काही वेळाने दुसऱ्या पायातील बुटात सुद्धा काही खड्यांनी प्रवेश मिळवला. पण आमचे ध्येय जलद चालण्याचे असल्याने पुन्हा त्याकडे दुर्लक्ष करून चालत राहिलो. चालताना खडे टोचत राहिले. जरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत होतो तरी ते मला त्यांच्या उपस्थितीची वारंवार जाणीव करून देत होते. मग म्हटले आता यांची दखल घेतलीच पाहिजे. नाहीतर पुढचे चालणे अवघड होईल. म्हणून एका वळणावर जरा विसावलो. बसलो आणि बुटातले खडे काढून टाकले आणि पुन्हा मार्गक्रमण करायला सुरुवात केली. मग मात्र काही अडचण आली नाही. मी वेगाने पुढील अंतर पार करून इच्छित ठिकाणी पोहचू शकलो.

आपले जीवनही काहीसे असेच आहे, नाही का? जीवन हाही एक रस्ताच. या रस्त्यावर अनेक अडथळे असतात. काटे, खड्डे, खडे यासारखे. कधी भयंकर गर्दी असते. कधी नसते. गर्दीत आपला वेग मंदावतो नि गर्दी नसलेल्या रस्त्यावरून आपण वेगाने जाऊ शकतो. बुटांमध्ये खडे जाऊन जसे चालताना अडखळायला होते तसे जीवनाच्या मार्गातही अनंत अडचणींचे खडे असतात. तुमचे बूट कितीही व्यवस्थित असले तरी ते नकळत बुटांमध्ये जातातच. अशा वेळी आपल्यासमोर दोन पर्याय असतात. पहिला म्हणजे त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे आणि दुसरा पर्याय म्हणजे थोडे थांबून ते खडे काढून टाकणे, बाजूला करणे. यातील दुसर्या पर्यायात आपला वेळ जरा जातो. पण पुढील वाटचाल मात्र वेगाने होते. तो गेलेला वेळ भरून निघतो. कोणते खडे जाऊ शकतात जीवनरूपी बुटात? हे खडे असतात नकारात्मक विचारांचे. हे नकारात्मक विचाररूपी खडे आपल्या मार्गात अवरोध निर्माण करतात. मला हे जमणार नाही. माझी तशी योग्यता नाही. हे आणि या सारखे विचार नकारात्मक असतात. ते आपला आत्मविश्वास खच्ची करतात. अशा नकारात्मक विचारांचा एक खडा जरी मनात गेला तरी तो आपल्याला आपल्या ध्येयापासून विचलित करण्यासाठी पुरेसा असतो. जसे मोठ्या नौकेला एखादे लहानसे छिद्र जरी पडले तरी ते धोका निर्माण करू शकते. ते वेळीच बुजवले पाहिजे. भरलेल्या घागरीला गेलेला एखादा छोटासा तडा पूर्ण घागर रिकामी करू शकतो. नकारात्मक विचारांमध्ये मोठी शक्ती असते. ते आपल्या मनाचा ताबा घेऊन आपल्याला पराभूत करू शकतात. म्हणून त्यापासून सावध राहिले पाहिजे. नकारात्मक विचार वेळीच ओळखून त्यापासून दूर राहिले पाहिजे.नेहमी सकारात्मक विचार करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. रस्त्याने चालताना आपल्याला अनेक लोक भेटतात. आपण त्या सगळ्यांकडे लक्ष देत नाही. एखादी ओळखीची व्यक्ती भेटली तर नमस्कार, किंवा हाय, हॅलो इ. म्हणून पुढे चालतो. नको असलेली व्यक्ती दिसली तर तिला टाळून पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. असेच चांगल्या विचारांचे स्वागत आणि नकारात्मक विचारांना टाळून पुढे जाता आले पाहिजे. तरच आपले इच्छित ध्येय आपण गाठू शकू, इच्छित स्थळी पोहचू शकू. बा. भ. बोरकर लावण्यारेखा या कवितेत म्हणतात- देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती, वाळवंटातुनी सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती. अशी ध्येयाचा ध्यास लागलेली देखणी पाऊले आपल्याला टाकता येतील का? अशी पाऊले जर आपली पडली तर कवितेच्या शेवटच्या ओळीत कवीने व्यक्त केलेल्या अपेक्षांना आपण उतरू शकू. शेवटच्या ओळी अशा आहेत, देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके, चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे, देखणा देहांत तो जो सागरी सूर्यास्तसा, अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा.

संत
प्रकाश एदलाबादकर

# नीळ- प्रभा दिसे निळेपण वसे, निळीये आकाश हारपल



६०-६५ वर्षांपूर्वीची गोष्ट. माझी एक आजी होती. आईच्या दूरच्या नात्यातली तिची मावशी. आमच्या घरापासून २०-२५ पावलांवर तिचे घर. आजी लाल अलवणातली विकेशा विधवा होती. नाते दूरचे असले तरी संबंध जवळचे होते. घरोबा होता. आईच्या मदतीला आजी आणि आजीच्या मदतीला आई, असे बरेचदा होई. आईला तिचा आधार होता. म्हातारी तिन्ही त्रिकाळ देवाची पूजा करीत असे. दिवसातून तीनदा आंघोळ होई तिची. सोवळे-ओवळे एकदम कडक. म्हातारी तापट होती. आजीला एकच मुलगा. तोही तिला खूप उशिराने झालेला आणि एकुलता एक. मुलगा आणि सून, म्हणजे माझे मामा- मामी, दोघेही शांत आणि सुस्वभावी. दोघेही आजीला टरकून असत. त्यात मामीची कूस अजून उजवली नव्हती. मामी अधूनमधून घरी येई आणि आईजवळ डोळे गाळीत बसे. म्हातारीचे माझ्यावर मात्र खूप प्रेम. आजीच्या तोंडी तत्कालीन शिव्याही होत्या. एकदा मी आजीकडे गेलो, आईचा काही निरोप घेऊन. मामा कामावर गेला होता. मामी गेली होती दळणाचा डबा घेऊन चक्कीवर. आजीची पूजा सुरू होती. बाहेरच बसलो. बोलायची सोय नाही. तेवढ्यात आजीचा आवाज आला...

''हात बोहरा बसतई नाई माय यका जागी. एवढी आंघुळ घातली, धू-पूस केला बस नं लेकाच्या एकाठायी धड. कोण्या वाणाचा होय तू?'' कुणाशी बोलत होती आजी? माझ्याशिवाय घरात अन्य कुणीच नव्हते. मी आत वाकून पाहिले. आजी देवातल्या बाळकृष्णाला रागावत होती. एका हातात लोण्याचा गोळा घेतलेला तो बाळकृष्ण धडपणे एका जागी स्थिरावत नव्हता. आजी देवाला बोहारा म्हणते, मला आश्चर्य वाटले, हसूही आले. घरी आल्यावर मी आईला सांगितले. आई नुसती हसली... पुढे कितीतरी वर्षांनंतर आजीच्या त्या शिव्या आणि आईचे ते हसणे याचा अर्थ कळला.

आपण ज्या गोष्टीवर निरतिशय प्रेम करतो, म्हणजे मग ती जड वस्तू असो वा जिवंत, त्याला भरपूर अधिक- उणेही बोलतो. प्रसंगी शिव्याही देतो. कारण त्या गोष्टीसाठी, त्या व्यक्तीसाठी आपले आतडे तुटत असते. पोर उन्हात खेळात असते. आई म्हणते, ''उन्हात नको जाऊ. ताप येईल.'' पोर ऐकत नाही. आई म्हणते, ''मर मेल्या. तरफड ना एकदाचा घरात.'' मुलाने मरावे ही आईची इच्छा नसते, पण आतडे तडतडते. आजीच्या त्या शिव्यांचे प्रतिबिंब मला जनाबाईच्या अंतरंगात दिसले. जनाबाईनेही विठ्ठलाला अशाच शिव्या घातल्या आहेत. गावकुसाबाहेर जन्मलेल्या आणि स्वतःला नामयाची दासी म्हणवणाऱ्या जनाईचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता. तिच्या आणि तत्कालीन एकूणच समाजातल्या स्त्रियांचे दुःख तिने बघितले आणि अनुभवलेले होते. विठ्ठलभक्तीचा ठेका आपल्याकडेच आहे, असा भ्रम आणि अहंकार असलेल्या धर्ममार्तंडांविरुद्ध जनाबाईने बंड करून पंढरपुरातच आपला स्वतंत्र फड उभारला. ही खरी क्रांती.

**'डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ।।**
**हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ।।**
**पंढरीच्या पेठे मांडियेले पाल । मनगटावरी तेल घाला तुम्ही ।।**
**जनी म्हणे देवा झाले मी वेसवा । रिघाले केशवा घर तुझे ।।'**

ही विठोबावरची निर्व्याज भक्ती. ही तिची तेजस्वी वाणी. हे तिने विठोबावर झडझडून केलेले अलोट प्रेम. तिच्या कष्टांना तोड नाही. विठ्ठल तिचा सखा आहे. त्याला तिचे निर्व्याज प्रेम आणि भक्ती ठाऊक आहे. तरीही जनाबाई संतापून उठते. तिला समाजाने दिलेली उपेक्षिताची वागणूक तिला सतत टोचते आणि ती विठ्ठलालाच दोष देते. क्रोध आणि करुणा यांचा संगम असलेली तिची रचना बघा. धडाकून शिव्या देते ती देवाला... आणि तेही घराच्या अंगणात उभी राहून. येणाऱ्या-जाणाऱ्याला ऐकू येतील अशा...

**'अरे अरे विठ्या । मूळ मायेच्या कारटया ।।**
**तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।।**
**तुझे गेले मढे । तुला पाहुनी काळ राडे ।।**
**उभी राहुनी अंगणी । शिव्या देत दासी जनी ।।'**

यात नुसता आतडे तुटायचा व्यावहारिक भाव नाही. हे एक आध्यात्मिक रूपक आहे, ब्रह्म आणि माया यांचे रूपक. देव जेव्हा अवतार घेतो तेव्हा त्याला देह धारण करावा लागतो.

देह म्हणजे काय मायेचे रूपच ना! म्हणून विठोबा हे मूळमायेचे कारटे!! त्यातही मायेचे मूळ हे ब्रह्म म्हणजे शेवटी विठ्ठलच! देहधारणेपाठी माया आलीच, परंतु केव्हा तरी तिला शुद्ध ब्रह्माची जाणीव होते. त्यातून देह-बुद्धीचे अवगुण निघून जातात, या अवगुणांचे मढे गेले. अशा शुद्ध स्वरूपातल्या जाणिवेला बाघून काळही थरथर कापतो. जनाईचा हा अभंग असा आहे की, त्यावर खूप चिंतन करता येईल.

जनाई विठोबाला शिव्या देते त्यातील आपुलकी अनुभवा. विठोबाही तिचाच म्हणून हसतमुखाने तिच्या शिव्या ऐकून घेतो. कारण त्या शिव्यातूनही तिचे भगवंताशी अनुसंधान सुरू असते.

**'नाम गाय वेळवेळा। दासी जनीला नित्य चाळा।।'**

असे तिचे सांगणे आहे. अनुसंधान ही जशी भक्ती आहे तशीच ती कलाही आहे. ही कला साध्य होते नामाभ्यासामुळे! नाम साधनेत सत्पुरुषांचा संग लाभला तर उत्तमच, परंतु असे सत्पुरुष हे आपण पारखून घेतले पाहिजेत. निदान वर्तमानात तर ते अत्यावश्यक झालेले आहे. कारण वर्तमानात बुवाबाजीला आणि चमत्कारांना धरबंध उरलेला नाही.

सामान्य भाविकांच्या श्रद्धेचा फायदा घेत, सत्पुरुष म्हणून मिरवणाऱ्यांनी समाजाची फसवणूक केल्याची अनेक उदाहरणे आहेत. नाही मिळाला कुणी तरी काहीच बिघडत नाही. आपले अनुसंधान, नामसाधना एकट्यानेच मनापासून केली तर 'तो' स्वतःच तुम्हाला साथ करतो. विठोबा स्वतः जनीसोबत असे. जनाबाईला होतेच कोण दुसरे पंढरपुरात? संवाद करायचा असेल तर, 'मी' सोबत 'तू' हवाच ना? माझ्यासोबतचा 'तू' विठोबाच होता जनाबाईचा! संत नामदेवांचे १४ जणांचे कुटुंब होते. त्यात जनाबाई दासी म्हणून राहिली.

मराठवाड्यातील गंगाखेडमध्ये तत्कालीन अंत्यज कुटुंबात जन्मलेल्या जनाबाईने हे दासीपण करतानाच एक आध्यात्मिक अधिकार प्राप्त करून घेतला होता. जनाबाईची असीम भक्ती, तिच्या मनातील कळवळा, विठ्ठलाला भेटण्याची तळमळ आणि तगमग तिच्या रचनांमधून प्रकट होते.

**'दळू कांडू खेळू। सर्व ताप हरू।'** असे म्हणणाऱ्या जनाबाईने 'स्त्रीजन्म म्हणोनि न व्हावे उदास' असा उपदेश ती समस्त स्त्रीजातीला केला. 'मरोनिया जावे बा माझ्या पोटी यावे' असे प्रत्यक्ष ज्ञानदेवांना म्हणते. संत नामदेवांना जनाईचा अधिकार माहीत होता. तिच्या मनात असलेली, कष्टापोटी निर्माण झालेली जगड्व्याळ करुणा त्यांना ज्ञात होती. नामदेव स्वतः लिहितात...

**'जनीचे अभंग लिहिती नारायण । करीत श्रवण साधुसंत ।।**
**धन्य तेचि जनी, धन्य तिची भक्ती । नामदेव स्तुती करीतसे ।।'**

जनाबाईचा अभंग डोळस जाणीव देणारा आहे. तिचा देव सामाजिक नीतिमत्ता देतो. व्यापकतेचा साक्षात्कार घडवतो. आपल्या मनात आर्त निर्माण करतो. 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रगटले' असे म्हणणारे ज्ञानदेव जो भाव दर्शवतात तोच भाव नेमका जनाबाईच्या मनात आहे. ही करुणा समाजमनात दृढ व्हावी, हेच संतांचे प्रयत्न होते. त्यांच्या प्रयत्नांना आपण किती प्रतिसाद दिला हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे.

समर्थ एका ठिकाणी म्हणतात.. **'नभासारिखे रूप या राघवाचे । मनीं चिंतीता मूळ तुटे भवाचे । तया पाहता देहबुद्धी उरेना । सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना ।।'** पोटातही न सामावणारे आर्त जनाबाईच्या मनात होते. त्यापोटीच ह्या शिव्या देण्याचा अधिकार तिच्या ठायी होता.

# गुरुत्वाकर्षण



**अवकाशाच्या महावस्त्राला एक खळगा पडतो. त्याचा जो काही ताण भोवतालच्या वस्तूंवर पडतो त्याने वस्तूला त्वरण मिळून गती प्राप्त होते. त्यांच्या म्हणण्यानुसार गुरुत्वाकर्षण हे बल नसून अवकाश आणि काळ यांची वक्रता आहे. अवकाशाच्या महावस्त्राला वस्तुमान वाकवते आणि मग वस्तू आपोआपच मार्गक्रमण करतात. यासाठी एक छान उदाहरण द्यायचे तर सर्कसमधील जाळ्यात वरून मुलगी उडी मारते त्या ठिकाणी एक खळगा पडतो, जाळ्याच्या दोऱ्यांचा ताण दुसऱ्या टोकांवरील दुसऱ्या मुलीवर पडतो, त्या दोघींमधील पारस्परिक ओढ म्हणजे त्या दोघीतील गुरुत्वाकर्षण असे म्हणता येईल.**

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

सृष्टिरहस्याच्या गहन चिंतनात गढलेल्या न्यूटनच्या पुढ्यात झाडावरून एक सफरचंद पडले आणि विचारांची दिशा भरकटली. उचलून खावून टाकण्याऐवजी हे खालीच का पडले, आहे तेथेच का नाही तरंगले, वर का नाही गेले यावर चिंतन सुरू झाले. एक संभाव्यता म्हणून पृथ्वीच्या आकर्षणामुळे फळ पडले असावे, असे त्याला वाटले. पण मग पृथ्वीच फळाकडे का सरकली नाही? विचार करता असे लक्षात आले की, पृथ्वी मोठी आणि सफरजंद तिच्या मानाने नगण्य. त्याचे वस्तुमान तिच्या तुलनेत असून नसल्यासारखे. म्हणून त्याचे त्वरण साहजिकपणे खूप मोठे असल्याने नजरेत भरते इतकेच. तेव्हा सर्वच वस्तूंमध्ये पारस्परिक आकर्षण असून त्या एकमेकांना ओढतात हेच सत्य. हे आकर्षण दोघींच्यावस्तुमानांच्या गुणाकाराच्या प्रमाणात वाढते आणि त्यांच्यातील अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणात घटते असे सांगत हे म्हणजेच गुरुत्वाकर्षण असे सांगितले. फळाची क्षती, पृथ्वीची गती, न्यूटनची बुद्धी या सर्वांची युती होऊन गुरुत्वाकर्षण नियमांची सिद्धी झाली. गुरुत्वाकर्षणाचा स्थिरांकही तयार करण्यात आला. याच आकषर्णामुळे वस्तूंना वजन लाभते, वस्तू खाली पडतात, पृथ्वीभोवतीचे वातावरण अवकाशात उडून जात नाही हे समजले. केप्लर नावाच्या शास्त्रज्ञाने यात भर घालून सांगितले की, यामुळेच सौर सृष्टी, ग्रह, नक्षत्र व तारे हे सर्व एका नियमबद्ध वर्तनात भ्रमण करतात आणि असे बरेच काही.

न्यूटनने गुरुत्वाकर्षण असते हे सांगितले, पण ते का असते हे अजूनही कोणी खात्रीने बोलत नाही. याविषयी बरेच उलटसुलट तर्क आहेत. विज्ञान महर्षी आईन्स्टाईनने एक संभाव्य कारण सांगितले. तत्पूर्वी त्यांनी भलतेच, पण खरे सांगितले. आकर्षण वगैरे काही नाही. वस्तुमान आणि ऊर्जा यामुळे काळ आणि अवकाशाच्या महावस्त्राला एक खळगा पडतो. त्याचा जो काही ताण भोवतालच्या वस्तूंवर पडतो त्याने वस्तूला त्वरण मिळून गती प्राप्त होते. त्यांच्या म्हणण्यानुसार गुरुत्वाकर्षण हे बल नसून अवकाश आणि काळ यांची वक्रता आहे. अवकाशाच्या महावस्त्राला वस्तुमान वाकवते आणि मग वस्तू आपोआपच मार्गक्रमण करतात. यासाठी एक छान उदाहरण द्यायचे तर सर्कसमधील जाळ्यात वरून मुलगी उडी मारते त्या ठिकाणी एक खळगा पडतो, जाळ्याच्या दोऱ्यांचा ताण दुसऱ्या टोकांवरील दुसऱ्या मुलीवर पडतो, त्या दोघींमधील पारस्परिक ओढ म्हणजे त्या दोघीतील गुरुत्वाकर्षण असे म्हणता येईल.

हे सुद्धा न्यूटनच्या नियमानुसार दोघींच्या वजनांचा गुणाकार आणि अंतराच्या वर्गावर अवलंबून असते. सर्कशीतील जाळे म्हणजे अवकाश व काळ आणि त्या दोन मुली म्हणजे दोन वस्तू हे लक्षात घेतले तर गुरुत्वाकर्षणाची कल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल. हे म्हणजे अवकाशाची वक्रता व त्यामुळे त्याची ओढ. सापेक्षतावादातील काव्य येथे सुरू होते. काळ आणि अवकाशाला खळगा पडतो, असे म्हणण्यातील केऑस म्हणजे मग त्याला काहीतरी वस्तुमान पण असावयास हवे.

अवकाश आणि काल ही भूमितीची विचित्र रचना आहे. वस्तुमान त्या भूमितीलाच वाकवते. येथे कालप्रवाह मंदावतो. रेषा सरळ राहूनही वाकतात. विद्युत आणि चुंबकीय क्षेत्रांप्रमाणेच अवकाशाला अस्तित्व आहे, पण वस्तुमान नाही. थोडक्यात म्हणजे हा शब्द अनुभवजन्य आहे. पंचमहाभूतातील अवकाशतत्त्व हे असे आहे की ते नाही अशी जागाच नाही. त्यामुळे त्यासोबत गुरुत्वाकर्षणही अत्र-तत्रसर्वत्र आहेच. त्यानेच संपूर्ण सृष्टी एका अदृश्य शक्तीने धरून ठेवलेली आहे. गुरुत्वाकर्षण-विज्ञान, तत्त्वज्ञान आणि उपमा

**प्राचीन भारतीयांचे योगदान :** गुरुत्वाकर्षण हा विषय ही काही फक्त पाश्चात्त्यांचीच मक्तेदारी नाही. त्यांच्याही फार आधी या विषयावर प्राचीन भारतीय वैज्ञानिकांपैकी पाचव्या शतकातील आर्यभट्टांच्या ग्रंथात **'भू स्व गुरुत्वेन धार्यते।'** पृथ्वी स्वत:च्या गुरुत्वामुळेसर्व वस्तूंना धरून ठेवते. ती सूर्याभोवती फिरते आणि सर्व वस्तू तिच्या केंद्राकडे आकर्षित होतात, असे सांगितले. १२ व्या शतकातील भास्कराचार्यांनी त्यांच्या 'सिद्धांत शिरोमणी' या ग्रंथात **'आकृष्टिश्च महाभूमेः स्वाभाविकी नाम तत।'** म्हणजे पृथ्वी वस्तूंना नैसर्गिकपणे स्वत:भोवती खेचते असे सांगितले.

**वेदांत व उपनिषद :** यात पाश्चात्त्य किंवा भारतीय वैज्ञानिकांप्रमाणे स्पष्ट शब्दात गुरुत्वाकर्षणाच्या भौतिकी नियमांविषयी सांगितलेले नसले, तरी फार पूर्वी वेद आणि उपनिषदांनीही त्यालाच ऋत म्हणजे मायेची नियम व्यवस्था असे म्हटले. वेदांतातील ऋक या संकल्पनेद्वारे त्याच्या विश्वव्यापी नियमांचे प्रतिपादन आढळते. ऋग्वेदातील दहाव्या मंडलात पृथ्वी, इतर ग्रह व सूर्य एकमेकांच्या आधाराने टिकून आहेत, असे म्हटलेले आहे. ब्रह्मसूत्र भाष्यात आचार्य सांगतात की, जगातील सर्व पदार्थ एका अदृश्य सूत्राने बांधलेले आहेत. गीतेत कृष्णाने त्याला **'गामाविश्यच भूतानि धारयाम्यहमोजसा।'** (१५-१३) आणि गीताईत 'आकर्षणबळें भूते धरा रूपें धरीतसे।' असे म्हटले. म्हणजे मी पृथ्वीमध्ये प्रवेश करून भूतमात्रांना धारण करतो. एका निराळ्यासंदर्भात गीता म्हणते-

**'अहं कृत्स्नस्य जगत: प्रभव: प्रलयस्तथा ।**
**मत्त: परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय।**
**मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।।**

हेच विनोबांनी सोपे करून सांगितले-

**'ओविले सर्व माझ्यात जसे धाग्यामधें मणि ।'**

या सर्व मायेमध्ये मी विश्वाला धारण केले आहे. हीच ती ब्रह्माची लीला. ही अभिव्यक्ती गुरुत्वाकर्षणाचे आध्यात्मिक स्वरूप स्पष्ट करते. १७ व्या शतकातील न्यूटनच्या विज्ञानाने गुरुत्वाकर्षणाला बाह्य नियम म्हटले. २० व्या शतकातील आईन्स्टाईनने त्याला अवकाश व कालाची वक्रता असे म्हणत आकार देण्याचा प्रयत्न केला.

**आधुनिक भौतिकीतील निरीक्षणे कृष्णविवर:** सूर्यासारख्या तेजस्वी ताऱ्यांत लाखो वर्षे न्यूक्लियर फ्यूजन सुरू आहे. ही प्रक्रिया सुरू असेस्तोवर तारे जिवंत राहून त्यांच्या भोवतालच्या पृथ्वीसदृश ग्रहांवरील सजीवांनाही जीवन देतात.


ताऱ्यांभोवती दोन शक्ती कार्यरत असतात. फ्यूजनमुळेबाहेर पडणारी आणि गुरुत्वाकर्षणाने विश्वाला आणि स्वत: ताऱ्याला आत खेचणारी. या दोनही अस्तित्वात असतील तोवर ताऱ्याचे व ग्रहमालेचे आयुष्य असते. फ्यूजन थांबले की, बाहेर पडणाऱ्या शक्तीमुळे तारा फुटतो आणि स्वत:च्याच महाप्रचंड वस्तुमानामुळे आतल्या आत कोसळतो. सूर्यासारखा लहान तारा हळूहळू शांत होतो, मोठा असेल तर धडाक्याने फुटून त्याचा न्यूट्रान स्टार बनतो आणि अतिभव्य असेल तर कृष्णविवरात रूपांतरित होतो. त्याच्या अतिप्रचंड वस्तुमानाने त्याचे गुरुत्वबल कल्पनातीत वाढते.

**'यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा ।**
**विशन्ति नाशाय समृद्धवेगा:।'**

म्हणजे ज्योतीकडे पतंगांनी आकृष्ट होत झेपावे त्याप्रमाणे आजूबाजूचे सर्व ग्रहगोल आणि फार काय, पण प्रकाशही त्यात शोषला जातो. एक अदृश्य काळी वस्तू तेथे निर्माण होते.

भौतिकशास्त्रातील अत्याधुनिक यंत्रेही तिचा वेध घेऊ शकत नाहीत. तिच्यापुढे सर्वच श्रांत होतात. तिचे अस्तित्व फक्त तर्क आणि गणितानेच ठरवता येते. माउली म्हणतात तसे अनुमानेना अनुमानेना अशी अवस्था होते. (पान ६ वर)

# भविष्यवेत्त्यांच्या नजरेतून २०२६



**२०२६ ची सुरुवात कालचक्र नव्या वळणावर नेणारी आहे. भविष्याच्या कुशीत काय दडले आहे, याबद्दल जाणून घेण्याची, आडाखे बांधण्याची तसेच अंदाज व्यक्त करण्याची मानवी भावना काही नवी नाही. भविष्याविषयी जाणून घेण्यासंदर्भात प्रसिद्ध असणाऱ्या काही अभ्यासशाखाही आपण जाणतो. यातील तज्ज्ञ, अभ्यासू वा भाकीत वर्तविण्याची 'श-क्ती' असलेले काही लोक हे काम दरवर्षी करतच असतात. असे असताना नववर्षात पाऊल ठेवताना आपणही भविष्याची चाचपणी करायला काय हरकत आहे? चला तर, २०२६ या वर्षाबद्दल भविष्यसूचक स्फटिकाचा गोळा काय म्हणतो, हे जाणून घेऊ या. जगातील महत्त्वाच्या भविष्यवाण्यांमध्ये प्रसिद्ध फ्रेंच भविष्यवेत्ता नॉस्ट्राडेमस यांच्या भाकितांचा अग्रक्रमाने समावेश होतो.**

परराष्ट्रकारण
प्रतिनिधी

नॉस्टडेमस यांच्या भविष्यवाण्यांचे विविध प्रकारे अर्थ लावले गेले आहेत. त्याने सूचित केलेल्या घटनांमध्ये दोन महायुद्धे, हिरोशिमा आणि नागासाकीवर केले गेलेले अणुबॉम्बस्फोट तसेच अमेरिकेतील ९/११ चा दहशतवादी हल्ला यांचा समावेश होता. या सर्व भविष्यवाण्या १५५५ मध्ये लिहिल्या गेल्या होत्या. लेखनाच्या संकेतात्मक भाषेतून त्याचे विविध अर्थ निघू शकतात आणि त्यामुळेच इतिहासकार अनेकदा त्यांच्या भविष्यवाण्यांच्या विश्वासार्हतेवर वादही घालतात. या पृष्ठभूमीवर बघायचे तर २०२६ साठीच्या नॉस्ट्राडेमसच्या भविष्यवाण्याही जागतिक पातळीवर लक्षणीय अशांतता दर्शवतात. या वर्षामध्ये जगाच्या पूर्व आणि पश्चिम भागातील संघर्ष वाढणार असल्याचे संकेत मिळत असून यंदा सुमारे सात महिने चालणारे मोठे युद्ध होण्याची शक्यता या ख्यातनाम भविष्यवेत्त्याने वर्तविली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या भविष्यकथनातून स्वित्झर्लंडच्या टिसिनो प्रदेशात रक्तपाताचा इशारादेखील मिळतो आहे.

काही अभ्यासकांतर्फे असेही सूचित होते की, पुढील काळात हवामान आपत्ती आणि तांत्रिक बदल मोठ्या प्रमाणात बघायला मिळतील. दुसरीकडे बाबा वांगा या एका आदरणीय बल्गेरियन भविष्यवेत्त्याने भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक आणि तीव्र हवामान बदल यासारख्या महत्त्वाच्या आपत्तींबद्दलच्या भाकितांनिशी हे वर्ष कसे असेल, याचा प्राथमिक अंदाज दिला आहे. यंदा अशा पर्यावरणीय बदलांमुळे जगातील अनेक भागांत पूर, त्सुनामी आणि इतर अत्यंत गंभीर घटना घडू शकतात आणि त्यामुळे जगभरातील काही प्रदेश आणि क्षेत्रांवर विपरित परिणाम होऊ शकतो, असे सूचित करण्यात आले आहे. त्यामुळे शेती, पायाभूत सुविधा आदी क्षेत्रांचे मोठे नुकसान संभवण्याचा संकेत आपण लक्षात घ्यायला हवा. अर्थातच वैज्ञानिकदृष्ट्या अशा कोणत्याही भाकितांना पुष्टी मिळत नसली, तरी संभाव्य परिणामांचा विचार केल्यास आपल्याला भविष्यातील धोके समजण्यास मदत होते, हे मान्य करावे लागेल. २०२६ मध्ये इथिओपिया, अमेरिका, म्यानमार, दक्षिण सुदान, गांबिया, सुदान, रशिया, झांबिया, दक्षिण आफ्रिका आणि थायलंड या देशांमध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. असे असताना जगभरातील प्रत्येक १०० लोकांपैकी अंदाजे सात ते आठ लोक निवडणुकीशी संबंधित विपरीत घटनांमुळे प्रभावित होऊ शकतात, असे दर्शविण्यात आले आहे.

यंदा देशात पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुकांची तयारी असणार आहे. पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्ष तृणमूल काँग्रेसच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आव्हान देत आहे. तामिळनाडूमध्ये अण्णा द्रमुक- भाजपा युती द्रमुकला सत्तेवरून हाकलून लावण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु द्रमुक अजूनही मजबूत आहे.केरळमध्ये भाजपा सातत्याने ताकद वाढवत असला, तरी डावी लोकशाही आघाडी आणि संयुक्त लोकशाही आघाडी राजकारणामध्ये सातत्याने पाहायला मिळेल. आसाममध्ये सध्या भाजपा सत्तेत असले, तरी आगामी निवडणुकांमध्ये राज्यात प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी त्यांना प्रयत्न करावे लागतील. इथे भाजपा आणि काँग्रेस पक्ष एकमेकांविरुद्ध उभे राहतील. म्हणूनच तेथील घडामोडींकडेही लक्ष ठेवावे लागेल. जगाचा विचार करता सध्या जागतिक अर्थव्यवस्था मंदावली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये गुंतवणूक केल्याने परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. मात्र भाकितांचा अंदाज घेता वेगवेगळी आर्थिक धोरणे आणि उच्च सार्वजनिक कर्जाचे निरीक्षण करणे महत्त्वाचे ठरणार आहे. आताच रशिया आणि चीन संसाधनांसाठी स्पर्धा करत आहेत. येत्या काळात त्यांच्यामधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता भविष्यवेत्ते दर्शवतात. सध्याची स्थिती तरी या इशाऱ्यांशी सुसंगत आहे. बल्गेरियन भविष्यवेत्ता बाबा वांगा यांनीदेखील आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. २०२६ मध्ये येणारी अपेक्षित मंदी व्यापार तणाव आणि लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे, विशेषतः विकसित देशांमध्ये वाढत असलेल्या वृद्धांच्या लोकसंख्येमुळे गडद होण्याची शक्यता आहे. 'गोल्डमन सॅक्स रिसर्च'चा अंदाज आहे की, २०२६ मध्ये बहुतेक प्रमुख अर्थव्यवस्था पूर्वीच्या अपेक्षेपेक्षा वेगाने वाढतील. भारताचा विचार केला तर येथील महागाई दर दोन टक्क्यांपेक्षा जास्त राहण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना वस्तू आणि सेवा परवडण्याबाबत लक्षणीय चिंता निर्माण होऊ शकते. विशेषतः सध्याचा व्यापार तणाव आणि धोरणात्मक बदलांमध्ये ही चिंता दाट होणार असल्याचे म्हणावे लागेल.

तथापि, विविध देशांची आयात शुल्क कमी करण्याची नीती, कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये वाढत्या गुंतवणुकीसह उत्पादकता वाढली आणि आर्थिक वाढीला पाठिंबा मिळाला तर परिस्थितीतील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. जागतिक व्यापार शुल्कांमधील धक्क्यांमुळे आणि देशांतर्गत धोरणांमुळे २०२६ आणि त्यानंतरच्या आर्थिक वर्षासाठी भारताचा आर्थिक दृष्टिकोन प्रभावित राहण्याचा अंदाज आहे. २०४७ पर्यंत विकसित देशाचा दर्जा मिळविण्यासाठी सरकारला देशांतर्गत उत्पादन वाढीला चालना देणे, परकीय गुंतवणूक वाढविणे आणि जागतिक बाजारपेठांमध्ये व्यापार वाढविणे गरजेचे ठरेल. त्याचप्रमाणे देशांतर्गत बाजारक्षम तेकडेही भारताला लक्ष द्यावे लागेल.

यंदा अर्थव्यवस्थेला पाठिंबा देण्यासाठी धोरणात्मक उपाय योजणे क्रमप्राप्त ठरणार आहे. भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. २०२६ मध्ये भारताचे परराष्ट्र धोरण शेजारी राष्ट्रांशी जुळवून घेण्याच्या उपक्रमांवर भर देणारे राहील. त्याचबरोबर देश संरक्षण आणि आर्थिक सहकार्य वाढवून 'क्वाड'द्वारे अमेरिका आणि युरोप, विशेषतः जर्मनीसोबत आपली भागीदारी मजबूत करेल. शिवाय २०२६ मध्ये भारत 'ब्रिक्स' अध्यक्षपदाचा वापर जगातील प्रमुख शक्तीमधील, विशेषतः अमेरिका आणि चीनमधील स्पर्धा दूर करण्यासाठी करेल. ही धोरणात्मक चौकट नव्या वर्षात पाहायला मिळेल. खेरीज या वर्षी अनेक देश कनेक्टिव्हिटी, डिजिटल डिप्लोमसी आणि हवामान बदल यासारख्या उपक्रमांना प्राधान्य देतील. थोडक्यात, भारताचे २०२६ चे परराष्ट्र धोरण दृढनिश्चयी असणार असून विविध देशांशी मजबूत भागीदारी निर्माण करणे, जागतिक नेतृत्व क्षमता वाढविणे आणि जटिल भू-राजकीय परिस्थितीत राष्ट्रीय विकास सुनिश्चित करणे हे असेल.

# ग्रहसंकेत

**(रविवार, ११ जानेवारी ते शनिवार, १७ जानेवारी २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ११ जानेवारी-** लालबहादूर शास्त्री पुण्यदिन, हुतात्मा दिन सोलापूर, राष्ट्रीय रस्ते सुरक्षा सप्ताह प्रारंभ, जडीबसवलिंगेश्वर महास्वामी पुण्यतिथी केसरजवळा, वामणभाऊ पुण्यतिथी गहिनीनाथगड पाटोदा ✻ **सोमवार, १२ जानेवारी-** श्री सिध्देश्वर यात्रा प्रारंभ सोलापूर (४ दिवस), स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रीय युवक दिन, राजमाता जिजाऊ जयंती (तारखेप्रमाणे), संभू अप्पा समाधी उत्सव उरण ईश्वरपूर ✻ **मंगळवार, १३ जानेवारी-** भोगी, धनुर्मास समाप्ती, कलावती आई उत्सवारंभ बेळगाव आनंदमूर्ती पादुका स्थापना दिन अंधेरी मुंबई ✻ **बुधवार, १४ जानेवारी-** षट्तिला एकादशी, मकर संक्रांती, रवि मकरेत १५: ०६ ते सुर्यास्त पुण्यकाल, वीर जीवा महाले पुण्यतिथी, संत निवृत्तीनाथ यात्रा त्र्यंबकेश्वर, मार्लेश्वर यात्रा वारळ( रत्नागिरी), श्री सिध्देश्वर नैवेद्य यात्रा ऐनापूर, मराठा शौर्य दिवस बसताडा- पानिपत, राजा भगीरथ जयंती, तैल संक्रांती पोंगळ, प्रयाग स्नानारंभ, श्री सिध्देश्वर यात्रा विजयपूर ✻ **गुरुवार, १५ जानेवारी-** करिदिन, गणेश यात्रा सिध्दापूर (ता. मंगळवेढा), किंक्रांत, प.पू. श्री गगनगिरी महाराज निर्वाण दिन गगनबावडा (कोल्हापूर), सेना दिन, यल्लमा यात्रा वायफळे, सारंग स्वामी यात्रा शिरड ✻ **शुक्रवार, १६ जानेवारी-** प्रदोष, शिवरात्री, मेरू त्रयोदशी (जैन), महादेव गोविंद रानडे पुण्यतिथी, छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिन, कैवल्याश्रम स्वामी महाराज जयंती मोकाक ✻ **शनिवार, १७ जानेवारी-** संत तुकडोजी महाराज समाधी उत्सव अंजनवती (बीड), श्री साई मंदिर वर्धापनदिन पिंगुळी (मिरज)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ११ जानेवारी ✻ **बारसे-** १२ जानेवारी (१३ नंतर) ✻ **जावळ-** ११, १२ जानेवारी ✻ **गृहप्रवेश-** ११ जानेवारी (१० पर्यंत)

### मेष :- नव्या विचारांना चालना

राशी स्वामी मंगळ गुरुवारी कर्मस्थानी येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडीचे विविध कामे मार्गी लावू शकाल. सरकारी कामे करून घ्यावीत. बुधवारची बुध- गुरु प्रतियुती भाग्यवृध्दिंगत करणारी आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. आर्थिक नियोजन योग्य प्रकारे करावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. समस्यांची चिंता नको. शुभ ता. १२, १४

### वृषभः- कार्य सिद्धीस जाईल

धनस्थ गुरुची अष्टमातील बुधाशी होणारी प्रतियुती आर्थिक प्रगती करणारी आहे. भाग्यस्थानी शुभाशुभ ग्रह राहणार असल्याने कार्यक्षेत्राबाबत फारशी चिंता नको. स्वमताग्रह टाळावा. तिळगुळ घ्यावे आणि गोड बोलावे. कार्य सिद्धीस जाईल. कारखानदारी, विधी अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. आर्थिक समस्या कमी होणार आहेत. शुभ ता. ११, १४

### मिथुनः- सौख्याच्या घटना

राशी स्वामी बुधाची राशीतील गुरुशी होणारी प्रतियुती उत्साहवर्धक घटना घडविणारी आहे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. चिकाटीने रहावे, प्रगती होत जाईल. नव्या संधीचा स्विकार करावा. गुंतवणूक विचारपूर्वक करावी. अष्टमात रवी, मंगळादी ग्रह राहणार आहेत. त्यामुळे प्रकृतीची काळजी घ्यावी. विविध समस्यांवर मात करू शकाल. चिंता नका. शुभ ता. ११, १४

### कर्कः- खर्चाचे प्रसंग वाढतील

राशी समोरच रवि, मंगळादि ग्रह येणार आहेत. त्यामुळे थोडी धावपळ वाढणार आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. धार्मिक, सामाजिक कार्य घडतील. धनस्थ केतूमुळे खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. प्रतिकूलतेवर मात करू शकाल. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलतेचा लाभ घ्यावा. शुभ ता. ११, १४

### सिंहः- जुने आजार बळावतील

पंचमातील बुधाची लाभातील गुरुशी होणारी बुधवारची प्रतीयुती आर्थिक स्थितीत सुधारणा करणारी आहे. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. आठवा शनि जुने आजार बळवणार आहे. काळजी घ्यावी. स्पर्धा, अडचणींवर मात करावी. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. १२, १४

### कन्याः- स्पर्धांमध्ये यश

पंचमातील शुभाशुभ ग्रहांमुळे आर्थिक स्थितीत समाधानकारक सुधारणा होईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अपेक्षित संधी लाभतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. उपजत कलागुणांचा विकास होईल. सुसंधीचा लाभ उठवावा. व्यर्थ चिंता करू नका. अनुकूलता वाढत जाईल. शुभ ता. ११, १४

### तुलाः- नव्या कामांना गती

सुखस्थानी शुभाशुभ ग्रह राहणार आहेत. विनाकारण धावपळ वाढवू नका. भाग्यवर्धक घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित कामे होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अनावश्यक जबाबदार्या वाढवू नका. प्रकृतीच्या तक्रारींची काळजी घ्यावी. चिकाटीने रहावे, प्रगती होत जाईल. शुभ ता. १४

### वृश्चिकः- नव्या विचारांना चालना

पराक्रमातील ग्रहांमुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. गृहनिर्माण, कारखानदारी अशा क्षेत्रात प्रगती साधता येईल. जुने येणे वसूल करून घ्यावे. नव्या विचारांना चालना मिळेल. आर्थिक स्थितीत समाधानकारक सुधारणा होईल. सरकारी कामे होतील. प्रकाशन संस्था, पत्रकारिता अशा क्षेत्रात सुधारणा होईल. शुभ ता. १२, १४

### धनुः- वादाचे प्रसंग टाळावेत

राशीतील बुधाचा सप्तमातील गुरुशी होणारा प्रतियोग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. कामाचे योग्य नियोजन करावे. अडचणींवर मात करू शकाल. कार्यक्षेत्रात गुंतवणूक विचारपूर्वक करावी. वादाचे प्रसंग टाळावेत. खाद्यपदार्थ, वैद्यकीय अशा क्षेत्रात चांगल्या संधी लाभतील. फार चिंता करू नका. मार्ग निघत जाईल. शुभ ता. ११, १४

### मकरः- अडचणींवर मात

राशीतील शुभाशुभ ग्रहांमुळे कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामाला गती मिळेल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान लाभेल. नव्या योजना मार्गी लावता येतील. आत्मविश्वास वाढेल. घरातील मंगलकार्य मनासारखी होतील. सर्व अडचणीवर मात करू शकाल. फार चिंता करू नका. अपेक्षित संधी साधता येईल. शुभ ता. १२, १४

### कुंभः- समस्यांवर मात

व्ययस्थानी रवी मंगळादी ग्रह शुभ ग्रहां समावेत समाविष्ट आहेत. आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. जामीन कोणास राहू नका. पंचमातील गुरुमुळे सर्व समस्यांवर मात करू शकाल. परिश्रमातून प्रगती होईल. नव्या विचारांना विचाराने चालना द्यावी. दगदग टाळावी. स्थावर प्रश्न वाढवू नका. गुंतवणूक विचाराने करावी. अडचणी सुटत जातील. शुभ ता. १४

### मीनः- कामे मनासारखे होतील

लाभातील ग्रहांमुळे आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. परिश्रमाने केलेली वाटचाल आता शुभ फलदायी ठरेल. नव्या योजना मार्गी लावता येतील. फार चिंता करू नका. सरकारी कामे मनासारखी होतील. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. कलागुणांचा विकास होत जाईल. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. १२, १४

!! शुभ भवतु !!

पान ३ वरून

## अरवलीची लढाई जिंकली, पण...!



हणजेच दरवर्षी सरासरी २८ वाघ मारले गेले. परिणामस्वरूप १९६० च्या दशकापर्यंत म`वाडमधील वाघ नामशेष झाले. त्याचबरोबर जंगल आणि जंगली शाकाहारी प्राणीही जवळजवळ संपुष्टात आले. पर्यावरणाचा नाश हळूहळू होतो; पण तो दिसतो तेव्हा खूप उशीर झालेला असतो. अरवलीमधून वाघ गायब होणे हा फक्त एका प्रजातीचा अंत नव्हता, तर ते जंगलाच्या संपूर्ण पिरॅमिडचे ढासळणे होते. पाणी, माती, शेती आणि समाजापर्यंत त्याचे धोके हळूहळू पसरले. आता तर अनेक ठिकाणी जंगल हे सुरक्षिततेचे नाही, तर संघर्षाचे ठिकाण बनले आहे. ही गोष्ट फक्त पर्यावरण विरुद्ध विकासाची नाही, तर विकासासाठी कोणती किंमत द्यावी लागते आणि कोणाच्या वाट्याला ही किंमत येते, हा खरा प्रश्न आहे. अरवली पर्वतात खाण उद्योगाला परवानगी न देण्याचा निर्णय आता जनमताच्या रेट्याने घेतला गेला असला, तरी त्याची अंमलबजावणी होते की नाही, खाणमाफियापुढे सरकार लोटांगण घालते की नाही, हा खरा प्रश्न आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## गुरुत्वाकर्षण

**पूंज भौतिकी विज्ञान :** म्हणजे क्वांटम फिजिक्स. अवकाशाचा पसारा अथांग आहे. अशी अनेक कृष्णविवरे बुडबुड्याप्रमाणे त्यात सामाविली आहेत. क्वचित त्यातील दोन कृष्णविवरे एकमेकांजवळ आली तर त्यांच्यात भीषण टक्कर होते. शांत पाण्यात दगड पडताच पृष्ठभागावर लाटा उत्पन्न होतात त्याप्रमाणे अवकाशातही तरंगांच्या लाटा तयार होतात. या लाटा म्हणजेच गुरुत्वाकर्षण तरंग असे आधुनिक विज्ञान म्हणते. मात्र, या सिद्धांतला अद्याप सर्व शास्त्रज्ञ आणि विचारवंतांनी स्वीकारलेले नाही.

**तुलनात्मक विश्लेषण :** आर्यभट्टांनी खगोलशास्त्रीय निरीक्षणांद्वारे पृथ्वीच्या आकर्षणाविषयी सांगितले. भास्कराचार्यांनी पृथ्वी नैसर्गिकरीत्या वस्तूंना आपल्याकडे ओढते हे त्यांच्या भौतिक सिद्धांतांवरून सांगितले. वेद व तत्त्वज्ञानाने विश्वव्यापी ब्रह्मशक्तीचे सर्वव्यापी व सर्वग्राही स्वरूप या शब्दात सांगितले. न्यूटनने मोजमापे घेऊन गणिती नियम बसवले. आईन्स्टाईनने अवकाशाला पडणारे खळगे असे कारण सांगितले. क्वांटम फिजिक्सने गुरुत्वाकर्षणाच्या लहरींची पुष्टी केली. थोडक्यात म्हणजे आपले तत्त्वज्ञान, प्राचीन भारतीय वैज्ञानिक आणि न्यूटनआईन्स्टाईन या पाश्चात्त्य गणिती विद्वान या सर्वांचे शब्द निराळे असतील; पण गुरुत्वाकर्षण म्हणजे

विश्वाला धरून ठेवणारी शक्ती अशा एकात्म सत्याकडेच सर्वांनी निर्देश केलेला आढळतो. मात्र, अजूनही अंतिम निष्कर्षाला हा विषय पोचला आहे, असे म्हणवत नाही. यात संशोधनाला भरपूर जागा शिल्लक आहेत.

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर




## वासोटा

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात, कोयना डोंगररांगेत वसलेला वासोटा वनदुर्ग म्हणून प्रसिद्ध आहे. सुमारे ३७०० फूट उंची असलेला हा किल्ला कोयना नदीच्या खोर्‍यात विराजमान आहे. कोयना शिवसागर जलाशयाच्या पश्चिमेस असलेल्या वासोट्याच्या पूर्वेला घनदाट जंगल आणि पश्चिमेला कातळकडे असल्याने किल्ल्याची दुर्गमता वाढली आहे. कोयनेच्या खोर्‍यात असल्यामुळे येथे दाट वनराई आहे तसेच हा प्रदेश समृद्ध देखील आहे. वासोट्याच्या डोंगराला वसिष्ठ ऋषींचे शिष्य अगस्ती ऋषी यांनी 'वसिष्ठ' असे नाव दिले आणि पुढे वसिष्ठ शब्दाचा अपभ्रंश होऊन 'वासोटा' हे नाव प्रचलित झाले. अगस्ती ऋषी विंध्य पर्वत ओलांडून जेव्हा दक्षिणेकडे आले तेव्हा कोयना खोर्‍यातील वासोट्याच्या डोंगरावर त्यांनी बराच काळ व्यतीत केला. कालांतराने या डोंगराला तट आणि बुरुज बांधून किल्ल्याचे स्वरूप देण्यात आले, पुढे वासोट्याचा उपयोग लष्करी ठाणे म्हणून होऊ लागला.

सातारा जिल्ह्यातील इतर किल्ल्यांप्रमाणे हा किल्लादेखील शिलाहारकालीन आहे. किल्ल्याची बांधणी साधारणतः १२ व्या शतकात झाली आहे. शिलाहार काळात या किल्ल्याला वसंतगड असे नाव होते. अफझल खानाच्या वधानंतर काढलेल्या मोहिमेत शिवाजी महाराजांनी वासोटा घेण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. तेव्हा वासोटा आदिलशाहीच्या ताब्यात होता. आदिलशाहीच्यातर्फे किल्ल्याचा कारभार शिर्के आणि त्यानंतर जावळीकर मोरे घराण्याकडे होता. शिवाजी महाराजांनी जावळी घेतल्यावर वासोटा स्वराज्यात सामील करून घेतला. महाराजांनी किल्ल्याचे नाव व्याघ्रगड ठेवले. पन्हाळगडाच्या वेढ्यात राजापूरच्या इंग्रज अधिकार्‍यांनी सिद्धी जौहरला मदत केली. पन्हाळ्यावर तोफांचा मारा केला. त्यानंतर जेव्हा राजापूरची वखार मराठ्यांनी लुटली तेव्हा तेथील इंग्रज अधिकार्‍यांना कैद केले. कैद झालेले तीन इंग्रज अधिकारी तीन वर्षे वासोट्यावर कैदेत होते. उत्तर पेशवाईत हा किल्ला औंधच्या पंतप्रतिनिधींच्या ताब्यात होता. दुसर्‍या बाजीराव पेशव्यांनी पंतप्रतिनिधींना जेव्हा कैद केले तेव्हा त्यांच्या उपपत्नी ताई तेलीन उर्फ रमाबाई यांनी किल्ला काबीज केला.

रमाबाई यांनी पंतप्रतिनिधींना कैदेतून सोडविले, तेव्हा त्यांचे वास्तव्य वासोट्यावरच होते. त्यानंतर पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांनी वासोट्यावर चढाई केली. ताई तेलीन यांनी आठ महिने किल्ला लढविला. बापू गोखल्यांनी अथक प्रयत्नांनी वासोटा परत मिळविला. त्यानंतर या किल्ल्याचा वापर तुरुंग म्हणूनच करण्यात आला. १८१७ मध्ये खडकीच्या लढाईत पेशव्यांचा पराभव झाल्यावर दुसर्‍या बाजीराव पेशव्यांनी छत्रपती प्रतापसिंह आणि त्यांच्या कुटुंबाला याच किल्ल्यावर सुरक्षित ठेवले होते. शेवटच्या इंग्रज मराठे युद्धापर्यंत वासोटा मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यानंतर मात्र वासोटा इंग्रजांच्या ताब्यात गेला. वासोटा किल्ल्यावर जायला सातारामार्गे आणि चिपळूणमार्गे असे दोन प्रमुख मार्ग आहेत. सातारा मार्गाने किल्ल्यावर जाताना कोयना धरणाचा शिवसागर जलाशय बोटीने पार करावा लागतो. सर्वात प्रचलित वाट मेट इंदवलीवरून जाते, त्यासाठी प्रथम सातार्‍यावरून बामणोली गाठावे.

सातारा-बामणोली हा ३० किलोमीटर रस्ता कास पठार मार्गाने जात असल्याने अप्रतिम आहे. बामणोली गावातून बोटीने शिवसागर जलाशय पार करून आपण मेट इंदवलीला पोहोचतो. दुसरा मार्ग खिरकंडी गावातून जातो. यासाठी सातार्‍यावरून बसने वाघाली देवाची हे गाव गाठावे. येथून बोटीने खिरकंडी गाव गाठावे आणि तेथून मेट इंदवली गावातून किल्ल्यावर जाण्यास मार्ग आहे. तिसरी वाट कुसापूर गावातून जाते, कुसापूरला जाण्यासाठी कोयना जलाशयातून बोट उपलब्ध असते. कुसापूरहून दाट जंगलातून दोन वाटा जातात. उजवीकडील वाट नागेश्वरकडे जाते तर डावीकडील वाट वासोट्यावर घेऊन जाते.

नागेश्वर आणि वासोटा अशी जोड भ्रमंती करता येते. महाबळेश्वर मार्गे वासोट्याला जायचे असल्यास तापोळे या गावातून बोटीने कुसापूर गाठून वासोटा चढण्यास सुरुवात करावी. कोकणातल्या चिपळूण येथून वासोट्याला जायचे असल्यास प्रथम चोरवणे गाव गाठावे. येथून चार पाच तास चढून आपण नागेश्वरला पोहोचतो.

नागेश्वर पाहून वासोट्यावर जाता येते. चिपळूणवरून येतांना किल्ल्यावर जाणारी दुसरी वाट तिवरे गावातून जाते. प्रथम तिवरे गाव गाठावे आणि रेडे घाटाने वासोट्याला जावे. वासोटा आणि नागेश्वर कोयना अभयारण्यात असल्याने येथे राहण्याची परवानगी नाही त्यामुळे वेळेत किल्ला पाहून खाली उतरणे सोयीचे होते. वासोटा चढताना समोर एक सुळका सारखे आपले लक्ष वेधून घेत असतो; तोच आपण वरती उल्लेख केलेला नागेश्वरचा सुळका! या सुळक्याच्या पोटात एक गुहा आहे.

गुहेत महादेवाचे मंदिर आहे. हजारो नागरिक महाशिवरात्रीला येथे दर्शनासाठी येतात. गुहेच्या छतावरून अखंड जलाभिषेक पिंडीवर होत असतो. श्रावणात बरेच भाविक नागेश्वराचे दर्शन घेतात. बहुतेक ट्रेकर्ससुद्धा नागेश्वराचे दर्शन घेऊन मगच वासोट्यावर जातात, यासाठी थोडे अधिक चालण्याची तयारी मात्र असावी लागते.

नागेश्वराच्या गुहेत २० ते २५ लोकांची राहण्याची व्यवस्था होऊ शकते. शनिवार आणि रविवार असा दोन दिवसाचा कार्यक्रम आखला तर वासोटा आणि नागेश्वर सोबत करू शकतो. नागेश्वर अत्यंत रमणीय ठिकाण आहे. पावसाळ्यात मात्र वाट थोडी कठीण असते. सह्याद्रीतील हे किल्ले दुर्गम आहेत पण गडमाथ्यावर गेल्यावर जे अप्रतिम दृश्य दिसते त्यामुळे थकवा दूर पळून जातो. वासोटा किल्ल्यावर जाताना शेवटच्या टप्प्यात पायर्‍या लागतात. पायर्‍यांच्या उजव्या बाजूने पायवाट आहे. तेथे एक दरवाजा आहे. किल्ल्यावर दोन दरवाजे आहेत त्यातील पहिला दरवाजा ढासळलेला आहे. दुसर्‍या दरवाजाने गडावर प्रवेश झाला की, समोरच मारुती मंदिर आहे. दर्शन घेऊन आपण मंदिरापासून सरळ निघून किल्ल्यावरील बांधकामाचे भग्नावशेष पाहावे. किल्ल्यावरील बांधकामाची मजबुती भग्नावशेष पाहिले तरी सहज लक्षात येते.

गडावरील काळकाईच्या ठाण्याकडे जाणार्‍या वाटेवर देखणे शिवमंदिर आहे. या मंदिरात दोन तीन लोक रात्री झोपू शकतील इतकीच जागा आहे. ही माची पाहिली की, लोहगडावरील विंचूकाट्याची आठवण होते. काळकाईचे ठाणे येथून सभोवतीच्या परिसराचे विहंगम दृश्य दिसते. कोयनेचा जलाशय, घनदाट जंगलाने व्यापलेला प्रदेश, चकदेव, रसाळ, महीपतगड यांचे विलोभनीय रूप डोळ्यात साठवून गडावरील जोडटाके पाहून घ्यावे. यासमोरील वाट जंगलात शिरते आणि आपल्याला बाबूकड्यापाशी घेऊन जाते. बाबूकड्यावर गेलात की हरिश्चंद्रगडावरील कोकणकडा क्षणभर आठवतो. समोरच जुना वासोटा उभा दिसतो. बाबूकड्याच्या समोरील डोंगरास जुना वासोटा असे म्हणतात. आता या गडावर जाणारी वाट दिसत नाही. या डोंगरावर पाण्याचा तुटवडा आहे शिवाय घनदाट जंगल असल्यामुळे वन्य श्वपदांच्या भीतीने येथे कोणी जात नाही. पावसाळ्यात जळवांचा या भागात त्रास होऊ शकतो, तेव्हा काळजी घ्यावी. पावसाळ्यात गेलात तर सह्याद्रीत फिरताना जळवा असतात.

सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरून अखंड जलप्रवाह बरसतात. धबधब्यात भिजायला गेलात तर या जळवांचा सामना करावा लागतो. त्यामुळे विनामूल्य निसर्गोपचार घडतो. कारण जळवा अशुद्ध रक्त पितात. मात्र जळू लागली की, वाहणारे रक्त थांबविणे कठीण, म्हणून दुर्गम ठिकाणी आपण काळजी घेतलेलीच बरी असते.

सातारा जिल्ह्यातील किल्ले म्हणजे निसर्गदेवतेचा वरदहस्त लाभलेली ठिकाणे आहेत. सह्याद्रीच्या डोंगररांगात प्रेक्षणीय स्थळांची रेलचेल आहे. येथे पाऊस चांगला होत असल्याने परिसर हिरवागार असतो. भटकंतीसाठी तसाही पावसाळा आणि हिवाळा उत्तम ऋतू आहेत. सह्याद्रीत मात्र खूप पाऊस असताना डोंगरवाटा निसरड्या होतात, त्यामुळे अपघात होऊ शकतो. शक्यतोवर ट्रेकिंगची सवय नसेल तर हिवाळ्यात फिरणे सुरक्षित असते. वासोटा आणि नागेश्वरची भटकंती हा एक वेगळाच अनुभव आहे त्यामुळे किल्ले फिरण्याची आवड असणार्‍यांनी नागेश्वर आणि वासोटा किल्ल्यावर नक्की जावे.

पान १ वरून




संक्रांत सण साजरा व्हायचा. आम्हा मुलींची तर खूप धमाल चालायची. मैत्रिणींना भेट देण्यासाठी कानातले, रुमाल, पिना अशा भेटवस्तू खरेदी करून त्या भेट दिल्या जायच्या. दादा लोक मात्र पतंग उडवण्यात मग्न असायचे. संध्याकाळी आईसोबत अनेक ठिकाणी हळदी-कुंकूसाठी जावं लागायचे. तिथेही अनेक वस्तू वाण म्हणून मिळायच्या.

तिसरा दिवस मात्र 'शिळी संक्रांत' किंवा 'किंक्रांत' म्हणून साजरा व्हायचा. अनेकांकडे त्या दिवशी आवर्जून 'सामिष' बनवलं जायचं. आजही संक्रांतीच्या या सार्‍या आठवणी ऊब देऊन जातात. सृजनानंतर पानगळ आणि पानगळीनंतर, सृष्टीच्या विलयातून पुन्हा सृजन हा निसर्गाचा नियमच आहे. दुःखाच्या कडू घोटानंतर सुखाचा गोडवा काही वेगळाच असतो ना...! संक्रांत हीच शिकवण देत वारंवार गोडवा देत राहते. तीळगूळ घ्या आणि गोड चांगले बोला. चांगला विचार आणि चांगली कृती करा हे सांगत राहते. तुम्हा सर्वांना हा तिळाचा तैलभाव आणि गुळाचा गोडवा आयुष्यभर मिळो, हेच संक्रांत सांगते. तीळगूळ घ्या गोड गोड बोला!

पान ४ वरून

## कवितेची जन्मकथा: विठ्ठल वाघ ह्यांची 'तिफन'

**काळ्या मातीत मातीत तिफन चालते,**
**ईज थयथय नाचते ढग ढोल वाजवितो,**
**सदाशिव हाकारतो नंदी बैलाच्या जोडीला,**
**संग पारवती चाले ओटी बांधून पोटाला,**
**सरीवर सरी येती माती न्हातीधुती होत,**
**कस्तुरीच्या सुवासानं भूल जिवाला पडते.....**

गायक सुरेश वाडकर आणि अनुराधा पौडवाल ह्यांनी स्वरबद्ध केलेल्या ह्या गाण्याला संगीतबद्ध करण्या आधी संगीतकार अनिल अरुण ह्यांनी राजदत्त ह्यांच्या सांगण्यावर विठ्ठल वाघ ह्यांच्याकडून हे काव्यगायन प्रत्यक्ष ऐकले आणि विठ्ठल वाघांनी लावलेल्या चालीची गती थोडी धीमी करत चाल कायम ठेवली. म्हणजे रूढार्थाने ह्या कवितेचे, गाण्याचे आणि चालीची सर्वस्वी श्रेय विठ्ठल वाघांनाच जाते असे म्हणावे लागेल. ह्या गाण्यामुळे कुलदीप पवार, अशोक सराफ अश्या अभिनेत्यांच्या छान, फार छान अश्या प्रतिक्रिया त्यावेळी विठ्ठल वाघांना मिळाल्या एका मराठी कवितेसाठी हा त्या काळात फार मोठा आदर होता. पुढे राघू मैनासाठी विठ्ठल वाघांनी गीत लेखन केल्यावर त्या चित्रपटात नाना पाटेकर, अशोक सराफ, निळू फुले ही स्टार कास्ट दिसली.

आपल्या एका मुलाखतीत आपल्या गायलेल्या गाण्यात आपले आवडते गाणे काळ्या मातीत मातीत आहे असे जेष्ठ गायिका अनुराधा पौडवाल ह्यांनी आवर्जून सांगितले. शेती आणि मातीमधील सृजनशील काव्याची निर्मितीसाठी विठ्ठल वाघ ह्यांची कविता ओळखली जाते आणि त्यातही काळ्या मातीत मातीतचा क्रमांक फार वरच आहे हे निश्चित. सरीवर सरी येती माती न्हाती धुती होते ही संकल्पना कवीला रिसोडसारख्या ग्रामीण भागात फिरताना होते, तर सदाशिव हाकालते नंदी बैलाच्या जोडीले, किंवा पराबती ऊनारते ह्यासाठी शेतात राबणारे मायबाप आणि मनावर गडदपणे बिंबविलेल्या संस्कृतीतील भोळा आणि गरीब समजला जाणारा शंकर हा देव आणि त्याला त्याही परिस्थितीत साथ देणारी पार्वती ह्यांची प्रतिमा आठवावी लागते. कधी सर्व भावना बाजूला ठेऊन अगदी लेकराला बाभळीला झोका बांधून ठेवणारी शेतकर्‍यांची बायको समोर येते. तर कधी आपलाच पाय काट्यामुळे रक्तबंबाळ झाल्याची सल ओली करावी लागते. शेतातील बियाण्याकडे पाहताना शिशिरातील प्रसन्न चांदणे आठवावे तर भिजल्या मातीच्या सुगंधाने कस्तुरीचा भास व्हावा.

भिजलेल्या ढेकलात लोणी आठवावे आणि धरतीवर हिरवे पीक वाढणे म्हणजे धरतीन अंगावर काढलेल गोंदण म्हणणे, ह्या गोंदणाची सर आज मशिनच्या आधारे अंगावर काढलेल्या टॅटूला येऊ शकत नाही किंवा ट्रॅक्टरच्या आधारे होणार्‍या नांगरणी वखरणीला सर्जा राज्याच्या संगे मायेने लागणारा लळा आढळत नाही.

कालानुरूप शेतीच्या अनेक संदर्भात बदल झालेत मात्र बदलले नाही ते शेतकर्‍यांचे जीवन, त्याच्या जीवनातील दैन्य, त्याच्या जीवनातील अपार आणि कवडीमोल ठरणारे कष्ट... काहीच बदलले नाही का? होय बदलले पण बदलले फक्त एकच... आधी निसर्गाचा हा पुजारी जीवात जीव आहे तोवर कष्ट आणि दैन्य उपसत परिस्थितीशी लढायला आता तो मनाने इतका खचत चालला आहे की, कीटक नाशकांचा वापर तो पिकांतील किड्याना मारण्यासाठी कमी आणि स्वतःचे जीवन संपविण्यासाठी जास्त करू लागला आहे. ह्याला आपण सर्व ह्या व्यवस्थेचे घटक म्हणून जबाबदार आहोत असे मला वाटते. विठ्ठल वाघाच्या तिफन कवितेचे गारुड आजही मराठी मनावर कायम आहे ह्याचा सर्वार्थाने मराठी कवी म्हणून आनंद होत असताना विठ्ठल वाघांनी मांडलेले शेतकर्‍यांच्या जीवनातील दैन्य आज तीन तप उलटूनही जसेच्या तसे आहेत ह्याची आंतरिक सलही मनात आहे हे नमूद करणे गरजेचे वाटतेच.

# रस्ते अपघात: गोल्डन अवर, गुड समारीटन कायदा आणि नागरिकांची कर्तव्ये



**गेल्या दहा वर्षांत भारतात सुमारे १३ लाखांहून अधिक नागरिक रस्ते अपघातात मरण पावले आहेत. भारतामध्ये दर तासाला सुमारे १७ लोक रस्ते अपघातात मृत्युमुखी पडतात. रस्ते अपघातांमुळे देशाच्या एकूण 'जीडीपी'च्या सुमारे तीन टक्के आर्थिक नुकसान होते, हे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे दरवर्षी केंद्र शासनातर्फे 'रस्ते सुरक्षा' या विषयावर समाजात जागृती करण्यासाठी दि. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत 'सुरक्षित रस्ते वाहतूक' मोहीम राबविली जाते. या काळात रस्ते वाहतुकीशी संबंधित विविध संस्था, शाळा, महाविद्यालये येथे या विषयावर जनजागृती करणारे विविध कार्यक्रम आयोजित करणे व प्रसारमाध्यम, समाजमाध्यम यांतून या विषयाचे महत्त्व समजावून सांगणे अपेक्षित असते. त्यानिमित्ताने रस्ते अपघातात 'गोल्डन अवर' व 'गुड समारीटन' या दोन संकल्पना महत्त्वाच्या आहेत. त्याची माहिती या लेखातून करून घेऊया...**

समाजभान

**महेश नाईक**

कायदा आयोगाच्या अहवालानुसार, जर अपघातानंतर पहिल्या काही मिनिटांत आणि विशेषतः पहिल्या एका तासात योग्य मदत व वैद्यकीय उपचार मिळाल्यास अनेकवेळा अपघातग्रस्ताचे प्राण वाचू शकतात. तसेच गंभीर शारीरिक नुकसान टाळता येते. या पहिल्या तासाला 'गोल्डन अवर' म्हणून संबोधले जाते. पहिल्या एका तासात योग्य उपचार मिळाले, तर रस्ते अपघातातील सुमारे ५० टक्के मृत्यू टाळता येऊ शकले असते. रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीस तातडीची मदत मिळणे अत्यंत आवश्यक असते. अपघातानंतर अपघात कुठे, कधी आणि कोणासोबतही होऊ शकतो. त्यामुळे अशा प्रसंगी घटनास्थळी उपस्थित असलेल्या व्यक्तींची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला 'गोल्डन अवर' ही संकल्पना माहीत असणे आवश्यक आहे. अपघात झाल्यानंतर अनेकवेळा घटनास्थळी उपस्थित असलेले नागरिक जखमी व्यक्तीस मदत करण्यासाठी पुढे येतात.

कोणतीही अपेक्षा न ठेवता, केवळ माणुसकीच्या भावनेतून मदत करणाऱ्या अशा व्यक्तींना 'गुड समारीटन' असे संबोधले जाते. मात्र, समाजामध्ये आजही एक भीती आढळून येते की, अपघातग्रस्तास मदत केल्यानंतर पोलीस चौकशी, न्यायालयीन प्रक्रिया किंवा शासकीय यंत्रणेकडून त्रास सहन करावा लागेल. याच भीतीमुळे अनेक लोक अपघातस्थळी मदत करण्यास पुढे येत नाहीत, हे वास्तव आहे.

सामान्य नागरिकांची ही भीती लक्षात घेऊन शासनाने 'मोटार वाहन कायदा, २०१९' मध्ये 'कलम १३४ अ' अंतर्गत महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. या कायद्यानुसार, कोणतीही व्यक्ती स्वतःहून, चांगल्या हेतूने आणि कोणतीही आर्थिक किंवा अन्य अपेक्षा न ठेवता अपघातग्रस्तास तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देत असेल किंवा जखमी व्यक्तीस जवळच्या रुग्णालयात पोहोचवत असेल, तर त्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा पोलीस किंवा शासकीय त्रास दिला जाणार नाही. 'गुड समारीटन' व्यक्तीस सन्मानजनक वागणूक देणे बंधनकारक आहे. त्यांना जबरदस्तीने साक्ष देण्यास भाग पाडले जाणार नाही. जर अशी व्यक्ती स्वतःहून साक्ष देण्यास इच्छुक असेल, तर तिच्या सोयीच्या वेळेत व ठिकाणी साध्या वेशातील पोलिसांकडूनच तिची चौकशी केली जाईल. या कायद्यानुसार, 'गुड समारीटन' व्यक्तीला अपघाताविषयी साक्ष देण्यासाठी जबरदस्तीने पोलीस ठाण्यात बोलावले जाणार नाही. त्यांची वैयक्तिक माहिती- नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक इत्यादी गुप्त ठेवण्याचा हक्क अबाधित आहे.

अपघातग्रस्तास रुग्णालयात पोहोचवल्यानंतर 'गुड समारीटन' व्यक्तीस तेथे थांबून राहण्याची कोणतीही सक्ती केली जाणार नाही. २०१२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर २०१४, २०१५ आणि २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'गुड समारीटन'च्या संरक्षणासाठी मार्गदर्शक सूचना आणि कार्यपद्धती मंजूर केल्या. या सूचनांचे पालन करणे हे सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांवर बंधनकारक करण्यात आले.

**केंद्र सरकारची 'राह-वीर' योजना-**
सामान्य नागरिकांना अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी प्रेरणा मिळावी, यासाठी केंद्र सरकारने 'राह-वीर' ही विशेष योजना सुरू केली आहे.

**योजनेची मुख्य वैशिष्ट्ये-**
अपघातग्रस्ताचा जीव वाचवणाऱ्या व्यक्तीस २५ हजार रोख बक्षीस व त्यासोबत प्रशस्तिपत्र मिळते. वर्षातून सर्वोत्तम दहा राह-वीरांना एक लाख 'राष्ट्रीय पुरस्कार' मिळतो.

**पात्रता-** मोटार वाहन अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीस 'गोल्डन अवर'मध्ये रुग्णालयात पोहोचवून तातडीची मदत देऊन जीव वाचवणारा कोणताही नागरिक.

**गंभीर अपघाताची व्याख्या-** मोठी शस्त्रक्रिया आवश्यक असणे, किमान तीन दिवस रुग्णालयात उपचार, मेंदू किंवा पाठीच्या कण्याला दुखापत, उपचारादरम्यान मृत्यू.

पोलीस किंवा रुग्णालयाकडून मदत करणाऱ्या व्यक्तीस अधिकृत abknowledgement दिले जाते.

जिल्हास्तरीय समिती प्रस्ताव तपासून पुरस्कार मंजूर करते. थेट बँक खात्यात ऑनलाईन रक्कम जमा केली जाते. कोणतीही कायदेशीर अडचण आल्यास 'तक्रार निवारण समिती'कडे दाद मागता येते. रस्ते अपघातात अनेक मृत्यू केवळ वेळेवर मदत न मिळाल्याने होतात.

पहिल्या एका तासात मदत मिळाल्यास अनेक जीव वाचू शकतात. म्हणूनच, प्रत्येक नागरिकाने पुढे येऊन मदत करणे ही केवळ सामाजिक जबाबदारीच नव्हे, तर माणुसकीचे कर्तव्य आहे. अपघातग्रस्त व्यक्तीस मदत करणे ही केवळ कायदेशीर बाब नसून, ती प्रत्येक जागरूक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. 'गुड समारीटन' कायद्यामुळे आता कोणत्याही व्यक्तीने मदतीचा हात पुढे केल्यास त्याला पूर्ण कायदेशीर संरक्षण मिळते. त्यामुळे चालक, वाहक, प्रवासी, तसेच सामान्य नागरिकांनी हा कायदा समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून अपघातग्रस्तास वेळेत मदत मिळून अनेक निष्पाप प्राण वाचविता येतील. अपघातग्रस्तास वेळेवर मदत मिळणे म्हणजे एका आयुष्याला नवी संधी देणे होय.

'गुड समारीटन' कायदा हा माणुसकीला बळ देणारा कायदा आहे. भीती न बाळगता, प्रत्येक नागरिकाने अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढे यावे, हीच काळाची गरज आहे. कारण, आज आपण मदत केली, तर उद्या कदाचित तीच मदत आपल्यालाही मिळू शकते. (लेखक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात वरिष्ठ अधिकारी आहेत.)



# कृषिक्षेत्रातील आत्मनिर्भरतेचे यश

**भारताने तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकत जगात पहिला क्रमांक मिळविण्याचा भीमपराक्रम केला आहे. भारताचे हे यश कृषिक्षेत्रापुरतेच मर्यादित नाही, तर हा स्वातंत्र्योत्तर विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारत आज अन्नपुरवठ्यात निर्णायक भूमिका बजावतो आहे, हेही उल्लेखनीय असेच यश.**

वेध

**प्रतिनिधी**

भारताने तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकत जगातील पहिला क्रमांक मिळवला, ही बातमी कृषिक्षेत्रापुरती मर्यादित नाही; तर हा भारताच्या स्वातंत्र्योत्तर विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. अन्नसुरक्षेच्या प्रश्नावरून आयातीवर अवलंबून असलेल्या देशाने आज जागतिक अन्नपुरवठ्यात निर्णायक भूमिका मिळवणे, हे दीर्घकालीन धोरणात्मक परिवर्तनाचे द्योतक आहे. या यशामागे शेतकऱ्यांचे श्रम आहेतच; पण त्याहून अधिक महत्त्वाची आहे ती धोरणांची सातत्यपूर्ण दिशा, संशोधनाची भक्कम बैठक आणि कृषी क्षेत्राकडे पाहण्याची बदललेली दृष्टी. स्वातंत्र्यानंतर भारताची शेती ही उपजीविकेपुरती मर्यादित होती. लोकसंख्या वाढत होती, उत्पादन मात्र अनिश्चित होते. दुष्काळ, अपुरा पाऊस, सिंचनाचा अभाव, साठवणुकीची कमतरता आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे अन्नसुरक्षा ही कायमची चिंतेची बाब राहिली. तांदूळ हा मुख्य अन्नघटक असूनही, त्याचे उत्पादन मात्र हवामानावरच अवलंबून होते. आयात हा पर्याय अपरिहार्य असाच होता. या पार्श्वभूमीवर हरितक्रांतीने उत्पादनात वाढ केली असली, तरी त्याचे फायदे काही प्रदेशांपुरतेच मर्यादित राहिले. पाण्याचा अतिवापर, जमिनीची झीज आणि खर्चीक शेती ही दुसरी बाजू होती.

काँग्रेसच्या दीर्घकालीन सत्तेत शेती धोरणांचा भर प्रामुख्याने तत्कालिक उपायांवरच राहिला. उत्पादन वाढवण्यापेक्षा अनुदाने, कर्जमाफी आणि भावनिक राजकारण यांनाच अधिक महत्त्व लाभले. संशोधन संस्थांचा विस्तार झाला; पण त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा वेग कमी होता. बियाणे, सिंचन, साठवणूक, प्रक्रिया आणि निर्यात यांची साखळी एकत्रितपणे उभी राहिली नाही. परिणामी, तांदूळ उत्पादन वाढत असले; तरी त्याची गुणवत्ता, शाश्वतता आणि जागतिक स्पर्धात्मकता याबाबत मर्यादा कायम राहिल्या. २०१४नंतर शेतीकडे पाहण्याची दिशा बदलली. शेती ही सामाजिक कल्याणाची बाब नाही, तर ती राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे ही भूमिका प्राधान्याने स्वीकारली गेली. उत्पादन वाढवताना शाश्वतता, संशोधन आणि बाजारपेठ यांचा समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. तांदूळ उत्पादनात हा बदल ठळकपणे दिसून आला. नवीन वाणांचे संशोधन, रोगप्रतिबंधक आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या जाती, हवामानबदलाला तोंड देणारी बी-बियाणी ही प्रक्रिया वेगाने पुढे गेली. प्रयोगशाळेतील संशोधन थेट शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला गेला.

यासोबतच सिंचनाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली. पाण्याचा कार्यक्षम वापर, सूक्ष्म सिंचन, पाणलोट क्षेत्र विकास, यामुळे उत्पादन स्थिर राहू लागले. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव, बियाणे आणि सरकारी योजनांची माहिती वेळेवर मिळू लागली. किमान आधारभूत किंमत व्यवस्थेत पारदर्शकता वाढली. सरकारी खरेदी यंत्रणा अधिक सक्षम झाल्याने शेतकऱ्यांचा विश्वास वाढला, उत्पादन वाढले; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे उत्पादनाचा धोकाही कमी झाला. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे तांदूळ उत्पादनात सातत्याने झालेली वाढ. चीनसारख्या देशाची मक्तेदारी मोडीत काढणे हे सहजसाध्य नव्हते. चीनकडे विशाल सिंचन व्यवस्था, यांत्रिकीकरण आणि केंद्रीकृत नियोजन आहे. भारताने मात्र हवामानातील वैविध्यता, लहान शेतजमिनी आणि लाखो शेतकऱ्यांच्या सहभागातूनच हे यश मिळ हीच भारतीय शेतीची ताकद आहे. उत्पादनाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर येणे म्हणजे ते व्यवस्थापनाची परिपक्वता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. या स्वयंपूर्णतेचे महत्त्व जागतिकसंदर्भात अधिक ठळक होते. अन्नधान्याचा पुरवठा हा आज आर्थिक नव्हे, तर सामरिक प्रश्न बनला आहे.

अनेक देश आयातीवर अवलंबून आहेत. अशा वेळी भारताचा विश्वसनीय पुरवठादार म्हणून उदय होणे, ही परराष्ट्र धोरणालाही बळ देणारी बाब आहे. तांदूळ निर्यातीत भारताने मिळवलेले स्थान हे या आत्मनिर्भरतेचे प्रत्यक्ष फलित आहे. देशांतर्गत गरजा पूर्ण करून निर्यात वाढवण्याचे संतुलन साधणे सोपे नसते, मात्र ते भारताने साध्य केले. तथापि, या यशाकडे आत्मसंतोषाने पाहून चालणार नाही. उत्पादन वाढले असले; तरी शेतकऱ्यांचे उत्पन्न, प्रक्रिया उद्योगांचा विस्तार, साठवणूक व्यवस्था आणि मूल्यवर्धन यांवर अधिक काम करण्याची गरज आहे. हवामानबदलाचे आव्हान अधिक तीव्र होत असून, पाण्याची उपलब्धताही मर्यादित आहे. त्यामुळे भविष्यातील धोरणे अधिक सूक्ष्म आणि दीर्घकालीन दृष्टीने आखावी लागतील. तांदूळ उत्पादनातील यश हे इतर पिकांमध्येही कसे रूपांतरित करता येईल, हा पुढचा प्रश्न आहेच. तरीही, एक गोष्ट निर्विवाद आहे आणि ती म्हणजे भारताने तांदूळ उत्पादनात जगात अव्वल स्थान मिळवणे, ही अपघाती घटना नाही. स्वातंत्र्यानंतरच्या अपूर्णतेपासून ते आजच्या आत्मनिर्भरतेपर्यंतचा हा प्रवास सांगतो की, शेतीकडे योग्य दृष्टीने पाहिले तर ती देशाला अन्नच नाही, तर आत्मविश्वासही देते. चीनला मागे टाकण्याचा हा क्षण भारतासाठी आकड्यांचा नव्हे, तर आत्मभानाचा आहे. आज भारत अन्नाच्या बाबतीत जगाला पुरवठा करणारा देश झाला आहे. हेच या यशाचे खरे मोजदाद म्हणता येईल.



# दंडुकेशाहीची चाहूल...

**आंतरराष्ट्रीय राजकारणात महासत्तांच्या वर्तनाचे विश्लेषण करताना 'कायदेशीर कृती' आणि 'सत्ता' यांमधील तणाव हा कायमच केंद्रबिंदू राहिला आहे. नुकतेच अमेरिकेने व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना थेट लष्करी कारवाईद्वारे अटक केली. अमेरिकेचा निर्णय हा या तणावाचे टोकाचे उदाहरण ठरतो. सार्वभौम राष्ट्राच्या विद्यमान प्रमुखावर सैन्य वापरून कारवाई करणे ही घटना केवळ लॅटिन अमेरिकेपुरती मर्यादित नसून, ती आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या स्वरूपावरच मूलभूत प्रश्न उपस्थित करते. या कारवाईनंतर अमेरिकेने पुढचा मोर्चा कोलंबियाकडे वळवला असून, त्यामुळे संपूर्ण लॅटिन अमेरिका एका नव्या भू- राजकीय अस्थैर्याच्या टप्प्यात प्रवेश करत आहे.**

परराष्ट्रकारण

**कौस्तुभ वीरकर**

मादुरो अटकेचे समर्थन करताना अमेरिकेने अमली पदार्थ व्यापार, आंतरराष्ट्रीय नार्को- नेटवर्क आणि लोकशाहीच्या उल्लंघनाचा मुद्दा पुढे केला. मात्र, हा प्रश्न केवळ गुन्हेगारी नियंत्रणाचा नसून, एखाद्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मूलतत्त्वांचा प्रश्न आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसार, एखाद्या राष्ट्राच्या अंतर्गत राजकीय व्यवस्थेत थेट सैन्य हस्तक्षेप हा अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच मान्य आहे. येथे अमेरिकेचा निर्णय मात्र एकतर्फी आहे. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांची कोलंबियाबाबतची विधाने अधिक गंभीर ठरतात. कोलंबियातून अमेरिकेत अमली पदार्थांचा पुरवठा होत असल्याचा आरोप करत, गरज भासल्यास लष्करी कारवाईचा पर्याय उघडा असल्याचे सूचक विधान ट्रम्प यांनी केले. मादुरो प्रकरणानंतर ट्रम्प यांची ही भाषा केवळ राजकीय दबावाचे साधन न राहता, प्रत्यक्ष हस्तक्षेपाच्या शयतेचा इशाराच ठरते.

कोलंबियाचा प्रश्न हा मुळात संरचनात्मक आहे. अमली पदार्थांचे उत्पादन, सशस्त्र गट, गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढती दरी आणि दुर्बल राज्य संस्था हे सगळे घटक दशकानुदशके परस्पर गुंतलेले आहेत. या समस्येचे निराकरण लष्करी हस्तक्षेपातून होऊ शकते, असा दावा वास्तवाशी विसंगत आहे. तरीही, अमेरिकेची भूमिका 'ड्रग्सविरोधी युद्धा'च्या चौकटीत लष्करी उपायांकडेच झुकलेली दिसते. अमेरिकेच्या या सत्ताकारणामागील आर्थिक इच्छा तर अधिक गंभीर आहेत. लॅटिन अमेरिका हा अमेरिकेसाठी केवळ शेजारील प्रदेशच नाही, तर ऊर्जा व नैसर्गिक संसाधनांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. व्हेनेझुएलातील प्रचंड तेलसाठे, कोलंबियातील कोळसा व सोने, तसेच संपूर्ण प्रदेशातील खनिजसंपदा या सगळ्यांचे महत्त्व जागतिक ऊर्जा-सुरक्षेच्या संदर्भात लक्षणीय असेच. जागतिक ऊर्जापुरवठा साखळी सध्या तणावाखाली असताना आणि महासत्तांमध्ये स्पर्धा तीव्र होत असताना या संसाधनांवर नियंत्रण मिळवणे, हे सामरिक प्राधान्य ठरते. म्हणूनच, मादुरो यांच्या अटकेनंतर कोलंबियाकडे वळलेला अमेरिकेचा मोर्चा हा केवळ अमली पदार्थविरोधी मोहिमेचा भाग आहे, असे मानणे चुकीचे ठरेल. याकडे लॅटिन अमेरिकेचा राजकीय अवकाश पुन्हा एकदा अमेरिकेच्या प्रभाव क्षेत्राखाली आणण्याचा प्रयत्न म्हणून पाहावे लागेल. परंतु, या सगळ्याचा सर्वात गंभीर परिणाम कशावर होत असेल, तर तो लोकशाही व्यवस्थेवर. एखाद्या सरकारची वैधता कितीही वादग्रस्त असली, तरी ती ठरवण्याचा अधिकार त्या देशातील जनतेलाच असतो. हीच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचीही मूलभूत संकल्पना आहे. बाह्य शक्तीने सरकारे बदलणे किंवा नेत्यांना अटक करणे ही पद्धत सहजमान्य झाल्यास लोकशाही व्यवस्था महासत्तांच्या घरची गुलाम ठरेल.

आंतरराष्ट्रीय संस्थांचे मौनही यासंदर्भात विशेष चिंताजनकच आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि मानवी हक्क संस्थांकडून ठोस प्रतिक्रिया न उमटणे, हे जागतिक सत्तासंतुलनातील असमानतेचे प्रतीक आहे. जेव्हा नियम बनवणारी आणि त्यांचे उल्लंघन करणारी शक्ती एकच असते, तेव्हा आंतरराष्ट्रीय कायद्याची विश्वासार्हता कमी होते. अमेरिकेच्या या दंडुकेशाहीमुळे लोकशाही मूल्ये ही केवळ घोषणांपुरती मर्यादित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींकडे केवळ लॅटिन अमेरिकेतील संघर्ष म्हणून न पाहता, उद्याच्या जागतिक व्यवस्थेचा आरसा म्हणून पाहणे आवश्यक आहे. अन्यथा, हीच दंडुकेशाही पुन्हा एकदा जागतिक राजकारणाचे सूत्र होईल.



## विवेकानंद

भंगलेल्यांची मानव सेवा,
गांजलेल्यांची मानव सेवा,
विवेकानंदाची ही ईश्वर सेवा,
नरेंद्रांची शिव भावे जीव सेवा।
विवेकानंद तेजस्वी ज्ञानाचा भंडार,
संन्यास्याने गिळला भेदांचा अंधार,
तरुण भारताच्या भविष्याचा आकार,
जागृत भारताचा विवेकानंद आधार।
विषारी जातीपातींच्या तोडूनी भिंत,
मानवतेचा प्रसार करणारा साधू संत,
धर्म आणि कर्तव्याला जोडलेला बंध,
प्रेरणास्थान युवकांचा स्वामी विवेकानंद।
भारत माता आपली देवता आहे,
जगद्गुरू भारताचा सन्मान आहे,
संकटाशी लढणारा तरुण युवा आहे,
राष्ट्रप्रेमाचा नंदादीप विवेकानंद आहे।
निजलेली तरुणाई जागी झाली,
हृदयातील राष्ट्रभक्ती तेजाळली,
चिरंतन राष्ट्रहित चेतना ही स्फुरली,
विवेकानंदांच्या चिंतनाने देश
बलशाली।
राष्ट्र सेवा ध्येयासाठी दौडत दौडत जाऊ,
कंटकांची तमा न आम्हा पाऊल पुढेच ठेवू,
भालीच कुंकुमटिळा गीत
राष्ट्राचे स्फूर्तीने गाऊ,
विश्वगुरू राष्ट्र आमुचे पुन्हा जगाला दावू।

**अमोल तपासे**

## कधी कळणार सांगा

जे उमगते प्राणी आणि पक्ष्यांना
ते कधी उमगणार या मानवाला
निसर्गाची करतो हानी वाया घालवतो पाणी
भूक असते मूठभर वाढून घेतो ताटभर
अन्न उष्टे ठेवतो ताटात फेकून देतो
मोठ्या थाटात करू नये अन्नाची नासधूस
जे कळते मुक्या प्राणी-पक्ष्यांना
कधी कळणार सांगा या मानवाला
समाधान नाही त्याच्या गोटात
तहान-भूक लागते त्याला पोटात
प्रत्येक वस्तूसाठी फेकतो तो नोटा
स्वार्थी वृत्तीने पायावर पाडून घेतो तो गोटा
जे कळतेय मुक्या पशु-पक्षी प्राण्यांना
ते कधी कळणार सांगा या मानवाला

**प्रा. वर्षा विलास कावरे**

## ये नव्या वर्षा...

अस्वस्थ कल्लोळ सारीत ये जरा नव्या वर्षा
दुःख, वेदना दूर तू, सारीत ये जरा नव्या वर्षा
मिटव सारी भूक येथे, तांड्यातल्या लेकरांची?
बेकारी, बेरोजगारी, सारीत ये जरा नव्या वर्षा!
संपू दे दंगलीचा खेळ सारा, हाय हा रे विषारी?
समता, बंधुता, सौख्य सारे, घेऊन ये नव्या वर्षा..
आतंकवाद विश्वातुनी नष्ट होऊ दे हीच प्रार्थना
घरोघरी पसायदान सुखाचे घेऊन ये नव्या वर्षा
आत्महत्या, खून, बलात्कार यांना जाळ वेशीवरी
भारताला विश्व गुरू होऊदे, हे नव्या वर्षा!
शांती, सुखाची पहाट उजळो येथल्या घरोघरी
सुख समृद्धी सांज जीवनी होऊनी ये नव्या वर्षा!

**विष्णू सोळंके**

**निमीत्त**

**नरेंद्र मोदी**

**भारतावर झालेली परकीय आक्रमणे हा भारताच्या सांस्कृतिक तेजाला ग्रहण लावण्याचा तो प्रयत्न होता. मात्र, काळाच्या ओघात हे आक्रमक इतिहासाच्या स्मृतीपटलावर नाहीसे झाले. भारताच्या या सांस्कृतिक वैंभवाची ओळख असलेल्या श्री सोमनाथ मंदिरावरील पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्षे झाली. यानिमित्ताने या मंदिराचा इतिहास, राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात त्याचे महत्त्व या अंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लेख...**

# सोमनाथ स्वाभिमान पर्व: १,००० वर्षांची अटळ श्रद्धा



सोमनाथ' हा शब्द उच्चारताच आपल्या मनात आणि हृदयात, अभिमानाची भावना जागृत होते. हे भारताच्या आत्म्याचे शाश्वत प्रकटीकरण आहे. हे भव्य मंदिर, भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर असलेल्या गुजरात राज्यातील 'भास पाटण' येथे स्थित आहे. द्वादश ज्योतिर्लिंग स्तोत्रामध्ये भारतातील १२ ज्योतिर्लिंगांचा उल्लेख आहे. या स्तोत्राची सुरुवातच 'सौराष्ट्रे सोमनाथंच'ने होते. यातून पहिल्या ज्योतिर्लिंगाच्या रूपात सोमनाथचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्वच अधोरेखित होते. असे म्हटले जाते की,

सोमलिमं नरो दृष्ट्वा
सर्वपापैः प्रमुच्यते।
लभते फलं मनोवाच्छितं
मृतः स्वर्गं समाश्रयेत।।

याचा अर्थ आहे की, केवळ सोम नाथ शिवलिंगाच्या दर्शनानेच मनुष्य सर्व पापांतून मुक्त होतो, त्याला मनोवांछित फळ प्राप्त होते आणि मृत्यूनंतर तो स्वर्गात स्थान मिळवतो. दुर्दैवाने ज्या सोमनाथावर कोट्यवधी लोकांची श्रद्धा होती आणि ज्याची ते प्रार्थना करत असत, त्याच मंदिरावर परकीय आक्रमकांनी हल्ले केले; ज्यांचा हेतू भक्ती नसून विद्ध्वंस हाच होता. सोमनाथ मंदिरासाठी २०२६ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे आहे. या महान तीर्थक्षेत्रावर झालेल्या पहिल्या हल्ल्याला, एक हजार वर्षे पूर्ण होत आहेत. जानेवारी १०२६ मध्येच महमूद गझनवीने या मंदिरावर हल्ला केला होता. एका हिंसक आणि रानटी आक्रमणाद्वारे, श्रद्धा आणि नागरी संस्कृतीचे हे महान प्रतीक नष्ट करण्याचा त्याचा प्रयत्न होता. तरीही, एक हजार वर्षांनंतरही हे मंदिर आजही तितक्याच वैभवात उभे आहे. कारण, सोमनाथच्या वैभवाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी असंख्य प्रयत्न केले गेले. अशाच एका महत्त्वपूर्ण टप्प्याला २०२६ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. दि. ११ मे १९५१ रोजी या जीर्णोद्धार झालेल्या मंदिराचे दरवाजे, भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या उपस्थितीत एका सोहळ्याद्वारे भक्तांसाठी उघडण्यात आले होते.

एक हजार वर्षांपूव १०२६ मध्ये सोमनाथवर झालेले पहिले आक्रमण, त्यावेळच्या नगरवासीयांवर ओढवलेल्या क्रौर्याचे आणि या आक्रमणात मंदिराची झालेली प्रचंड नासधूसीचे वर्णन विविध ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये सविस्तरपणे आले आहे. ते वाचून आपले हृदय हेलावून जाते. प्रत्येक ओळ दुःख, क्रौर्य आणि काळाच्या ओघातही न पुसल्या जाणाऱ्या वेदनांनी भरलेली आहे. याचा भारतावर आणि लोकांच्या मनोबलावर काय परिणाम झाला असेल, याची कल्पना करा. सोमनाथला मोठे आध्यात्मिक महत्त्व होते. हे मंदिर समुद्रकिनाऱ्यावर असल्याने, आर्थिकदृष्ट्या प्रबळ असलेल्या समाजाला ते बळ देत असे, ज्यांचे समुद्रमार्गाने व्यापार करणारे व्यापारी आणि दर्यावद या मंदिराच्या वैभवाच्या गाथा दूरदूरपर्यंत कथन करत असत.तरीही, मी आज पूर्ण अभिमानाने आणि निस्संदिग्धपणे हे सांगू इच्छितो की, सोमनाथवर पहिल्यांदा झालेल्या आक्रमणाला एक हजार वर्षे उलटून गेल्यानंतरही, आजचा इतिहास त्या विनाशासाठी ओळखला जात नाही; तर हा इतिहास भारतमातेच्या कोट्यवधी पुत्रांच्या अभेद्य साहसासाठी आणि धैर्यासाठीच ओळखला जातो.सुमारे एक हजार वर्षांपूव अर्थात १०२६ मध्ये मध्ययुगीन काळात पाशवी वृत्तीचा उदय झाल्यापासून, त्यांनी इतरांना सोमनाथवर वारंवार आक्रमणे करण्यास प्रेरित केले होते. एका अर्थाने ती आपल्या संस्कृतीला आणि लोकांना गुलाम बनवण्याच्या प्रयत्नांची सुरुवातच होती. मात्र, ज्या ज्या वेळी या मंदिरावर हल्ले झाले, त्या त्या वेळी त्याचे रक्षण करण्यासाठी महान स्त्री-पुरुष उभे ठाकले आणि प्रसंगी त्यांनी आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदानही दिले.

पिढ्यान्पिढ्या आपल्या महान संस्कृतीतील लोकांनी स्वतःला सावरले आणि प्रत्येकवेळी या मंदिराची पुनर्बांधणी करून, त्याचा जीर्णोद्धारही केला. ज्या भूमीने पुण्यलोक अहिल्याबाई होळकर यांच्यासारख्या थोर व्यक्तिमत्त्वांना घडवले, त्याच भूमीत जन्म घेण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. भाविकांना सोमनाथाची पुन्हा प्रार्थना करता यावी, यासाठी अहिल्याबाई यांनीच अतिशय उदात्त भावनेने प्रयत्न केले होते.

१८९०च्या दशकात स्वामी विवेकानंद यांनी सोमनाथला भेट दिली होती, या भेटीतील अनुभवाने त्यांनाही अंतर्मुख केले. १८९७ मध्ये ते जेव्हा चेन्नईत एका व्याख्यानासाठी गेले, त्यावेळी त्यांनी या भेटीबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. 'दक्षिण भारतातील काही प्राचीन मंदिरे आणि गुजरातचे सोमनाथ मंदिर, आपल्याला शहाणपणाची अगाध शिकवण देतील. कोणत्याही पुस्तकांपेक्षा, ही मंदिरेच आपल्याला आपल्या इतिहासाची अधिक सखोलपणे जाणीव करून देतील. या मंदिरांवर झालेल्या शेकडो आक्रमणांच्या खुणा आणि त्यानंतर शेकडो वेळा झालेले पुनरुज्जीवन काळजीपूर्वक अनुभवा. ही मंदिरे सातत्याने उद्ध्वस्त केली गेली, तरीही प्रत्येकवेळी आपल्या अवशेषांमधून ती फिनिक्स पक्षाप्रमाणे ताकदीने पुन्हा उभी राहिली. हीच आपली राष्ट्रीय मानसिकता आहे, हाच आपला राष्ट्रीय जीवनप्रवाह आहे. याचे अनुकरण करा, हाच मार्ग तुम्हाला वैभवाकडे नेईल. जर तुम्ही हा मार्ग सोडलात, तर तुमचा विनाश निश्चित आहे. ज्या क्षणी तुम्ही या जीवनप्रवाहातून बाहेर पडाल, त्या क्षणी तुमच्या पदरी केवळ मृत्यू आणि सर्वनाशच असेल,' या शब्दांत त्यांनी आपल्या भावना मांडल्या होत्या.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीचे पवित्र कार्य, सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या सक्षम व्यक्तिमत्त्वाच्या हाती आले. १९४७ मध्ये दिवाळी सणाच्या काळातच सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथला भेट दिली होती. त्यावेळी ते तेथील परिस्थिती पाहून इतके हेलावले की, त्यांनी तिथल्या तिथेच मंदिराच्या पुनर्बांधणीची घोषणा केली. अखेर, दि. ११ मे १९५१ रोजी सोमनाथमधील भव्य मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी उघडले गेले आणि त्या ऐतिहासिक प्रसंगी डॉ. राजेंद्र प्रसाद स्वतः उपस्थितही होते. दुर्दैवाने हा ऐतिहासिक दिवस पाहण्यासाठी महान सरदार वल्लभभाई पटेल हयात नव्हते; परंतु त्यांचे स्वप्न पूर्ण झाले आणि आज ते एका भव्य मंदिराच्या रूपात खंबीरपणे संपूर्ण देशासमोर आहे.

तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना या घडामोडीबद्दल फारशी आस्था नव्हती. माननीय राष्ट्रपती किंवा कोणत्याही मंत्र्यांनी या विशेष समारंभात सहभागी होऊ नये, असे त्यांना वाटत होते. या समारंभामुळे भारताबद्दलचे मत वाईट होत आहे, असे ते म्हणाले. परंतु, डॉ. राजेंद्र प्रसाद आपल्या मतावर ठाम राहिले आणि पुढे जे झाले, तो इतिहास सर्वज्ञात आहे. सरदार पटेलांना भरघोस पाठिंबा देणार्या कन्हैय्यालाल मुन्शी यांचा उल्लेख केल्याशिवाय, सोमनाथ मंदिराचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. त्यांनी सोमनाथ मंदिराबद्दल लिहिलेले पुस्तक 'सोमनाथ- द श्राइन इटर्नल' हा एक अतिशय माहितीपूर्ण दस्ताऐवज आहे. मुन्शीजींच्या पुस्तकाचे शीर्षक अत्यंत समर्पक आहे. आपल्या संस्कृतीने आत्म्याचे आणि चिरंतन विचारांचे अमरत्व मान्य केले आहे. जे चिरंतन आहे, त्याचा नाश होऊ शकत नाही अशी आपली ठाम मान्यता आहे. गीतेत म्हटलेच आहे, 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि।' सोमनाथ मंदिर काळाशी व अनेक संकटांशी झुंज देऊन, आज दिमाखात उभे आहे. आपल्या संस्कृतीच्या अविनाशी आत्म्याचे, चैतन्याचे सोमनाथ मंदिराहून समर्पक दुसरे कोणते उदाहरण असू शकते? आपला देश शतकानुशतकांच्या आक्रमणांवर, वसाहतवादी लुटालुटीमधून आलेल्या दैन्यावर मात करून, आज जगभरात प्रगतीचे प्रतीक मानले जात आहे आणि त्याच्या मुळाशी हेच चैतन्य आहे.


आपली जीवनमूल्ये आणि जनतेचा दृढनिश्चय, यामुळेच भारत आज सर्व जगाच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे. सर्व जग भारताकडे आशा आणि आकांक्षेने पाहात आहे. आपल्या नवोन्मेषशाली तरुणाईमध्ये त्यांना उद्याची आशा दिसत आहे. आपली कला, संस्कृती, संगीत व वैविध्यपूर्ण सण जगभरात लोकप्रिय होत आहेत. निरोगी जीवनासाठी आवश्यक असलेल्या योग आणि आयुर्वेदाचा प्रभाव सर्व जगात वाढत असून, जगाला भेडसावणार्या अनेक समस्यांचे उपाय भारताकडून मिळत आहेत. अनादि काळापासून सोमनाथाने विविध क्षेत्रांतील लोकांना एकत्र आणले आहे. शतकांपूव, आदरणीय जैन भिक्षु कलिकाल सर्वज्ञ हेमचंद्राचार्य हे सोमनाथ येथे आले होते. असे सांगितले जाते की, तेथे प्रार्थना केल्यानंतर त्यांनी पुढील लोकाचे पठण केले, 'भवबीजामरजनना रागाद्याः क्षयमुपगता यस्य।' याचा अर्थ असा की, परमात्म्याला नमस्कार, ज्याच्यामध्ये सांसारिक अस्तित्वाची बीजे लोप पावली आहेत, ज्याच्यामध्ये वासना आणि सर्व दुःखाचे मूळ नष्ट झाले आहे.' आजही सोमनाथला, मन आणि आत्मा यांच्यात जागृती करण्याची क्षमता आहे. १०२६ मधील पहिल्या आक्रमणानंतर हजारो वर्षांनंतरही सोमनाथच्या समुद्राची गाज आजही तशीच आहे, जशी ती तेव्हा होती. आजही सोमनाथच्या किनाऱ्याला धडकणार्या लाटा एक कथा सांगतात. काहीही होवो, त्या लाटांप्रमाणे पुन्हा पुन्हा त्याचे तरंग उठतात. 'विनाश' या शब्दाला समानाथ असणारे गतकाळातील आक्रमणकर्ते, आता हवेत विरून गेले आहेत. इतिहासाच्या पानांवरील तळटीपांप्रमाणे ते उरले आहेत.

दुसरीकडे सोमनाथ तळपत क्षितिजापार आपले तेज पसरवत, आपल्याला १०२६ मध्ये झालेल्या आक्रमणानेही क्षीण न झालेल्या शाश्वत आत्म्याचे स्मरण करून देत आहे. सोमनाथ एक आशेचे गाणे आहे, जे आपल्याला सांगते की, एका क्षणासाठी विनाश करण्याचे सामर्थ्य द्वेष आणि कट्टरतेमध्ये असेल; मात्र चांगुलपणावरील श्रद्धा आणि दृढ विश्वास यांच्या सामर्थ्यामध्ये, अनंत काळाची सृजनक्षमता आहे. हजारो वर्षांपूव सोमनाथ मंदिरावर आक्रमण झाले आणि सातत्याने हल्ले होऊनही सोमनाथ मंदिर पुन्हा उभे राहू शकत असेल, तर आपणही आपल्या महान राष्ट्राला आक्रमणांपूव असलेल्या हजारो वर्षांपूवच्या वैभवापर्यंत निश्चितच पुन्हा पोहोचवू शकतो. श्री सोमनाथ महादेवाच्या आशीर्वादाने, एक विकसित भारत घडवण्याच्या नव्या संकल्पाच्या दिशेने मार्गक्रमण करत आहोत, जिथे आपल्याला सांस्कृतिक वारशातून संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी कार्य करण्याचे मार्गदर्शन मिळेल. जय सोमनाथ!

# असा होता विरक्त योगी

**निमीत्त**

**मंगेश पाठक**



**१२ जानेवारी हा स्वामी विवेकानंदांचा जन्मदिन 'युवक दिन' म्हणून साजरा करण्यामागे खूप मोठा विचार आहे. या निमित्ताने स्वामीजींनी अत्यंत अल्प आयुष्यकाळात करून ठेवलेले भरीव कार्य अभ्यासावे; त्यांच्या विवेकी, तल्लख आणि आध्यात्मिक वृत्तीतून बोध घ्यावा आणि त्यातील कालातीत भावार्थानिशी जगण्याचा यत्न करावा. अथांग सागरासारखं चरित्र असणाऱ्या थोर महात्म्याच्या जीवनचरित्राचा हा खास वेध.**

तारुण्य नेहमीच उत्साही, सकारात्मक विचारांनी वेढलेलं, जग कवेत घेण्याचं स्वप्न बाळगणारं आणि अन्यायाविरुद्ध पेटून उठत ठोस भूमिकेनिशी येणाऱ्या संकटांवर मात करत कार्यप्रवण करणारं असतं. म्हणूनच या काळाला 'आयुष्यातला वसंत' म्हणतात. पण आजचा युवक या वसंतात मळे फुलवतो की त्याची राखरांगोळी करतो, हे विचारात घेणं गरजेचं आहे. विशेषत: स्वामी विवेकानंदांचा जन्मदिवस अर्थात १२ जानेवारीचा दिवस 'युवक दिन' म्हणून साजरा होत असताना या थोर महात्म्याच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून, त्यांनी दाखवलेल्या मार्गाने कितीजण चालतात याचा अंदाज घेणे गरजेचे ठरते.

स्वामीजी जन्मले १८६३ मध्ये. तो काळ करकरीत पारतंत्र्याचा होता. परवशतेचा पाश करकचून आवळलेला होता. स्वधर्म धोक्यात होता. शक्य असेल त्या मार्गाने भारतीय संस्कृतीत दमन सुरू होतं. अशा वेळी या तेज:पुंज युवकाने लोकांच्या विचारक्षमतेला साद घातली आणि अध्यात्माबरोबरच राष्ट्रहिताच्या विचारांची रुजवण केली. भारतीय अस्मिता उफाळून वर आणणारा हा द्रष्टा संन्यासी होता. दैवाने मिळालेल्या अल्पायुष्याचंही त्याने सोनं केलं. घरातील कलह, कटकटी, कोर्ट यामध्ये अडकून न पडता तो युवकांचा श्रद्धेय ठरला. नरेंद्र ते स्वामी विवेकानंद बनण्यापर्यंतचा प्रवास अनेक आव्हानांनी, अडथळ्यांनी भरलेला होता. पण रूपाप्रमाणेच त्यांचे घनगंभीर विचार येणाऱ्या प्रत्येक अडथळ्यांवर मात करत स्वत:बरोबरच समाजालाही पुढे नेत राहिले.

म्हणूनच स्वामीजींचा जन्मदिन साजरा करताना आपल्यालाही अंत:प्रेरणा मिळते. कोलकाता येथील सीमलापल्ली येथे विश्वनाथ दत्त आणि भुवनेश्वरी देवी यांच्या पोटी हे रत्न जन्मले. विश्वनाथ उच्च न्यायालयात वकील होते. त्याचबरोबर साहित्य, धर्म, तत्त्वज्ञान अशा विषयांशी संबंध असल्यामुळे त्यांनी लहानग्या नरेंद्रवरही तर्कशुद्ध आणि धार्मिक विचारांची शिंपण केली. नरेंद्र आईच्या धार्मिक विचारांच्या मुशीत वाढला. घरातील अशा संस्कारी वातावरणामुळे स्वामी नरेंद्रला संगीतातही विशेष रस होता. त्यांनी बेनी गुप्ता आणि अहमद खान यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे धडे घेतले होते. त्यात गाणे आणि वादन या दोन्हीचा समावेश होता. याशिवाय शारीरिक ताकदीवरही त्यांचा विशेष भर होता. लहानगा नरेंद्र व्यायाम, लाठी चालवणे, पोहणे, कुस्ती अशा सर्व क्षेत्रांत पारंगत होता. कळत्या वयापासूनच त्यांनी अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, धर्मांधता यांच्या विरोधात प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली. नरेंद्रचा वाचनाचा वेग अचाट आणि स्मरणशक्ती अफाट होती. म्हणूनच पुढे तो शक्ती, बुद्धी आणि विवेकाचा सुरेख संगम असणारा एक घाट ठरला. या ठिकाणी विसावणाऱ्याला केवळ अध्यात्मच नव्हे तर जीवनाच्या सर्वांगांचा नव्याने बोध होतो. ही विचारधारा त्यांच्या बालपणीच्या कथांमध्ये सापडते, अल्लड कुमारवयात सापडते आणि प्रगल्भ युवावस्थेतही तिचं दर्शन घडतं. म्हणून या तेजोपुरुषाचा आदर्श आयुष्याला नवी परिमाणं दिल्याशिवाय राहात नाही.

स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रातली रंजकता त्यांच्या जन्मापासूनच सुरू होते. अतिशय श्रीमंत घरात जन्मलेल्या नरेंद्रने वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत खुशालीतलं बालपण अनुभवलं. नरेंद्र उत्तम स्वयंपाक करायचा. मनोहारी आणि मौलिक बोलायचा. गतिमान वाचण्याची कला त्याने परिश्रमपूर्वक अवगत केली होती. पानातली पहिली आणि शेवटची ओळ वाचल्यानंतर आणि बाकीच्या मजकुरावरून धावती नजर फिरवल्यावरही संपूर्ण तपशील त्याच्या क्षणात लक्षात यायचा. कुशाग्र बुद्धीला तो देवाचं वरदान न मानता प्रयत्नांति मिळणारं फळ समजायचा. त्याच्याभोवती सतत मित्रांचं वलय होतं. पण घरालाच एक शाप होता. या घरात विरक्तीचं वारं वाहायचं. त्याचे काका तरुणपणीच पत्नी आणि मुलाला सोडून संन्यासी झाले होते. नरेंद्रमध्येही नकळतपणे ही झाक दिसत होती. त्याची दानप्रवृत्ती इतकी उत्कट होती की, गल्लीच्या तोंडाशी एखादा भिकारी अथवा फकीर आला तर तो जवळ असेल नसेल ते सर्व त्याला अर्पण करायचा. याच कारणाने आई कोणाही फकिराला नरेंद्रच्या आसपासही फिरकू देत नव्हती. याच नरेंद्रला वयाच्या सोळाव्या वर्षी आपला जन्म कशासाठी आहे, हा मूलभूत प्रश्न पडला आणि त्याच्या जीवनप्रवासाने वेगळं वळण घेतलं. हा प्रश्न त्याने भेटेल त्या महात्म्याला विचारला आणि प्रत्येकाचाच जन्म ईश्वरप्राप्तीसाठी आहे, हे उत्तर मिळाल्यावर 'मग तुम्हाला ईश्वर दिसलाय् का?' असा प्रतिप्रश्न विचारला. अर्थातच कोणीच या प्रश्नाचं खंबीर उत्तर दिलं नाही. याच कारणामुळे त्याने स्वीकारलेलं ब्राह्मो समाजाचं सदस्यत्वही त्यागलं आणि अशाच अवस्थेत असताना सुरेंद्रनाथ मित्र नावाच्या साधकाकडे रामकृष्ण परमहंस आणि नरेंद्रची पहिली भेट झाली. ठाकूरजींना पाहिल्यावर पहिल्या भेटीत 'हा कोणी पागल म्हातारा आहे' अशी त्यांची धारणा झाली होती. नरेंद्रने ठाकूरांनाही 'तुम्ही ईश्वर पाहिलाय् का' हा प्रश्न विचारला. तेव्हा त्याला 'हो, मी ईश्वराला पाहिलंय्' असं उत्तर मिळालं आणि एक नवा प्रकाश दिसला. गुरूचं मार्गदर्शन लाभल्यावर नरेंद्रच्या विचारांना वेगळीच धार आली. ठाकूरजींनी नरेंद्रला दिव्यानुभूती दिली. स्वत:च्या उजव्या पायाचा अंगठा त्याच्या खांद्यावर टेकवून निर्विकल्प समाधीचा अनुभव दिला. मात्र समाधी अवस्थेत रमायचं नाही तर तुला दु:खितांचा संसार उन्नत करायचा आहे, तुला जग जिंकायचं आहे असं ठाकूरजींनी सांगितलं आणि नरेंद्रला दिशा मिळाली. त्यानंतरचा नरेंद्र पूर्णपणे वेगळा होता. वडिलांच्या पश्चात संपत्तीचा क्षय झाला, काका-काकूंनी जगणं असह्य केलं, बहिणीने आत्महत्या केली, घरात खाण्यासाठी घास मिळेना, कोर्ट-कचेऱ्या मागे लागलेल्या, आयुष्यभर श्रीमंतीत जगलेल्या आईच्या अंगावर धडकं वस्त्र दिसेना. अशा ग्रहदशा फिरलेल्या अवस्थेतही नरेंद्रने साधना सुरू ठेवली आणि आपल्याबरोबर अन्य साधकांनाही योग्य मार्गावर ठेवलं. या अवस्थेत स्वामी विवेकानंद यांनी तब्बल अडीच वर्षं परिक्रमा केली. 'सर्वधर्म परिषदेसाठी जावं' असा आदेश गुरूंकडून मिळाल्यानंतर देणगीस्वरूपात गोळा केलेल्या अर्थसाहाय्याने त्यांनी प्रवासाची तयारी केली. याच सुमारास जिवलग मित्र आणि खेतडीचे संस्थानिक अजितसिंग यांच्या मुलाच्या जन्मानिमित्त असलेल्या सोहळ्याला त्यांना खेतडीला जावे लागले.

या अजितसिंगांनीच त्यांना अर्थसाहाय्य केलं आणि 'विवेकानंद' ही नवी उपाधी दिली. शिकागोपर्यंतच्या प्रवासात त्यांची जमशेदजी टाटांशी भेट झाली. ते चीनला गेले, जपानला गेले आणि कॅनडामार्गे शिकागोला पोहोचले. मात्र संन्यस्त अवस्थेत काहीच सांभाळण्याची सवय नसताना बरोबर होतं- नव्हतं ते सगळं गमावलं. शिकागोमध्ये राहण्याची आणि खाण्या-पिण्याची भ्रांत होती. मात्र दैवी चमत्कारच म्हणावा लागेल की, एका स्त्रीने त्यांची स्वत:च्या घरात राहण्याची व्यवस्था केली आणि प्रा. राईट यांनी या परिषदेत विवेकानंद यांचं व्याख्यान होईल, अशी व्यवस्था केली. हा संपूर्ण कटकटीचा आणि तणावाचा काळ असूनही स्वामीजींनी 'माझ्या अमेरिकेतील बंधू आणि भगिनींनो' या पहिल्या वाक्यानेच श्रोत्यांच्या मनात अढळ स्थान मिळवलं आणि संपूर्ण परिषदेवर अधिराज्य गाजवलं. पंधरा दिवस चाललेल्या या परिषदेच्या नंतरच्या सर्व दिवसांमध्ये श्रोत्यांनी बाकीच्यांची रटाळ भाषणं ऐकावीत म्हणून स्वामीजींचं भाषण सर्वात शेवटी ठेवलं जात असे आणि त्या आमिषानेच श्रोते बसून असत. अशा रीतीने स्वत:चाच धर्म श्रेष्ठ आहे हे सिद्ध करण्याचा मिशनऱ्यांचा सुप्त हेतू स्वामीजींनी हाणून पाडला आणि हिंदू धर्मातलं अद्वैत तत्त्वज्ञान सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे हे ठसवलं.

स्वामीजींचा एकूणच जीवनक्रम तरुणांसाठी दिशादर्शक आहे. 'मी मनाचं ऐकत नाही तर मन माझं ऐकतं' हा आत्मविश्वास असणाऱ्या स्वामीजींनी नेहमीच बलदंड शरीर आणि ध्येयाप्रति असलेली निष्ठा आणि गुरूचं ऋण मानलं. आजार आणि कौटुंबिक कलहाचा शेवटपर्यंत सामना करत साधकांना राष्ट्रप्रेमाचे धडे दिले. त्यांच्या ठायी चैतन्य जागृत केलं. 'मातीत खेळल्याने मन आणि मती स्थिर होते', 'रुबाबशीर व्यक्तिमत्त्व आणि योग्य देहबोली याने प्रभाव पडतो' हे त्यांचे विचार आजच्या काळालाही लागू पडतात.

लचकत, मुरकत आणि नाटकी बोलण्यावर कठोर आघात करणारे स्वामीजी सत्य आणि सहिष्णुतेचा आग्रह धरताना दिसतात. हाच आग्रह आजच्या पिढीनेही धरायला हवा. कारण आजच्या तरुणाईलाही कुशाग्र बुद्धिमत्तेचं वरदान मिळालं आहे. आजच्या आयुष्याला विज्ञान आणि तंत्रज्ञानाची देखणी चौकट मिळाली आहे. आजही विवेकवादाची कास धरणारे तरुण आपल्या देशाकडूनच मिळतील अशी आशा जगाला आहे. म्हणूनच विवेकपथावरून पुढे जाण्यासाठी विवेकानंदांच्या विचारांची शिदोरी बरोबर बाळगणं गरजेचं आहे. हा दीपस्तंभ आपली वाट कधीच भरकटू देणार नाही.